

# दिलजमाई

रघुवीर सामंत

# दिलजमाई

रघुवीर सामंत

[ परिचय : **डॉ. भिवाजी अर्जुन परब**, एम्. ए., पी. एच्. डी. ]

अमरज्योति वाङ्मय

पुष्प ] गणेशचतुर्थी ६ सप्टेंबर १९५९ [ २० वें

: प्रकाशक :
सौ. स्नेहल र. सामंत, पी. ए.
**'अमरज्योति वाङ्मय'**
१४ बी, हरजीवनदास एस्टेट,
१५९-६०, व्हिन्सेन्ट रोड,
दादर, मुंबई १४.

*

**दि ल ज मा ई**

[ अमरज्योति वाङ्मय–पुष्प २० वें ]

*

**मूल्य रु. ३=५०**

*

६ सप्टेंबर १९५९

*

सर्व हक्क लेखकाच्या स्वाधीन

*

: वितरण साह्यक :
धी बॉम्बे बुक डेपो, मुंबई ४.
धी बुक सेन्टर (प्रा.) लि., मुंबई २८.

*

: मुद्रक :
चिंतामण रघुनाथ देसाई
न्यू भारत प्रिंटिंग प्रेस,
६, केळेवाडी, गिरगांव, मुंबई ४.

*

मुखपृष्ठ : बाळ ठाकूर

## अ नु क्र म

१. विडा चांगला रंगवा.
२. तुमचे–आमचे संदेश.
३. संगति नि रंग-संगति
४. कशांत काय ?
५. दिलजमाई
६. पावसाळी तत्त्वज्ञान
७. पावसाळी गुन्हेगारी
८. पावसाळी छत्र
९. पावसाळी तोरण
१०. २०० यार्डांवर ?
११. 'नॉट् पेड् !'
१२. इहलोकींचं अमृत
१३. पैसे खाणाऱ्यांपासून सावध
१४. एक न्यारी सुपारी
१५. व्यापार व व्यापारी

## – वानगी –

माझे दीर्घकालीन स्नेही श्री. रघुवीर सामंत यांनीं सहज विचारलें आणि मी 'हो' म्हटलें, म्हणून मी हा प्रस्ताव लिहीत आहे. एरवीं तसा माझा अधिकार नाहीं. श्री. सामंतांनीं दोन तपांहून अधिक काळ सरस्वतीची अव्याहत सेवा केली असून तिच्या अंगावर अनेक सुंदर लेणीं चढविलीं आहेत. तेव्हां, माझें हें मित्रकार्य आहे.

हें मित्रकार्य असलें तरी वेळ मारून नेण्याचा माझा विचार नाहीं; मीं हे पंधरा निबंध काळजीपूर्वक वाचले; वाचतां वाचतां त्यांचें लघुनिबंध वाङ्मय-प्रकाराच्या तत्त्व–निकषावर मूल्यमापन केलें. या कामीं कसूर केलेली नाहीं. आणि मोठ्या आनंदाची गोष्ट ही कीं माझे वाचनाचे श्रम फुकट गेले नाहींत; ते चांगलेच सार्थकीं लागले.

श्री. सामंतांनीं 'हृदय' निर्मिलें ( डि. १९३२ ) तेव्हांपासून त्यांची सूक्ष्म निरीक्षणाची, स्वभावदर्शनाची, जीवनाच्या रोजच्या अंगावर नवा प्रकाश पाडून वाचकास नवी दृष्टि देण्याची शक्ति वाचकांना सुपरिचित आहे. " दररोज डोळ्यांपुढें दिसणाऱ्या सामान्य गोष्टी, प्रत्येकाला पदोपदीं येणारे बारीकसारीक अनुभव किंवा सहज कोठेंहि घडतील असे प्रसंग निवडून त्यांचीं सोप्या, धावत्या, चटकार भाषेंत रेखाचित्रें रंगविणें हेंच लघुनिबंधकाराचें कार्य असतें. " असें आचार्य अत्र्यांनी एके ठिकाणीं लघुनिबंधाचें निदान केलें आहे, तें येथें उत्तम प्रत्ययास येतें.

श्री. सामंतांनीं निवडलेले विषय अशाच प्रकारचे आहेत याचा अर्थ ते त्यांना सहज मिळाले असा नाहीं. यशस्वी लघुनिबंधकारानें निवडलेले विषय वरवर पाहतां क्षुल्लक वाटतात, पण ते तसे नसतात. त्यांची निवड काळजी-पूर्वक, कौशल्यानें केलेली असते. अर्थात् ही निवड चांगली होऊनहि भागत नाहीं; तिला लघुनिबंधकाराच्या चौरस व्यक्तित्वाची जोड मिळाली पाहिजे. या संग्रहांतील लघुनिबंधांत विषयनिवडीला चौरस व्यक्तित्वाची तशी जोड मिळाली आहे. या दृष्टीनें 'विडा चांगला रंगवा !', 'संगति नि रंगसंगती,' '२०० यार्डांवर !—कीं पावलापावलापर ? ?' 'एक न्यारी सुपारी !'

अशा कांहीं निबंधांत तर प्रस्तुत निबंधकाराच्या व्यक्तित्वाचा विलास शिगेला पोंचलेला दिसून येतो.

श्री. सामंतांच्या अंगीं यश देणारें आणखीहि एक प्रकारचें कौशल्य आहे. या निबंधांत त्यांना कांहीं ना कांहीं तत्त्वप्रतिपादन करावयाचें असतें; पण त्यासाठीं ते उतावीळ नाहींत. विडा चांगला कसा रंगवावा हें त्यांना पूर्ण माहीत आहे. त्यांचा जगाकडे, जीवनाकडे, तुमच्या–आमच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन शोधक नि भेदक आहे. त्यांत भल्याबुऱ्या गोष्टी सामावलेल्या आहेत, त्यांत आंच आहे, त्यांत कटुता आहे, पण कटुतेचा अर्क नाहीं; आणि विशेष म्हणजे त्यांत खूप गोडवा व खेळकरपणा ( आणि अभिजात खट्याळपणाहि ) आहे. त्यांतच श्री. सामंतांच्या व्यक्तित्वाचें विविध दर्शन होतें.

‘ दिलजमाई ’त एका दुखवट्याच्या सभेंतील अनुभव सांगितल्यावर, मेलेल्याची माणसें स्तुति कां करतात असा प्रश्न उपस्थित करून मिस्किलपणानें ते विचारतात, “ कुणा जिवंत माणसाच्या कानांवर त्याच्या दोन हृदयस्पर्शी आठवणी घालून, त्याचे गुण रसिकतेनें जाणून घेऊन, त्याच्या आत्म्याला त्याच्या जिवंतपणींच कां कुणी शांति देत नाहीं ? त्यावेळीं तेवढी क्षुद्र छिद्रान्वेषी दृष्टि नि राईचा पर्वत करण्याची सवंग कल्पकताच आपल्या अंगीं कां बरें संचारते ? शांति मृतात्म्यालाच कां मिळावी ? ” श्री. सामंताचा हा सवाल किती समर्पक आहे तें दुखवट्याच्या सभांत मृताच्या गुणवर्णनाच्या महापुरांत सांपडलेल्या माणसांना सांगायला नको. सामान्यांची गोष्ट सोडा, पण मोठमोठ्यांच्याहि अंगावर जिवंतपणीं दगड पडतात नि मेल्यावर फुलें उधळलीं जातात !

पैसे खाणाऱ्या प्राण्यांवर श्री. सामंतांचा तीव्र कटाक्ष आहे; पण तेथें त्यांनीं आपल्या शंभराशंभराच्या दोन नोटा कुरतडणाऱ्या उंदीरमामावरच राग काढला आहे. पावसाळी निमित्तानें लिहिलेल्या चार निबंधांत अनेक दृश्यें, विविध स्वभावछटा वर्णन करतांना सभ्य माणसांच्या ‘ पावसाळी गुन्हेगारी ’ चा त्यांना विसर पडलेला नाहीं. “ हळूंच कानांत विचारतोंय् हें तुमच्या मी, ” श्री. सामंत मिस्किलपणें लिहितात, “ सभ्यांतल्या सभ्य माणसालाहि क्वचित् क्वचित्, दुसऱ्याची चांगली नवीकोरी छत्री चोरण्याचा मोह होत असतो,...याचा तुम्हांलाहि आहे ना अनुभव ? ” असें डिवचून



ते पुढें बजावतील, “ छत्री असणं हीच आपल्या नीतिमत्तेची परमोच्च खूण; ती नसणं हा अक्षम्य सामाजिक गुन्हाच ! ” फार काय, छत्री ही “ सौभाग्यवतीच्या गळ्यांतल्या मंगळसूत्रासारखीच समाजांतील एक नैतिक बाब ” असल्याचें ते निक्षून सुचवितील.

जीवनांतील वैफल्याची, भंपकपणाची, फार काय, भीतीचीहि श्री. सामंतांना जाणीव आहे. ‘ तुमचे-आमचे संदेश ’ यांतील स्वानुभवाचें निवेदन यादृष्टीनें पाहण्यासारखें आहे. त्यांत संदेश देणाच्या भंपक चालीला लेखक मनमुराद हंसत आहे. ‘ २०० यार्डांवर ? कीं पावलापावलावर ? ? ’ या उत्तम निबंधांत त्यांनीं माणसाच्या मनांतील स्मशानावर झगझगीत प्रकाशझोत टाकला आहे. स्मशानापासून दोनशें यार्डांवरील सुंदर राहती जागा मिळत असतां सोडून देणाऱ्या हळव्या जीवाच्या निमित्तानें श्री. सामंतांनी मानवी मनांतील भीतीच्या स्मशानावर प्रहार करतांना एक सुंदर फटका मारला आहे, तो असा— “ होय !—मानवी जीवनाच्या मंदिराच्या पायऱ्या स्मशानापासून सुरू होतात; नि त्याचा सुवर्ण कळस त्या स्मशानापलीडच्चा बाजूलाच असतो ! ” या विचारें, ते म्हणतात, माणसानें तें शिखर गांठण्यासाठीं निर्भयपणें वाट-चाल केली पाहिजे. ‘ एक न्यारी सुपारी ! ’ यांतील अनुभव कोणत्या संसारी माणसाला आलेला नाहीं ? लेखकानें लग्नाचें निमंत्रण द्यायला आलेल्या आपल्या स्नेह्याला सुपारी दिली; ती तो बरोबर घेऊन न जातां गडबडीनें विसरून गेला; तिचे लेखकानें आडकित्त्यानें कटकन् दोन तुकडे केले, तों—ती ‘ वरून चांगली दिसणारी भली मोठी सुपारी, आंतून पार काळी, किडकी होती ! ’ जगांत सद्भावनेची परतफेड क्वचित्‌च सद्भावनेनें होते नि जगाचें अंतरंग फसवें असतें; हेंच लेखकाला सुचवायचें आहे.

जीवनाचा रस कसा चाखावा, आनंद कसा भोगावा, हें श्री. सामंतांच्या कांहीं निबंधांत प्रतिपादन केलेलें आढळतें. अर्थात् असे निबंध प्रवचनपर मुळींच नाहींत. लेखकानें जातां जातां आपलें मनोगत वाचकाला सुनाविलें आहे. ‘ संगति नि रंग-संगतीं ’ तील रंगसंगतीचें वर्णन व रावबहादुरांचें स्वभाव-दर्शन विलोभनीय आहे. “ हृदया ” च्या शिल्पकाराची कला येथें उत्तम प्रकारें दिसून येते, आणि “ प्रत्येकाच्या जीवनांत जशी चांगली संगति हवी,...तशीच,...अशी रसिक शौकिन रंगसंगति सुद्धां हवी ! ” या

## दि ल ज मा ई
# नि मि त्ता नें—

माझे पहिले लघुनिबंध ( ' पणत्या '–१९३९ ) सुमारें वीस वर्षांपूर्वी मी रसिकांना सादर केले. त्या पुढल्या पांचसहा वर्षांत ' तारांगण ', ' रजःकण ', ' तांडा ', इ. माझ्या पुस्तकांमधून मी त्यांत आणखी भर टाकली. हीं बहुतेक पुस्तकें सध्यां कित्येक वर्षें अनुपलब्ध आहेत. कांही नवी भर घालून एकच मोठा संग्रह प्रकाशित करावा अशी एकदोन वर्षांपूर्वी एका प्रकाशकांनी इच्छा व्यक्त केली होती. ती कल्पना समूर्त होऊं शकली नाहीं. ( माझ्याहि तें आटोक्याबाहेरचें आहे. कारण, इतरच कांही मोठीं पुस्तकें अप्रकाशित स्थितींत पडून आहेत. ) तेव्हां, दरम्यान, ही ' दिलजमाई 'च सध्यां रसिकांना सादर करीत आहे—

---

लेखकाच्या सूचनेशीं वाचक एकदम सहमत होतो. " नॉट् पेड " या निबंधांतील पोस्टाच्या बदललेल्या नव्या दरांनीं निर्मिलेला गोड गोंधळ--बराच लांबला आहे तो ! तरी—वाचनीय आहे, नित्याच्या अनुभवांतला आहे. संक्रांतीची तिळगुळ-भेट पोस्टानें यावी व ती स्वीकारतांना जादा टपालहंशील द्यावें लागावें म्हणजे माणसाचा चेहरा कसा होतो त्याचें चित्र येथें कुशलतेनें काढलें आहे.

शेवटीं ' विडा चांगला रंगवा ! ' या उत्कृष्ट निबंधाकडे वळतों. यांत लेखकानें निरनिराळ्या तीन प्रसंगांच्या निवेदनानें ' खेळकरपणानेंच जीवनांतील लहानसहान आनंदाला मौज येते ' हें प्रतिपादन केलें आहे. पण त्यांत वर्णिलेले प्रसंग एकांतून एक उत्पन्न होऊन विषय-प्रतिपादन एकसंध झालें आहे--येथें लेखकानें जीवनाचा विडा चांगला कसा रंगवावा तें कौशल्यानें दाखवून दिलें आहे.

श्री. सामंताचे हे निबंध असे आहेत. त्यांनीं लघुनिबंधलेखनाच्या कलेची किती मनोहर जोपासना केली आहे तें वाचकाला हें समग्र पुस्तक वाचल्यानेंच अधिक प्रमाणांत कळेल. येथें मीं तिचें हें केवळ वानगीदाखल अल्प दिग्दर्शन केलें आहे.

१–८–१९५९
मुंबई, ४

— भि. अ. परब



साधारण १९४६ पासून पुढें आजतागायतपर्यंतच्या काळांतील वेळोवेळीं लिहिलेले कांहीं ललितनिबंध या पुस्तकांत समाविष्ट केलेले आहेत. माझे व्यासंगी विद्वान् स्नेही डॉ. भि. अ. परब यांच्याशीं सहजगत्या बोलण्यामधून तयार झालेली त्यांची चोखंदळ ' वानगी ' सोबत जोडलेली आहे. विविध मनोवृत्तींच्या रसिकांपैकीं प्रत्येकाला या संग्रहामधील चारदोन तरी गुजगोष्टी हृद्य वाटतील, अशी मलाहि उमेद वाटते.

या ' दिलजमाई 'च्या निमित्तानें मला आणखीहि एका गोष्टीचा येथें खुलासा करून, माझा एका बाबतींतला विशिष्ट दृष्टिकोण विनम्रपणें नमूद करून ठेवावासें वाटतें. ' हृदय ', ' उपकारी माणसें ' व इतरहि माझ्या अनेक पुस्तकांमधून, माझ्या लेखनांत ' विविध विरामचिन्हांची रेलचेल–अकारण, अप्रस्तुत वाटावी इतकी–असते,' असा कांहीं टीकाकारांचा माझ्यावरील अभिप्राय आहे. ती कांहींशी वस्तुस्थिति आहे; त्यांत कमीजास्त सदोषता असेलहि. मी त्याबाबत कसलेंहि आग्रही समर्थन करूं इच्छित नाहीं. मात्र, त्याबाबतचा माझा हेतु व दृष्टिकोण तेवढाच मला येथें रसिकांना दर्शवून ठेवावयाचा आहे.

मला असें वाटतें, कीं, जिवंत भाषा तिच्या वापरामधून अधिकाधिक अर्थवाही होण्याकरितांच वाढत असते. शब्दांच्या रूपानें, रचनेनें, त्या आसऱ्यानें आपण आपले विविध भावविचार रसिकांपर्यंत पोहोंचवीत असतो. ज्या वेळीं शब्द योजूनहि, मनांतलें कांहीतरी मागें उरलें आहे, वगळलें गेलें आहे ( व तें वाचकाला विशिष्ट विरामचिन्हांच्या सातत्यपूर्ण उपयोगानें मनोमन समजूं शकेल ) असें लेखकाला वाटतें, तेव्हांच तो तशा प्रकारचा नेहमींच्या ठोकळेबाज विरामचिन्हांचाहि त्याच्या दृष्टीचा बोलका नवा उपयोग करूं इच्छितो. अर्थात्, तसें करतांना, त्याच्या तसल्या विरामचिन्हांच्या वापरांत ( ज्याच्या–त्याच्या दृष्टीनुसार ) कमीजास्त सदोषता प्रकट होणें अपरिहार्य होय. शिवाय, लेखकाला रसिकांपर्यंत पोहोंचायला अक्षरांशिवाय दुसरें साधन नसल्यामुळें, लेखनसमयीं स्वतः योजलेलीं (वाचतांनाचीं) विरामस्थळें वाचकाला दाखवण्यासाठीं-स्वल्पविराम, अर्धविराम, उद्गार (एकेरी-दुहेरी), प्रश्न, टिंबें, विराम इ. खुणांचा लेखकानें आश्रय घेणें, हें वावगें ठरूं नये. प्रत्येकाच्या भाषेच्या विशिष्ट उपयोगासारखीच विरामचिन्हांच्या वापराची ही बाबसुद्धां

आपल्या गुणदोषांसकट जीवनांत नेहमीं हवीहवीशी वाटते
ती सुखद दिलजमाई आजवर वेळोवेळीं मला लाभूं देत आलेल्या

**बाळ (W. H.) करकरे, अप्पा (J. K.) फाटक,**
**काका (K. G.) कुळकर्णी,**

या माझ्या तीन (सहकुटुंब) स्नेह्यांना—

---

विशिष्ट समजली जावी. इतरांकडून अशा योजनेचें अनुकरण व्हावें असा आग्रह नाही; तें योग्यहि नव्हे; तथापि, त्याचा विशिष्ट हेतुपूर्ण वापर, त्या विशिष्ट दृष्टीनेंच रसिकांनीहि वाचतांना आकलन करावा, अशी अपेक्षा करणें, हें तरी चुकीचें ठरूं नये.

या दृष्टीनें, या बाबतींतला एक अनुभव, येथें जातां जातां सांगावासें वाटतें. नाट्य व नाट्य-दिग्दर्शनाच्या व्यवसाय-व्यापांत उत्साहानें व्यग्र असलेल्या एका तरुण जोडप्यानें, अलीकडेच, आमच्या सहजगत्या घडलेल्या परस्पर भेटींत मला मुद्दाम सांगितलें,—"तुमचं एखादं पुस्तक वाचत असतांना तुमच्या मनांतला आशय आम्हांला अधिक अर्थवाहीपणें मनोमन समजतो. या गोष्टीचा आम्हांला वारंवार अनुभव येतो. आम्हांला वाटतं, याचं कारण, तुम्ही त्या त्या वाक्यांत विरामचिन्हांच्या साह्यानें प्रत्यक्षाप्रत्यक्ष सुचवलेलीं विरामस्थळं, हींच होत !"—तें त्यांचें विशिष्ट मत ऐकून मला तरी न्यारा दिलासा मिळाला.

थोडक्यांत, कसलाहि विशेष आग्रह न धरतां, मला याबाबत येथें एवढेंच म्हणावेंसें वाटतें, कीं, विरामचिन्हांचा विशिष्ट प्रकारचा नेहमींहून जादा व नव्या हेतूंचा वापर अगदींच अर्थशून्य अथवा त्याज्य समजला जाऊं नये. असले आपापले प्रायोगिक उपयोगच आपल्या प्रिय भाषेला अधिक अर्थ-वाही करण्याचा सातत्याचा प्रयत्न करीत असतात. तसें करतांना चुका अथवा क्वचित् अतिरेक हा होणारच; पण हातीं लागणारें यश तेवढें घ्यावें.

१४ बी. हरजीवनदास एस्टेट, २५९-६०
व्हिन्सेन्ट रोड, दादर-मुंबई १४
नागपंचमी, ९-८-१९५९

स्नेहशील
रघुवीर सामंत

# विडा चांगला रंगवा !

माझ्या छोट्या छोकऱ्याचा वाढदिवस होता.

आमच्या जिवाचा तो राजा असला, तरी त्याचा वाढदिवस, म्हणजे कांहीं कुणा राजाचा वाढदिवस नव्हे; आतां योगायोगानें, त्या दिवशीं रविवारहि असल्यामुळें जगालाच सुटी होती,...हें मात्र खरं !

अर्थात्, साप्ताहिक सुटीच्या त्या चालू 'दिल-चाहेल-रेंगाळ'-कार्यक्रमांत, आमच्या या घरगुती गोड समारंभानें आणखी एक भर पडली होती.

समारंभाला हजर मंडळी तशीं आम्हीच—इन-मिन-तीन ! तो-ती-तें ! !

पण, तिनें आपला एक गंमतीचा थाट केला होता—

छोटा तांबडा पाट, छोटी लोटी...छोटा प्याला; रंगीबेरंगी रांगोळीच्या छोट्या वर्तुळांत, चकचकीत पॉलीश असलेली स्टेनलेसची छोटी ताटली; समोर तेवत असलेली समई; त्याजवळपासच पडलेल्या छोट्या ताम्हणांत, चांदीचा बिट्टकला कुंकुम-करंडा; नि चांदीचंच तूपवातीचं इवलंसं निरांजन...

—त्याच्या खेळांतल्या सानुल्या ओगराळ्यानें, त्याच्या त्या ताटलींत, भाताची एक व (मुद्दाम राखून ठेवलेल्या घरगुती रव्याच्या) बदामी शिऱ्याची दुसरी केशरी, अशा दोन मुदी तिनें पाडल्या...

तेव्हां मात्र, मला एकदम हंसू आलं.

पण तिकडे पाहिलं न पाहिलंसं करूनच, बाळाच्या कपाळाला कुंकवाचा टिळा–तांदूळ लावून, तिनें ओवाळलं; नि वत्सल हंसत ती म्हणाली, "हं कराऽ सुरुवात, राजेश्री ! सुखाऽनं जेवा–सुखाऽनं वाढा ! !..."

अर्थात्, मला उद्देशून नव्हते ते उद्गार; तरी मीहि, हंसत हंसत सुरवात करीत, म्हणालों—"करतों ! करतों ! पण, मला नाहीं ग वाढलीस त्या ओगराळ्यानें मूद...?"

"एवढ्याचसाठीं मोठ्यांचे वाढदिवस करत नाहींत, बरं ऽ! सदाची तुमची टिंगल ! ती असो. पण...तो पाहिलांत का, आनंदानें किती गोंधळला आहे...?" मला दुर्लक्षून, त्याच्याचकडे टक लावून पाहात, ती म्हणाली.

खरोखरच, अगदीं चमकत्या डोळ्यांनी, आपल्यासमोर लवलवणाऱ्या निरांजन–ज्योतीकडे, चिमुकल्या ताटलींतल्या त्या इवलाल्या मुदींकडे...पाटा-लोटीकडे, अगदीं तरळत्या चौफेर नजरेनेंच तो पाहत होता.

तांदळाचे दाणे चिकटलेलं त्याचं कुंकुमांकित कपाळ, मोठं खुलून दिसत होतं, त्याक्षणीं—माझ्या विश्वांतच मावत नव्हतं तें !

पण मग, त्याच्याकडे पाहण्यांतच गर्क झालेल्या त्याच्या आईचाहि साधा-सुधा चेहरा, तितकाच आनंदला–गोंधळला होता,–त्याच्याबरोबर ! त्या साऱ्या इवलाल्या गोष्टी एकत्र समोर आल्यामुळें, त्याला जितका आनंद होत होता, त्यापेक्षां,...तिचाच तो आनंद अधिक होता,...माझ्यामतें...

मी हळूच तसं बोलून दाखवतांच, तिची ब्रह्मानंदी लागलेली टाळी ओसरली; नि थोड्या फणकाऱ्यानेंच ती मला म्हणाली,—"पुरें झालं बरं ऽ विश्लेषण !...हौस असते आपली माणसाला;...त्याचं असं मोल का करायचं ?—लहानसा का होईना—आनंद मिळतो ना त्यांतून ?... बस्स तर !...तत्त्वज्ञान पुरे तुमचं..."



त्या पोराची सारी अर्थहीन बडबड ऐकत, हंसत खेळत, सावकाशीनें जेवण संपल्यावर, मलाहि तें पटत गेलं...जीवनांतला कोणताहि आनंद,...हळूहळू, खेळत खेळत, समारंभपूर्वक भोगण्यांतच, खरी मौज नि रसिकता असते !

मी जेवून उठलों, तों ओटीवरच्या खिडकींतून आमचे शेजारी दिसले;... ते एकदम तोंडभर हंसले नि मला म्हणाले..."कां ? खाणार क् पान ?... या ऽ...या ऽ न्..."

माझ्या घरच्या नुकत्याच उरकलेल्या त्या गोड समारंभाची नि माझ्या मनाच्या त्यावेळच्या आनंदाची, त्यांना कसली कल्पनाहि नव्हती.

सहजगत्याच ते तसं म्हणाले नि मीहि पटकन् 'हो' म्हणून, बाहेरहि पडलों,...,अगदीं त्याच उत्साही मनःस्थितींत...

त्यांनी तसं मला बोलवावं नि मी जावं, हें अनेकदां घडतं...

तसं पाहतां, माझ्या परिचयाचे पान खाणारे दोघे आहेत.

आणि दोघेहि, कांहींशा आस्थेवाईकपणें, मला कधींमधीं विचारतात, 'खाणार का पान ?'—

दोघांनाहि, कित्येकदां मीं 'हो' म्हणतों, जातों, खातों. त्या संगतींत रंगतों.

एक ते पलीकडे राहणारे दत्तूकाका ! नि दुसरे हे आमचे अप्पा...

ते दोघेहि पान खाण्याचा आनंद नेहमीं भोगतात !

पण दोघांकडे मला वारंवार येणारा अनुभव मात्र किती परस्परभिन्न ?

आजच्या माझ्या मनःस्थितींतच खरी प्रचीति आली मला, त्या गोष्टीची–

मी 'हो' म्हटलं, कीं, दत्तूकाका उठतात; आधींपासून आपल्या तोंडांत चघळला जात असलेल्या विड्याचा निःसत्व चोथा, अगदीं बेफिकीरीनें, फर्रर्रकन् ग्यॅलरींतून ते खालीं थुंकतात;...आपल्या अस्ताव्यस्त टेबलाकडे लगबगीनें वळतात; आपल्या खुर्चीवर लोळत पडलेलीं वर्तमानपत्रं–कपडे बाजूला काढून टाकून, मला आधीं बसायला कशीबशी जागा करून देतात....

आणि मग ?...दिडकीच्या पुडींतली–दुकानदारांनेंच केव्हां तरी त्रेतायुगांत कातरून ठेवलेलीं—सुपारीचीं खांडं पुढें करून, कात–तंबाखूची एक एकत्र

पुडी ते सोडतात; नि 'थांबा हं!' म्हणत, सुकलेल्या चुन्याच्या पुडींत पाण्याचे थेंब टाकायला, ते लगबगीनें घरांत जातात.

आणि त्यांनीं माझ्यापुढं टाकलेलीं तीं पानं !...कधीं तीं ( लग्न-समारंभां-तल्या औपचारिक पानसुपारीसाठीं आणतात तशीं ) हिरवीं नि ओबडधोबड असतात; तर कधीं, तीं खग्रास ग्रहणाचीं चित्रं दाखवणारीं, पण पिवळीं असतात. उलट, कधीं तजेलदार दिसणारीं अस्सल रामटेकींहि असतात.

मात्र एक ! कशाचा कशाला कांहीं नेम नसतो कधींच !...एवढंच !

पण तेंच, तुम्ही माझ्यामागून एकदां आमच्या अप्पांच्या घरीं आजच्या सारखं पान खायला या. माझं आमंत्रण आहे तुम्हांला.

तुमच्या डोळ्यांचं नि मनाचं पारणंच फिटेल ! पान खाण्यापूर्वीं,... खातांना, नि नंतरहि...

अप्पांच्या टेबलावरच, मध्यभागीं व्यवस्थित ठेवलेला चांदीचा मोठा डबा दिसेल. प्रथम तुम्हाला आस्थेनें गादीच्या खुर्चीवर बसवून झाल्यावर, डब्याचे सारे खण भरभर उघडून, अप्पा ते टेबलावर मांडतील; आंतून काढलेली एक एक चांदीची डबीहि पटपट उघडली जाईल ! या एकींत काजळासारखा मऊ सुगंधी केशरी चुना; त्या दुसरींत काताची पूड; तिसरींत वेलचीची पूड; चौथींत लवंगा नि जायफळ पत्री; पांचवींत ( पंचमस्थानाची मानाची जागा पटकाव-णारा ) पुणेरी काळा जर्दा नि 'मोहनी'—

सारं कसं अगदीं छानदार,...एखाद्या प्रदर्शनासारखं वर्तुळाकार मांडलेलं !— त्या मांडणींत एक शिस्त नि कलादृष्टि आढळेल, तुम्हांला.

खालच्या खणांत, दमसर मेणकापडांत गुंडाळलेलीं, टवटवीत पक्कीं पानं असतील; त्यांतलं एकेक पान निवडून, तें आपल्या गुढग्यावर टाकलेल्या नॅपकिनला पुसत पुसत, संथपणें ते तुम्हालाहि हसून पुसतील—"किती ? एक...कीं दोन...कीं तीन ?"

तुम्ही ( आपल्या लहरीप्रमाणें )—'तीन' म्हणून, पानांसाठीं हात पुढें केलांत, तरी तुमच्या अनभिज्ञ हातांत, कधीं चुकून देखील, ती अजोड जोड ते देणार नाहींत.



उलट, पुढं आलेला तुमचा तो हात आपल्या लक्षांतच आला नाहींसं दाखवून, तुमच्या बरोबरच्या इतर गप्पा तशाच एकीकडे पुढें चालू ठेवीत, दुसरीकडे...प्रत्येक पानांतल्या अगदीं बारक्यांतल्या बारक्या शिरांचे सुद्धां पापुत्रे, ते इतके सफाईदार नि छानदार काढतील, कीं, क्षणभर,...त्या टवटवीत पानांऐवजीं, त्या उद्योगांत गुंतलेल्या अप्पांकडे नि त्यांनी काढलेल्या त्या शिरांच्या झिरझिरीत पापुत्र्यांकडेच, मोठ्या कौतुकानें टक लावून पाहण्याचा, तुम्हांला सहजासहजीं मोह व्हावा !—

मग, त्याच ओघांत, आपल्या मधल्या बोटानें, त्या पानांना ते सफाईदार केशरी चुना फांसतील; काताच्या भुकटीचा त्यावर हळुवार पाऊस पाडतील. पुढं, सर्वांत मोठ्या चांदीच्या डबींत ठेवलेल्या, दोनतीन उत्तम श्रीवर्धनी सुपाऱ्यांकडे ते वळतील. त्यांपैकींच एक ( केवळ त्या क्षणींची खास लहरी निवड म्हणून ) हातांत घेऊन, सर्व बाजूनीं ती निरखून पाहतील ते.

धागाऱ्या खुळखुळणाऱ्या आपल्या चांदीच्या आडकित्त्यानें, आधीं तिचे दोन तुकडे करून, पुन्हां बोलतां बोलतां थबकून, ते तुम्हांला विचारतील— "हं...बारीक हवी कीं खांड ?"

तुम्ही 'बारीक' असं म्हणालांत, कीं, त्यांची गाडी पुढें सुरळीत सुरू होते !...मग, ती सुपारी इतकी कुशल नि हळुवार हातानें ते कातरतील, कीं, सांगून सोय नाहीं.

त्यांनी आपल्यासमोर मांडलेल्या पानांवर, त्यांच्या बोटांतून पडणाऱ्या भुंस-भुशित किसांतल्या कणा-कणावर, तांबसर—पांढऱ्या ठिबक्याची-त्यांनी आपल्या त्या कौशल्यानें स्वतःच जणू काढली असावी, असा भास उत्पन्न करणारी,... एक छानदार वेलबुट्टी तुम्हाला दिसेल !—

मग, इतर मसाला,...कातळी,...जायफळ,...सारं झटकन् टाकून, लवंग टोचलेले दोन सुबक गोविंद-विडे ते तयार करतील.

त्यांतला एक तुमच्या पुढें करून, दुसरा संथपणें आपल्या दातांत धरतील; नि मग, जरा बोबड्या शब्दांत, अवांतर चालू गप्पाहि तशाच पुढं चालू ठेवतील.

बोलतां बोलतां उठून, घासून पुसून चक्क केलेली पितळी पिकदाणी, दोघांच्या मध्यें आणून ठेवतील; तेव्हां समजावं—' आतां विड्याला खरा रंग भरला!'...

इतक्या सोपस्कारानें तयार करून, आपल्या हातीं दिलेला तो सुंदर विडा! त्याला दांतांत चुरडण्यापूर्वी, जरा भांबावल्यासारखंच वाटतं, माणसाला!

अखेर, उत्सुक आनंदानें तुम्ही तो तोंडांत ढकलतां न ढकलतां, इतक्यांत, तिथल्या चांदीच्या डबींतून, स्वतःसाठीं तंबाकूच्या एकदोन चिमटी उचलून घेत, (मनांत पुरा संशय बाळगूनहि) ते तुम्हांला आस्थेनें हळूच विचारतील— "का? झालं ना सारं यथास्थित?—रंगला ना तुमचा विडा?...बरंऽ आतां? घेणार का पंचम?"

वाटतं—' अप्पांकडे नि अप्पांच्यापुढं, त्यांच्या हातचं तसलं पान खायला बसण्यासाठीं सुद्धां, माणसानें एकेक जन्म घ्यावा!'

आणि अप्पांच्या कृपेनें, माझ्या या एकाच जन्मीं, आजपर्यंत, नाहीं नाहीं तरी, तसले पंचवीस जन्म पदरीं पडल्याचं समाधान मला लाभलं आहे!

धन्य अप्पा नि धन्य मी!...

खरंच, हौस-शौक यांना मोल नसतं! आपल्याला जीवनांत मिळणाऱ्या लहानसान तुटपुंज्या आनंदाबरोबर, असा संथ खेळ खेळण्यांतहि, एक प्रकारचा न्याराच आनंद लाभतो माणसाला!...

—मघां जेवतांना, तें बाळाभोंवतालचं सारं पाहायला, आमच्या बाळाच्या आईला कां आनंद वाटला, तें आतां मला अप्पांकडे खरं कळलं!

बाळाच्या वाढदिवसाचा गोड आनंद, खेळत खेळत, चाखत चाखत, मनसोक्त भोगत होती ती!...' एक घाव दोन तुकड्यांत ' समजलं नाहीं मला.

तसं कशाला? हेंच घ्या ना!

हे अप्पा नि ते दत्तुकाका; दोघेहि पान खाणारे!...पण, दोघांना त्यांतून मिळवतां-देतां येतो त्या विभिन्न आनंदाच्या जोड अनुभवावरून; माझ्या मनाला अनेकदां मनापासून वाटतं, "दत्तूकाकांना पान खाण्याचं नुसतं व्यसन आहे;...अप्पांना पान खाण्याचा बडा शौक आहे!...दोघांना आनंद देणाऱ्या वस्तू त्याच खऱ्या!...पण, अप्पा खानदान, खेळकर, शौकिन; तर दत्तुकाका केवळ अल्पसंतुष्ट, व्यसनी!"...



तशा जगांतल्या प्रत्येक पानाला विविध रचनेच्या सूक्ष्म शिरा असतात!...

पण दत्तुकाका अधीर; त्यांचा आनंद एकतर्फी!...त्यांतलं बारीक सारीक कांहींएक न पाहतां, पान नुसतं खाऊनच टाकतात ते!

उलट, अप्पांचा आनंद द्विविध; एक-जीवनांतला (पान खाऊन टाकून) विडा उत्तम रंगवण्याचा; नि दुसरा, त्यापूर्वीं, प्रत्येक पानींवरील शीर न् शीर देखील न्याहाळून पाहिली असण्याचा!—अखेर, प्रत्येक वेळीं, आपला विडा चांगला रंगवला असण्याचा!!

या खेळकरपणानेंच जीवनांतील लहानसान आनंदाला मौज येते!—पटतं?

मग, प्रत्येक वेळीं, आपल्या जीवनांतला विडा असाच चांगला रंगवा तर!...खाणाऱ्याला नि पहाणाऱ्याला दोघांनाहि तो सदा संतुष्ट करतो!

●●●

# तुमचे-आमचे संदेश !

सर्वांनाच अनुभव असेल; साधारणतः, 'मोठ्या' माणसांच्या 'मैदानी' सभांना, छोट्या माणसांची, अगदीं काळ्या मुंग्यांसारखी रीघ लागते. कोणी येतात त्यांना पाहायला; कोणी त्यांना ऐकायला; कोणी तर–नुसते तिथं जमलेलीं कांहीं माणसंच पाहायला जमतात. त्या सहस्रांचे लक्ष हेतु आपल्याला तरी कसे समजावेत ?

हजर असलेल्या त्या हजारांत, एक जरा चमत्कारिक जात मात्र निश्चित हजर असतें. स्टेजजवळपासच्या अव्याहत लुडबुडींतून, हातांतल्या कापडी बायंडिंगच्या नाजुक चिमुकल्या बुकांसह होणाऱ्या त्यांच्या अस्वस्थ चौफेर फेऱ्यांवरून ( व नेहमींच्या आपल्या अनुभवाच्या संधानांचा आधार जमेस धरून ) त्यांच्या हेतुबद्दल तरी आपल्याला एक स्पष्ट अनुमान करतां येतं.

आपल्याला चटकन् सांगतां येतं, कीं, तिथं जमलेल्या 'मोठ्यां'च्या स्वाक्षरी-संदेशांमागेंच लागलेले, ते तरुण, उत्साही, तडफदार वीर आहेत !

ते मोठे भाग्यवान् असतात ते. त्या निमित्तानें, मोठ्यांशीं त्यांचा नित्य नि निकटचा संबंध येत असतो. किंबहुना, सारीं मोठीं माणसं ( त्यांच्या स्वाक्षरी-संदेशांच्या रूपानें ) आपल्या अगदीं खिशांतच घालून नेहमीं फिरण्याचा त्यांना एकमेव मान असतो.



पण, त्यांच्या मनांतली मोठ्यांत मोठी शिकंदर सुप्त महत्त्वाकांक्षा तर अशी असते, कीं, जगांतल्या ( जमतील तितक्या ) जास्तींत जास्त—नि जमलं तर सगळ्याच—मोठ्या माणसांना, आपल्या खिशांत तसं सहज लीलेनें घालूनच, आपल्याला जगांत वावरतां–फिरतां यावं. तेवढ्यासाठीं, आपल्या ( नि ओघानेंच त्या मोठ्यांच्याहि ) जीवांचा ते नेहमीं अगदीं आटापिटा करत असतात.

म्हणूनच, एखादा मोठा प्राणी तसा त्यांच्या खिशांत एकदां पडला रे पडला, कीं, प्रयासानें मारलेल्या एखाद्या शिकारीचा अभिमान त्यांच्या डोळ्यांत चमकतो. डर्बी लागल्याचं समाधान चेहऱ्यावर झळकतं. नि बाजीरावासारखी छाती पुढं काढून, भोंवतालच्या गर्दींतून, संथपणें डुलत डुलत, ते साभिमान चालूं लागलेले आढळतात—

संग्रह-परिग्रह-मालकी हक्क अशा प्रकारची–जैनांनीं मना केलेली–संमिश्र भावना क्षणभर सोडली, तरी मला आपला नेहमींच एक प्रश्न पडतो; तो असा–कीं, आपापल्या घरीं गेल्यावर, त्यांच्यांतले किती जण, त्या संदेशांतलं कितीसं वाचत असतील ? तें ज्ञान वाचून, त्यांतल्या अर्थानें, त्यांच्यांतले कितीसे नाचत असतील ? त्यांतल्या किती जणांना त्यांतलं कितीसं पचत असेल ? नि त्या पचलेल्या दिव्य संदेशांच्या पायावर, त्यांतले किती जण, आपलीं खरीखुरीं भावीं दिव्य आयुष्यं प्रत्यक्षपणें रचत असतील ?

पण मग, इतकं असूनहि, याच जातीच्या ( मिसरुड न फुटलेल्या ) कांहीं विशिष्ट प्रतिनिधींकडे मात्र, नेहमीं, सहानुभूतीनें नि कौतुकानेंच पाहावसं मला वाटतं....

कारण, माझ्या मतें, त्यांच्या आयुष्याच्या त्या विशिष्ट कालखंडांत, तसल्या विभूतिपूजेचा त्यांना जन्मसिद्ध नि निसर्गदत्त हक्कच असतो. त्या उपद्व्यापांमधून तशीं त्यांच्या खिशांत पडलेलीं मोठीं माणसं, कदाचित्, त्यांच्या हृदयांत अगर उत्तमभागीं चढून, तिथंहि तीं कायमचीं प्रस्थापित होण्याची बरीच शक्यता असते ! समाजाचा तो एक अप्रत्यक्ष पण मोठा फायदाच असतो !

हो, त्यांना हस्तगत झालेले ते संदेश, ( त्यांना व इतरांना नकळत ) कदाचित्, त्यांच्या पायांत नवा जोम, नेत्रांत नवीं क्षितिजं, हृदयांत अभिनव

स्पंदनं, मनगटांत नव्या माणुसकीचा प्रभावी जोम उत्पन्न करण्याचा दाट संभवहि कांहीं कमी नसतो !

आणि म्हणूनच, त्यांच्या त्या जिज्ञासा-कुतूहलपूर्ण धडपडीचं, नि हाल-चालींचं मला सहानुभूतिपूर्ण कौतुकच करावंसं वाटतं.

पण उलट, असल्या विभूति-पूजेपेक्षां प्रयत्नाला, असल्या इतरांच्या संदेशांपेक्षां स्वतःच्याच मनन-विचारांना नि स्वकर्तृत्वदेवतेच्या छोट्यामोठ्या पूजेलाच मान व महत्त्व द्यावयाच्या, त्यापुढल्या नवजवानीच्या प्रारंभकाळींहि, कोणी हा नसता खटाटोप करीत फिरत असल्याचं दिसलं, कीं, मला तें नुसतें हास्यास्पदच वाटत नाहीं, तर त्यांचा तीव्र रागहि येतो मनांत !—जीवनांतील क्षणाक्षणाचा तसला डोळस अपव्यय मला मुळींच सहन होत नाहीं.

यांत कोणाला नाहक गांभीर्याचा सुतकीपणा आढळला, तर माझा इलाज नाहीं; पण मग—असले हे न्यूनगंडस्थित पण अहंगडी निरर्थक शौक कर-ण्याचा—असला हा सामाजिक संसर्गजन्य रोग, मला तरी खपत नाहीं, एवढं मात्र खरं !

यावरूनच, माझ्या जवानींतील एक प्रसंग मला इथं घसघशीतपणें आठवतो आहे.—

त्या वेळीं, मी असली विभूति-पूजा करीत नव्हतों, पाहतहि नव्हतों. उलट, त्या दिवशीं, मीच अकल्पितपणें विभूति-पूजेचं एक स्थान झालों होतों. (अप्रत्यक्ष आत्मश्लाघेचा दोष क्षणभर पत्करूनहि) इथं कांहींशी प्रस्तुत म्हणून, ती घटना मला सांगावीशी वाटते. तसला 'प्रसंग' पुन्हां मजवर कधीं आला नाहीं, याचं मला आज समाधानच वाटतं.

होय ! तो एका सामान्यावर योगायोगानें आलेला एक असामान्य प्रसंगच होता.

"अशा वेळीं, इतर विभूतींचे कोणते मनोव्यापार होत असतील, नकळे. पण, माझ्या त्या औट घटकेच्या विभूतिमत्वाचा फुगा जो फुटला, तो असा.—

पहिलंच पुस्तक नांवाजलं-गाजलेलं नि त्याच वेळीं, मी आपल्या नव्या



मासिकाचा पहिलाच घसघशीत अंक, रसिक—संमेलनापुढें टाकलेला ! तेव्हां, थोडक्यांत, त्या क्षणीं, मी एका रात्रींत 'प्रकाशांतील व्यक्ती' झालों होतों.

त्यांत पुन्हां, लहान मुलाच्या कुतूहलपूर्ण उत्साहानें, त्यावेळीं, (प्रतिवर्षीं स्थळपालट करणाऱ्या वाङ्मयीन उरुसांत) रसिकांच्या मेळाव्यांत, मी–पूर्वीं कधीं नव्हे तो–सामील झालों होतों. म्हणजेच, प्रथितयश विभूतींच्या स्वर्गांत नि माझ्यांत, असं केवळ दोन बोटं अंतर उरलं होतं.

त्या रसिक-संमेलनांत, रात्रौ काव्यगंगेचा झोत,...प्रवाह सुरू झाला.

कोणा एका कवीची अर्धी कविता म्हणून होत आहे नाहीं, तोंच, रसिक-वृंदांत एक काल्पनिक साप शिरला. 'साप साप' ची आरडा-ओरड नि धोपटाधोपट होऊन, त्या कविवराची ती उरलेली अर्धी कविताच त्यांत अधिक बडवली गेली नि हवेंत विरली.

मग, दुसऱ्या एका कविवरांना–'पुरे–पुरे–ओढा खालीं !'...अशी रसि-कांची पहिली सलामी,...नि–'सारी संपल्याशिवाय नि तुम्ही ती ऐकून घेतल्याशिवाय, जागचा एक तसूभरहि नाहीं हालायचा मी !' हा त्यांचा स्टेजवरून रसिकांवर झालेला भावपूर्ण प्रतिहल्ला !

तो दुसरा प्रवेशहि, तसा अर्ध्यावर संपला.

आतां योगायोग असा, कीं, (आधींच अनभिज्ञ गाफीलपणें दिलेलं) माझं नांव, बरोबर त्याच प्रसंगपरंपरेपाठोपाठ, तिथल्या व्यवस्थापकांनीं अकस्मात् पुकारलं.

नाइलाज होता, म्हणूनच, दूरध्वनीसमोर मी ब्रिचकत ब्रिचकत उभा राहिलों. तत्काळ, माझ्यावर 'नांव घ्या' ची रसिक ललकारी आपटली.

क्षणभरच, अतिशय गोंधळून, मी अखेर थबकत थबकत पुकारलं—"थांबा. इकडे जरा बघा—मी ठाण्याचाच आहे, बरं का ! दुसरं म्हणजे, ...मी स्वतः कवीहि नाहीं. तरी पण (न लाजतां, मंगळागौरीसारखं !) आतां तुमच्या इच्छेप्रमाणं नांव घेऊन टाकतों !...पुढं तुमची परवानगी असली, तर दुसऱ्या कवीची एखादी कविताहि म्हणेन, म्हणतों मी–"

तेव्हां मग, तसल्या ठाण्याच्या माणसाशीं मात्र, त्या तिथं जमलेल्या रसि-

कांचं लगलीच एक नैसर्गिक सख्य झालं. नि एकच नव्हे, लागोपाठ दोन कविता म्हणायला देखील, त्यांची मला परवानगी मिळाली !

तथापि, आल्या प्रसंगाचं औचित्य जाणून, फक्त एकच कविता रुजूं केल्यावर, मी झांकल्या मुठीनें खालीं उतरलों.

कपाळावर डबडबलेला घाम पुसून, तेथून मी दूर होतों न होतों, तोंच, हातांत छोट्या छोट्या वह्या घेतलेल्या पांच सहा नवजवानांची रांग माझ्या-समोर येऊन-उभी राहिलेली दिसली.

आश्चर्यानें दचकून तिकडे मी पाहतों, तोंच, त्यांतले एकदोघे पुढं होत, सहास्य मला म्हणाले, " अहोऽ–तुमचा जरा ऑटोग्राफ द्या !–नि छानदारसा संदेश, एक..."

हे असले 'प्रवेश' त्यापूर्वी मी पाहिले होते; पण केवळ त्रयस्थ दृष्टीनें. त्या वर्तुळाच्या मध्यबिंदूची, त्यांतल्या 'हीरो'ची भूमिका, माझ्या वांट्याला तोंवर कधींच आली नव्हती. पुढें कधीं येईलसं ध्यानींमनींहि आलं नव्हतं. खरं सांगायचं, म्हणजे–अशावेळीं लोक काय करतात, त्याचा मला अनुभवच नसल्यामुळें, मी तर अक्षरशः गोंधळलों-भांबावलोंच होतों.

तरी पण, त्याक्षणीं, पहिल्या प्रथम, माझ्या अहंपणानेंच मला ओरडून साद घातली, " अरेऽ बघतोस काय ? हं—हीच वेळ आहे; कर कीं झकास फर्ड्या सह्या ! लहानपणीं, नको तेव्हां, वर्गातल्या प्रत्येक पुस्तकावर कशाला डझनावारी सह्या भरकटायचास ? आतां का ऐनवेळीं शेंपूट घालतो आहेस तूं ? नि, दे–कीं, त्यांना दहापांच संदेश देखील. सांग त्यांना–म्हणावं, 'चणे खावे लोखंडाचे–' 'जीवन ही एक प्रचंड लढाई आहे–' 'प्रयत्न हाच परमेश–' 'मोठेपणाचा मार्ग माणुसकीच्या मैदानांतून—' 'क्रियासिद्धिः सत्त्वे भवति महतां नोऽपकरणे–"

पण तो दंभ मला कांहीं केल्या जमेना. तसला अभिनिवेश, उसना आणूनहि, माझ्यांत येईना.

ऐनवेळीं हातांतली लेखणी गळून पडल्यागत, (अर्जुनासारखी) माझी अगदी भांबावलेली स्थिति झाली असतांनाच, पहिल्याची वही मी नाइलाजानें



हातांत घेतली; नि मनाला धीर आणण्यासाठीं, घसा खांकरून त्याला म्हणालों, " काय ?—माझ्या हस्ताक्षराचा नमुना हवाय् तुम्हांला ? ठीक—"

माझी ती पहिली जाहीर सही पुरी होण्यापूर्वींच, त्याच्या पाठोपाठचा दुसरा जवान मला म्हणाला, "तुमचा ऑटोग्राफच नको हं नुसता; छानदारसा संदेशहि हवा, बरं का, एखादा !"

चमकून समोरच्या त्या कॉलेजजवानांकडे मी पाहिलं व संकोची स्मित करून, त्याला पुढं म्हणालों, " कॉलेजांत जातां ?—कोणत्या वर्गात ?"

" ज्यूनीअरमध्यें—"

" तुम्ही ?"

" इंटरमध्यें—"

" तर मग, मीहि यंदा सीनिअरमध्येंच आहें !—तीन महिन्यांनीं तुमच्या-सारखाच परीक्षेला बसणार आहें. मग आतां,...कसला देऊं म्हणतां छानदारसा संदेश मी तुम्हांला ?"

माझा कसला हेतु नसतांहि, तिथं वाङ्मयांतला साक्षात् 'विरस' निर्माण झाला होता ! बॅथॉस का कायसं म्हणतात ना ? तो !...

त्यामुळेंच, त्यांच्यांतला पहिला दूर झाला; तरी दुसरा पुढं सरकून, मला अधिकच आग्रही स्वरांत म्हणाला, " असं हो काय करतां ? द्याऽ ना—कसलाहि संदेश द्या ! चालेल आम्हांला—"

स्मित करून, पुढल्या दोघांचीं वयं मी विचारलीं व मग म्हणालों, " वीस न् बावीसच ना ? मग, माझी एक दोनच वर्षं जास्त ! म्हणजे, तसे बरोबरीचेच कीं आपण सारे ! मग कसला संदेश देणार, शिकवणार मी तुम्हांला ?"

तसल्या त्या अनपेक्षित प्रश्नोत्तरांनीं, त्या दोघांचींहि तोंडं कडवट-खारट झालीं. तेवढ्यांत, माझ्या पुढल्या प्रश्नाला तिसऱ्यानें उत्तर दिलं, " चाळलंय् तुमचं पुस्तक !"

मी हंसून थोड्या थट्टेनेंच म्हणालों, "नुसतं चाळलंत ? असं का बरं ? वाचा ना चांगलं एकदां तें—शक्य तर मुद्दाम स्वतः विकत घेऊन ! ती

खरी रसिकता ठरेल ! आणि मग, त्या पुस्तकांत बरीक सांपडतील माझे कांहीं संदेश सांपडले तर तुम्हांला ! !...खरं ना ?..."

क्षणभरच्या त्यापुढल्या शांततेनंतर, माझ्या हातच्या त्याच्या उघड्या वहीकडे पुन्हां वळत, मी म्हणालों—" इथं सही करतों, हवी तर, असूं द्या एक माझ्या हस्ताक्षराचा नमुना तुमच्या संग्रहांत—"

पण मग,—त्यामुळेंच—बघतां बघतां, त्याचा चेहरा पालटला !

टवकारल्या दृष्टीनें माझ्याकडे रोषानें उलट पाहात, त्यानें माझ्या हातांतील आपल्या वहीला पटकन् हात घातला; ती खसकन् माझ्या हातून मागं ओढली; नि वळून दूर होतां होतां, तो शेजारच्या दोस्ताला म्हणाला, " कांहीं नको रे ऽ स्वाक्षरी नि संदेश !—हवाय् कशाला यांचा एवढा तोरा ? चल रे ऽ—त्या आपल्या...ह्यांचीच घेऊं या—"

आणि आश्चर्य असं, कीं, मला न् त्यांना नकळतच, त्या दोघांमागूनच, त्यांच्या मागली ती रांगहि क्षणार्धांत पांगली;...ती लांब सांखळी उल्कांप्रमाणें सैरावैरा निखळली !–किंवा, कळपाप्रमाणें पळाली ! !...

खरं म्हणजे, मला त्यामुळें हायसंच वाटलं !

मला अकल्पित प्राप्त झालेलं तें औट मिनिटाचं विभूतिमत्व !...त्याक्षणींच तें नाहींसं झालं होतं !...

मी पुन्हां एका निमिषांत, सामान्यांत जाऊन पडलों होतों !

भोंवतालच्या अखंड गजबजाटांत, त्या एका बाजूच्या कोपऱ्यांत, पुन्हां मी एकटाच उभा होतों.

मी स्वतःशींच एकाकीपणें हंसलों; नि त्यावेळीं मनांत विचार तरळले— " तोरा ? कसला तोरा त्यांत माझा ? त्याला दुरून साजरा वाटणारा एक डोंगर, त्याच्या दृष्टीनें, असा अनपेक्षित काजरा ठरला !—त्यानेंच नाहक मला चिकटवलेलं वलय, त्याच्या नित्यानुभवी अपेक्षेनुसार, मी कायम टिकवलं नाहीं ! ह्याच का तो माझा तोरा ?–दंभाचा मोह टाळून, त्यानेंच भावविवश अज्ञानानें ठरवलेली एक असामान्य विभूति, जाणूनबुजून सामान्य माणूसच



राहिली ! आपला साधा माणूसपणाच त्याला पुराव्यानिशीं सिद्ध करून देऊं लागली !—हाच ना तो माझा तोरा ?—त्याच्या खोट्या मागणीनुसार, दांभिकपणें, निरर्थक नि व्यापक संदेश पुरविण्याऐवजीं, त्यानें न वाचलेल्या माझ्या पुस्तकांतील ( ओघामध्यें आलेल्या ) माझ्या तळमळीच्या खऱ्याखुऱ्या संदेशाकडेच मी बोट दाखवणं, हाच त्याच्या दृष्टीनें माझा तोरा ! त्याचा अहंपणा, दांभिकपणा, त्यामुळेंच अकस्मात् डळमळला—माझ्या भोवतालीं त्याच्या कल्पनेनें तयार झालेलं वलय पार विरलं !

" पण त्याबरोबरच, आपल्या खिशांतील वलयांकित विभूतींच्या म्यूझियममध्यें, मलाहि टाकण्याचं त्याला हवं होतं तें समाधानहि विरलं;—त्याचाच अहंगड अधिक दुखावला. आणि मी ? उलट, होतों तितकाच साधा माणूस या नात्यानें, असलेल्या ठिकाणीं, बाहेर, सर्व सामान्यांच्याच पंगतींत मी उभा राहूं इच्छित होतों ! तरी, त्याच्या नेहमींच्या हमखास अनुभवामुळें, तेंच तेवढं त्याला पेललं नाहीं; पटलं नाहीं; परवडलं नाहीं ! "—

पण मग, अजूनहि, साधासुधा सामान्य माणूस म्हणूनच राहावंसं–वावरावंसं मला मनापासून वाटतं !

कारण, असलीं खरींखोटीं वलयं स्वतः आपल्याला व इतरांनाहि नेहमीं गोंधळवतात; स्वकर्तव्यच्युत करतात; असं मला तरी ठामपणें वाटतं.

हो !—नि म्हणूनच,—असल्या स्वाक्षरी–संदेशांसाठीं खटपटी-लटपटी करणारे नवजवान, कधींकाळीं, सभासंमेलनांमध्यें अविरतपणें वळवळतांना मला दिसले, कीं, या जुन्या स्वानुभवाच्या पार्श्वभूमीमुळेंच, मला त्यांचं हसूं येतं ! नि मग, माझं मलाहि एकप्रकारचं खिन्न कडवट हसूं येतं !

मला वाटतं, तुमचे-आमचे संदेश हे असे असतात ! !

●●●

# संगति नि रंग–संगति

तिथं बसल्या बसल्या, अगदीं स्तिमित नजरेनें, मी चौफेर पाहात होतों. त्यांच्या त्या प्रशस्त हॉलच्या भिंतींना निळसर ऑईलपेंट दिला होता. दारा खिडक्यांवर त्याहून जरा फिके निळसर असे तागाच्या कापडाचे झिरझिरीत पडदे लोंबत होते. आंत व्यवस्थित मांडलेल्या दोन्ही चेस्टरफील्ड सेटवरचं कापड नि मधल्या राऊंड टेबलावरचं टेबलक्लॉथ, दोन्ही त्याच रंगाची छटा मिरवीत होतीं. भोंवतालच्या किर्लोस्करी पोलादी खुर्च्यांवरच्या गाद्या नि खालीं फरशीवर ऐसपैस पसरलेला तो उंची पर्शियन कार्पेटहि,... त्याच निळसर झांकेचा...

रावबहादूरांच्या त्या 'निल–महाल' मधें, माझ्या प्रत्येक गोंधळलेल्या दृष्टीक्षेपाचं स्वागत निळा रंगच करीत होता. त्या तिथल्या नीलसाम्राज्यानें,... बघतां बघतां पुरता भांबावलोंच होतों, मी...

जरा पालट म्हणून, त्याच स्तिमित दृष्टीनें, पुढल्या दरवाजाच्या कोंपऱ्यांत मी दृष्टी फेंकली...



तिथल्या हॅट स्टँडवर निरनिराळ्या रंगा–आकाराच्या दहाबारा हॅटस् होत्या. त्यानजीकच, पॅसेजमध्यें, एका चामड्याच्या लांब पिशवींत–गोल्फच्या काठ्यांप्रमाणें—( करव्याकरव्याच्या, नागमोडी, हस्तीदंती मुठींच्या, चांदीच्या टोपणांच्या, गांठी–गांठीच्या नि निरनिराळ्या रंगेल पॉलीशच्या ) हातांत धरावयाच्या विविध प्रकारच्या काठ्या ( 'भात्यांत म्यान करून' ठेवलेल्या ) दिसत होत्या.

हॉलच्या दारांतच, पॅसेजजवळच्या छोट्या टेबलावर, एक नक्षीदार शिसवी रॅक होतं. सुमारें बारातेरा तरी–निरनिराळ्या आकाराच्या–रंगाच्या-लहान-मोठ्या पाइपस् त्यावर लटकत होत्या. आमच्या भेटीच्या वेळीं, आमच्या यजमानांच्या ओठांवर विराजून, चौफेर ऐसपैस धूर सोडीत असलेल्या एका गोंडस रुबाबदार पाइपची, त्या रॅकवरील एक जागा तेवढी रिकामी दिसत होती.

गप्पा मारतां मारतां, त्या पॅसेजपलीकडल्या त्यांच्या आंतल्या मोठ्या खाजगी खोलींत त्यांनी आम्हांला नेलं.

तिथं तर, शिकारीचं मोठं थोरलं एक म्यूझियम थाटलं होतं त्यांनीं—

ठोकळ्यावर व्यवस्थित बसवलेलीं, हरणांचीं, गव्यांचीं, सांबरांचीं ( जणुं भिंतींतूनच बाहेर माना काढून डोकावणारीं ) मुंडकीं; वाघनखांच्या (अफझुलखानाचा कोथळा काढणाऱ्या ?) माळा; जमिनीवर चौफेर पसरलेलीं...पट्ट्या-पट्ट्यांचीं, ठिबक्यठिबक्यांचीं, पिवळसर, वाघ–बिबळ्या–हरणांचीं लहानमोठीं ( वेदकालीन ऋषींची आठवण करून देणारीं ) मऊमऊ कातडीं; अंगांत पेंडा भरलेला ( पण, दांतांचे क्रूर सुळे दाखवणारा आपला जबडा, अजूनहि उघडा ठेवल्यामुळें ) अक्राळ विक्राळ दिसणारा, ऐसपैस आयाळाचा एक लांबलचक सिंह, एका कोंपऱ्यांत—

त्याच्याकडे अनपेक्षितपणेंच चटकन् दृष्टी गेल्यामुळें, मी क्षणभर अभाविततपणें दचकलोंहि;—पण त्यामुळेंच, ( त्या वनराजाभोंवतालच्या तिथल्या ससे, तरस, रानमांजर, इत्यादि ) त्याच्या लहानसान प्रजाजनांची, त्यानंतर मला भीति वाटली नाहीं.

जंगलघरच्या त्या साऱ्या भयंकर नागरिकांना, ज्यांच्या सहाय्यानें त्यांनीं गारद केलं होतं, तीं सारीं साधनं—बंदुका, रायफल्स, रिव्हॉल्व्हर्स, तरवारी, इत्यादि—निरनिराळीं सर्व मिळून निदान पंधरावीस तरी होतीं; तीं हत्यारं चारी भिंतीवरून मध्यें मध्यें सुबकपणें टांगलेलीं दिसत होतीं.

तिथलं तें सारंच वातावरण, पाहणाऱ्याच्या मनांत एक प्रकारचा दरारा उत्पन्न करीत होतं.

अगदीं केवळ योगायोगानेंच, त्या दिवशीं, रावबहादुरांच्या घरांत तसा फिरत होतों मी !

त्यांच्या एका 'गोऱ्या' स्नेह्याला वशिला लावणारी चिठी, माझ्या एका स्नेह्यासाठीं मला त्यांच्याकडून मिळवायची होती. (त्यांच्या शिकारीच्या जंगली फेरफटक्यांत नेहमीं सामील होणाऱ्या) माझ्या दुसऱ्या एका मित्राला हमखास मध्यस्थ म्हणून बरोबर घेऊन, त्यांतल्या त्यांत चांगला व्यवस्थित पोषाख स्वतः घालून, मी सकाळींच त्यांच्या 'नील महालांत' शिरलों होतों.

शेवटीं, पुढल्या निळ्या हॉलमध्यें बसून, आम्ही तिघांनीं, (निळसर ट्रेमधल्या निळसर कपबशांत निळसर किटलींतून ओतलेला) गरम गरम चहा घेतला. आम्ही बशींत ओतून, नेहमींच्या गांवठी संवयीप्रमाणें फुंकर मारून, झटकन् तो घशाखालीं उतरवला; पण, हातांत कप उचलून, प्रत्येक घोटाची मिटक्या मारीत चव घेत घेत, स्वतः रावबहादुर अगदीं संथपणें चहा संपवीत होते.

'चहा पिणं हाहि एक जीवनांतला महान् समारंभच आहे !' असा त्यांच्या त्यावेळच्या आत्मीय हालचालींकडे पाहतां पाहतां, मला अभिनव भास होत होता.

तरी पण, माझं उत्सुक मन मात्र, आलों होतों त्या मुख्य कामाकडेच मला अजून सारखं ओढत होतं, आंतून...

शेवटीं, माझा जीव भांड्यांत पडला.

कारण, चहाचा कप टीपॉयवर ठेवून, ते उठले नि टेबलाकडे वळले. मी उत्कंठेनें त्यांच्या पुढल्या हालचालींकडे पाहूं लागलों.



आपला सुबक मोनोग्राम एम्बॉस केलेल्या निळसर नोटपेपरवर (निळसर झांकेच्या गोल्डटॉप फिफ्टीवन् पार्करनें) मला हवी असलेली चिठ्ठी ते एकदांची लिहूं लागले.

अखेर, एका गडद निळ्या लिफाफ्यांत ती चिठ्ठी घालून, तशी उघडीच माझ्या हातीं देत, मला ते हंसून म्हणाले, "पहायलाच नको ! दोनतीनशें पौण्डांच्या वाघाच्या शिकारी केल्या आहेत मी, या फेदरवेटसाहेबाला बरोबर घेऊन !—तुमचं काम फत्ते—निश्चित जा !"

हातांतल्या लिफाफ्यावर मी पाहिलं–सुंदर रेखीव अक्षरांत निळसर शाईनं त्यांनीं तो पत्ता लिहिला होता.

तुकतुकीत दिसणाऱ्या त्यांच्या गौर चेहऱ्याकडे नि तुळतुळीत टकलामुळें भव्य दिसणाऱ्या त्यांच्या कपाळाकडे, मी उपकृतपणें पाहिलं; अनेक गोष्टींमुळें, माझं अंतःकरण त्यावेळीं विस्मित झालं होतं; गोंधळलं होतं...

तरी प्रसन्न मनानें मी अखेर खुर्चीवरून उठलों; हस्तांदोलन करीत राव-बहादुरांचा सस्मित निरोप घेतला; नि त्यांच्या 'नीलमहाला'च्या पायऱ्या उतरून, माझ्या मित्राबरोबर फाटकांतून बाहेर पडलों—

रस्त्यावरून आम्ही चालूं लागलों मात्र; माझ्या खांद्यावर एक जोराची थाप मारून, माझ्या स्नेह्यांनीं मला हंसत हंसत विचारलं—"का ? आहे कीं नाहीं,...शौकिन म्हातारा ! नाहींतर ऽ हेऽ तुम्ही-आम्ही ! मिस्ट ऽ र, एक दसलाखांची गोष्ट सांगतों–जगणं ही सुद्धां एक कला आहे ! बरं कां, गुरु ?"

त्याचे ते तुलनात्मक उद्गार कानीं पडतांच, त्या संसर्गानें क्षणभर मलाहि मनांतल्या मनांत वाटलं..."हं...आहे खरंच तसं ! रावबहादूर हे एक असामान्य शौकिन प्राणी, नि आम्हीं म्हणजे नुसतेच 'प्राणी',... गबाळग्रंथी"

पण तेवढ्यांतच, माझं मत्सरी मन, स्वतःपुरतं समर्थनहि करूं लागलं— "अरे बाबा ऽ–पण, एक गोष्ट आपण अशा वेळीं, नेहमीं विसरतों;– असल्या शौकाला पैसा नि फुरसत याचीं मुबलकता लागते, म्हटलं ! परि-स्थितीपुढं माणूस काय रडणार ? केवळ जगण्यासाठींच धडपडण्यांत,

आमचं जवळ जवळ सारं आयुष्य संपायचं ! आमच्या आयुष्यांतील अफाट विसंगति, थोडी फार तरी कमी करतां करतांच,...एकेक दिवस संपायचा आमचा ! कुठं कशाची कशाला संगतीच नाहीं ! तिथं येणार कुठली आमच्या जीवनांत ही असली शौकीन रंगसंगति ? ''

पण, तरी देखील, रावबहादुरांच्या जीवनांत दिसलेल्या त्या रसिक रंग-संगतीबद्दल नि त्यांनी आपल्याभोंवतीं–परिस्थितीनुरूप निर्मिलेल्या विविध सुखांबद्दल, माझ्या मनांतला अवतरलेला कौतुकपूर्ण आदर मात्र कांहीं केल्या कमी होईना !

—अजूनहि तें दृश्य, ती अनुभूति,...माझ्या मनःचक्षुंपुढं वारंवार नि हुबेहूबपणें उभी राहते.

नि मग वाटतं—' प्रत्येकाच्या जीवनांत जशी चांगली संगति हवी,... तशीच,...अशी रसिक शौकिन रंगसंगति सुद्धां हवी ! '—

●●●

# कशांत काय ?

एकेकदां कोणाकोणाचे चमत्कारिकच प्रश्न आपल्याला सामोरे येतात. उत्तरं देणं कठीण असतं; दिल्यावांचून चालत नाहीं; पण, आपल्या मनचं न्यारं उत्तर देण्याचा होणारा मोहहि आपल्याला आवरत नाहीं.

अशावेळीं, आपला एक मोठाच गोंधळ उडतो—' कशांत काय नि कशांत काय ?–'

प्रश्न चमत्कारिक म्हणण्याचं कारण, त्यामागं विचारणाऱ्याचं एक विशिष्ट, चमत्कारिक व्यक्तित्व दडलेलं असतं. आपलीं उत्तरं ' न्यारीं '–म्हणजे अशीं, कीं, त्यांचा रोख, जाणूनबुजूनच, प्रश्नांतील अपेक्षेहून निराळा असतो. तसल्या उत्तरांनीं, आपण आपलं, आपलंच रंजन व समाधान करून घेत असतों. खरं म्हणजे, तीं आपलीं ( जुन्या नाटकांतल्याप्रमाणें ) स्वगत भाषणंच असतात, माझ्या मतें !—

आज सकाळीं, दारांत पडलेलं वर्तमानपत्र, माझ्या पांचवींतल्या मुलानं आधीं उचललं. बातम्यांच्या हेडलायनींऐवजीं, सिनेमांतला (जाड·टायपांतला) ' जंगलचा राजा ' चटकन् त्याच्या डोळ्यांत भरला.

आणि तो एकदम ओरडला—“ ओ ऽ !...हें पहा– मुंबई शहरांत, उद्यां ‘ जंगलचा राजा ’ येणार !...जंगलांत नि शहरांत फरक ग काय, आई ? ”

“ हं–चहा घ्या ऽ ” माझ्या हातीं कप देऊन, त्याच्या मातोश्रींनीं त्याचा तो चमत्कारिक प्रश्न बेडरपणें राजरोस डावलला. मला तिच्या, त्याच्या व त्या जाहिरातदाराच्या कल्पकपणाचं, चहा घेतां घेतां, कौतुक वाटलं; हंसूंहि आलं.

आणि उत्तरादाखल, मीच, मला न कळत नाक खुपसलं – “ अरेऽ, जिथं वेली-झाडांचं जाळं असतं, तें जंगल !– आडव्याउभ्या गजबजलेल्या रस्त्यांचीं जाळीं व मध्यें गुरफटलेले ‘ पांढऱ्या हाताचे ’ छत्रधारी उंच ‘ खडे पारशी ’ जिथं दिसतात, तें शहर ! हजारों लहानमोठे भयंकर प्राणी, सदासर्वदा स्वैरपणें फिरून, क्षणाक्षणाला, एकमेकांना जिथं खायला उठतात, तें जंगल !— उलट, आपणच केलेले ‘ डाव्या-उजव्यां ’चे व वेगाचे सारे नियम धाब्यावर बसवीत किंवा पदोपदीं मोडीत, माणूस नांवाचा एकच एक प्राणी जिथं उद्धटपणें फिरतो, एकमेकांना जणूं खायला उठतो, टपून बसतो, त्या पृथ्वीच्या पाठीवरील भागाला, शहर असं म्हणतात. जंगलांत व शहरांत हाच मोठा फरक ! समजलं ? ”

पण माझं भाष्य संपूर्ण ऐकायला तो जागेवरच नव्हता मुळीं !

माझं मात्र, माझ्या उत्तरानें समाधान झालं होतं. कारण, तो प्रश्न त्याचा त्याच्या आईला असला, तरी उत्तर माझं मलाच होतं तें !

प्रत्यक्ष वा लाक्षणिक कोणत्याहि अर्थानें घ्या; लहानमोठ्या रस्त्यारस्त्यानेंच, मानवी संस्कृति एवढा मोठा पल्ला गांठून आलेली आहे. तरी पण, तो भयंकर मानव प्राणी, आपसांत एकमेकांना नामोहरम करायला, आपल्या आंधळ्या स्वार्थासाठीं, परस्परांना जणूं खाऊनच टाकायला, टपून बसलेला नाहीं कां आज दिसत ?—वागायला नियम नि चालायला रस्ता हा हवाच ! माणसाच्या वागण्यांत नियम;...त्याच्या शहरांत हमरस्ते—

“ काम चालूं–रस्ता बंद ! ”–रस्त्याच्या अगदीं मध्यभागीं, दोन पिंपांवर ठेवलेली एक तांबडी पाटी माझ्या मनःचक्षूंसमोर एकदम उभी राहिली. नेहमींच्या पायाखालचा डांबरी हमरस्ता, (काळ्या बर्फीच्या तुकड्यातुकड्यां-



प्रमाणें ) उखळलेल्या स्थितींत, खूप लांबपर्यंत पसरलेला दिसला; त्यांतूनच, मी माझी अडखळती वाटचाल करीत असल्याचाहि मला भास झाला. गुळगुळीत, सुलभ, प्रशस्त असा तो नेहमींचा रस्ता, त्याचंच तें महत्त्वपूर्ण असं ‘ अबोल ’ अस्तित्व, त्या क्षणीं माझ्या मनाला एकदम जाणवल्यासारखं झालं.

अत्यावश्यक पण नित्य सुलभ अशा गोष्टी काय, निकटवर्ती व्यक्ति काय, अतिपरिचयानेंच, त्यांची महति आपण साफ विसरून जातों. त्यांना कस्पटासमान समजून वागणं, हा एक मानवी मनोधर्मच आहे, मला वाटतं.

अठ्ठेचाळीसच्या वावटळींत, वीज तुटली होती; दोन रात्रीं, मुंबापुरीची अंधेर-नगरी झाली होती ! तें आठवतं का ? छटाक छटाक तांदूळ व बाटली बाटली घासलेट, यांच्यासाठीं लांब लांब ‘ क्यू ’ लागत असत; त्या, त्यापूर्वीच्या, चार चार फर्लांगी रांगा आतां आठवतात ?...आज पोटभर भात ओरपतांना नि विजेच्या ट्यूबा दिवसाढवळ्याहि पेटवतांना, हें कशाला आठवेल आपल्याला ?

घरांत, आपल्यासाठीं अहोरात्र निमूटपणें धडपडणाऱ्या–राबणाऱ्या, आपल्या प्रत्यक्ष आईच्या अस्तित्वाची खरी कल्पना आपल्याला होते ती केव्हां ? कधीं काळीं, अगदींच ‘ नज होऊन ’ ती बिछान्याला खिळते ( किंवा आपल्याला कायमची सोडून जाते ) तेव्हां !—

माणसाची गंमत आहे, ती हीच ! त्याच्या अपेक्षेप्रमाणें सहज व हमखास व्हायच्या गोष्टी–घटना, हमखास तशाच होत राहिल्या, कीं, त्यांचं महत्त्व, त्यांची किंमत, त्याच्या जमाखर्चीं, शून्यापर्यंत जाऊन पोंचते. ‘ मलये भिल्लपुरंध्री नंदनतरुकाष्ठमिंधनं कुरुते !—’

रोजच्या रोज, आपल्याला वक्तशीरपणें कामावर दाखल करणारी, आपली सोयीची ‘ फास्ट लोकल ’ घ्या !...एकदांच केव्हांतरी मुसळधार पावसाच्या पाण्यांत ती डुंबूं—पोहूं लागते; तासन् तास, दोन स्टेशनांच्या दरम्यान, पावसाच्या पाण्यानें, जणुं ( जमिनींत रुजल्याप्रमाणें ) मुक्काम करते; परिस्थितीच्या धक्क्यांनीं, अधून मधून, फुटाफुटांनीं पुढें सरकते; तेव्हांच कुठं, तिच्या नित्याच्या अस्तित्वाची किंवा व्यवस्थितपणाची आपल्याला खात्री पटते.

निसर्गाच्या अक्राळविक्राळ तटबंद्यांना, शास्त्राचे सुरुंग लावून, प्रचंड पर्वतांना भोंकं पाडतात; विद्युत्शक्तीवर, विद्युत् वेगानें, त्या बोगद्यांच्या पोटांतून, ‘ दख्खनच्या राण्या ’ मोठ्या ऐषआरामांत इकडून तिकडे प्रत्यहीं पळतात. पण, त्यांतल्याच एखाद्या गिरिवराच्या पोटांतले चार दोन अजस्र दगड, खालच्या लायनीवर एखाद वेळीं सहज लीलेनें उड्या घेतात; तिथं बसण्याच्या आपल्या नैसर्गिक हक्कासाठींच, जणूं सत्याग्रह करतात; ओघानेंच, त्यांना बाजूला वळवेपर्यंत, दोन तीन दिवस, मुंबापुरी-पुण्यपत्तनाचं दळण-वळण साफ तुटतं. अशा वेळींच, निसर्ग-राजाच्या त्या तपस्वी गिरिवरांच्या भव्य अस्तित्वाची ओझरती चुणुक, आपल्या सदाच्या सुखासीन मनाला प्रथमच चाटून जाते !—

‘ शरीरमाद्यं खुलु धर्मसाधनम् ’ म्हणतों ना आपण ? तो साडेतीन हात देह, वरून सर्व प्रकारें नटवून-थटवून, आपण नेहमींच मिरवत असतों. त्यांतील प्रत्येक क्षणीं, हजारों लहान मोठे नाजुकनाजुक भाग, आपल्याला साफ नकळतच, आंतमध्यें अविरत चळवळ करीत असतात. त्यांचं नेमलेलं लहान मोठं कर्तव्य करीत, ते अहोरात्र धडधडत असतात. पण, याची अंधुक तरी कल्पना आपल्या मनाला कधीं शिवते कां ? त्यांना विसरूनच, आपल्या अन्य बाह्य-सुख-दुःखांत आपण चूर असतों.

आणि—मग, असा एक क्षण येतो, एक दिवस—आठवडा—महिनाहि उगवतो, कीं, त्यावेळीं आपल्याला वाटतं, अगदीं असह्यपणें वाटतं—

“ हाय हाय ! ही माझी खालची डावी दाढ ! काय भयंकर ? ”

“ ही अर्धशिशी ! सारं डोकंच फोडून टाकावसं वाटतंय् ! ”

“ हा उजवा कान ! हीं पोटांतलीं आंतडीं. ”

त्या एखाद्याच अवयवाचं, त्यावेळीं, त्या अव्यवस्थितपणामुळेंच, आपल्याला विराट विश्वरूप-दर्शन घडतं ! सदैव सुरळीत चालणाऱ्या अनंत अवयवांच्या शरीराची ती भव्यता व महती, त्याक्षणीं तरी, आपण विसरूं शकत नाहीं. चिरपरिचित सुस्थितीनें झालेली विस्मृति, तसल्या क्षणिक अव्यवस्थितपणामुळेंच, जागीं होते. म्हणूनच, अखेर, एखादं सूक्ष्म चाक जागचं थोडं सरकलं, तरी सारंच्या सारं, नेहमींचं अचूक घड्याळच एकदम बंद पडतं !—



आतां मात्र या विचारमालिकेला ब्रेक लावणं भाग आहे. कारण, मुलाच्या एका क्षुल्लक चमत्कारिक प्रश्नाच्या धक्क्यानें सुरू झालेली, ‘ कशांत काय नि कशांत काय ’ या विचारांची माझी गाडी, निरनिराळ्या रुळांच्या फाट्यांवरून सांधे बदलत, अधिकाधिक खोल बोगद्यांमधून वेगानें जाऊं बघते आहे.

पण मग, त्यावरून, मी मघां म्हटलं, तेंच स्पष्टपणं सिद्ध होत आहे, नाहीं कां ? कीं, कांहीं चमत्कारिक प्रश्नांमुळं...त्यांच्या उत्तरांमुळं...त्या पृच्छकापेक्षां, उत्तर देणाऱ्याचंच अधिक रंजन व समाधान होतं !

हें तर बालमनाचं कुतूहल; ती एक निर्मळ उत्सुकता होती. पण चमत्कारिक प्रश्न केवळ एवढ्याचसाठीं विचारले जात नाहींत; त्यामागें, जाणूनबुजून निर्मिलेलीं कोडींहि असूं शकतात. बऱ्यावाईट व्यक्तित्वाच्या दुमडीप्रमाणें, कमीजास्त ‘ जितं मया ’ चा उद्धट अभिनिवेशहि त्यांत असतो.

कारण, असले चमत्कारिक प्रश्न, स्वतःचं अज्ञान लपविण्यासाठीं किंवा समोरच्याचं अज्ञान मुद्दाम चव्हाट्यावर आणण्यासाठीं, अनेकदां, जाणून बुजूनच विचारले गेलेले असतात. विभिन्न व्यक्तित्वामधल्या एका अप्रकट संग्रामाचीं शस्त्रास्त्रं-आयुधंच असतात, तीं !

अशा वेळीं मात्र, आपल्याकडे जागरूकता असावी लागते; सूक्ष्मदर्शी डोळसपणा ठेवावा लागतो. त्या प्रश्न विचारणाऱ्याची धादांत दांभिकता त्यांत असते; किंवा, आपल्या ( अपेक्षित ) अज्ञानाला, त्यानं दिलेलं तें बेडर आव्हान असतं. त्यावेळच्या त्याच्या डोळ्यांत, तो अहंगंड पुरेपूर प्रतिबिंबित झालेलाहि दिसतो.

पोरांच्या श्रद्धापूर्ण, जिज्ञासू—ज्ञानपिपासू प्रश्नांना, आपण आपल्या कुवतीप्रमाणें थंड डोक्यानं उत्तरं देतों. पण, अशा थोरांच्या चमत्कारिक प्रश्नांच्या भडिमारावेळीं, त्या समस्येंतून शीरसलामत सुटण्यासाठींहि, आपल्याकडे संथ गंभीरपणा असावा लागतो. योग्य उत्तर देणं जमत नसलं, तर त्या कुत्सित प्रश्नावर तत्काळ तशाच प्रतिप्रश्नांनीं चढाई केली पाहिजे; किंवा, अशीं साधीं, सरळ, जेवढ्यास तेवढीं त्रोटक उत्तरं दिलीं पाहिजेत, कीं, तसाच एखाद आणखी चमत्कारिक प्रश्न विचारतांना, त्याचाच एकदम धीर खचावा; तोच गर्भगळित व्हावा !

त्यांतच, आपला अंतिम विजय दडलेला असतो; कारण, तो एक व्यक्ति-व्यक्तित्वाचा प्रच्छन्न संग्राम असतो!

त्या ऐवजीं, त्याचा कुत्सितपणा ओळखून, आपण सुरवातीसच एकदम चिडलों; अगर उत्तरादाखल, आपल्या बाजूच्या सूक्ष्म समर्थनाची सविस्तर बडबड आपण साधेपणं सुरूं केली; कीं, त्याच्या त्या दुष्ट कुत्सित डावाला आपण सपशेल बळी पडलोंच, म्हणून समजावं!

कारण, स्वतः हळूच प्रश्नाचीं चावी द्यायची; आपल्या तोंडाचा ग्रामोफोन एकदां सुरूं करायचा; नि मग, आपला वेग हवा तसा कमीजास्त करून अगर अर्धवट वा साफ बंदहि करून, प्रतिपक्षाच्या त्या सहज-सुंदर आस्थेवाईक तन्मय भाव-संगीताचं हसं करण्याची मर्दुमकी गाजवावयाची; हेंच तर मुळीं त्याच्या अहंगंडाला त्याक्षणीं अभिप्रेत असतं! तेव्हां, आपण सदैव जागरूकच असायला हवं.

म्हणून म्हणतों—व्यक्ति तितक्या प्रकृति! सावध! 'कशांत काय नि कशांत काय?' हा विचार, हें धोरण आपण सदैव मनांत जागतं ठेवणं बरं!

माझ्या माहितींतले एक अनुभवी मानसशास्त्रज्ञ शिक्षणतज्ञ आहेत. वाढत्या पोराबाळींवर त्यांचा खूप दरारा आहे. तसला आपला दरारा बरोबरीच्यांवरहि आहे व असावा, अशी त्यांचीं तरी खात्री आहे, महत्वाकांक्षा आहे. म्हणून, आपल्या प्रत्येक कृतींत, बोलण्यांत, वागण्यांत, कांहीं तरी प्रचंड वैशिष्ट्य आहे, असतं, असं भासवणं, त्यांना पदोपदीं जरूर वाटतं. अर्थात्, कुठल्याहि साध्या गोष्टीचं, ते भयंकर अवडंबर करतात.

पुन्हां, 'दुसऱ्याच्या व्यक्तिमत्वाची मोजणी-मापणी, सर्व-साधारणतः कमीच करावी!' हा तर त्यांचा अलिखित दंडकच आहे. त्यामुळेंच, स्वतःच्या व्यक्तित्वाची दुसऱ्यावर जोरदार छाप पडते, त्याच्यावर दडपण येतं, अशी त्यांची तरी एक ठाम गैरसमजूत आहे! म्हणूनच, जमेल तेव्हां, जमेल तर नि जमेल तितकं अवधान राखून, दुसऱ्याचा अप्रत्यक्ष अपमान करणारे चमत्कारिक प्रश्नच, त्याच्यासमोर ते उभे करतात; त्याबाबतींत तर स्वारीचा अगदीं हातखंडा आहे! त्यामुळें, सारे बिचारे, साधारणतः, त्यांना वचकून असतात; तोंडून शब्दच उमटत नाहीं कित्येकांच्या; कांहीं तर टाळतातच



त्यांना. त्यामुळें आणखी, या राजश्रींचा अहंगंड, सदैव आपल्याच धुंदींत संतुष्ट असतो!

त्या दिवशीं आमच्या एकत्र बैठकीच्या खोलींत, सर्वांनीं जाण्यायेण्याच्या मोक्याच्या जागीं, हे श्रीयुत कसलंसं एक पुस्तक 'तन्मयनेनं' वाचत बसले होते. पुस्तक लठ्ठ, जाडजूड होतं; कव्हर घातलेलं होतं; आणि (सभ्य माणूस 'लैंगिक' पुस्तक चारचौघांत जसं थोडंसंच उघडील, तसं) तें फक्त ४५ अंशांच्या कोनांत उघडून, ते वाचत होते. तरी, त्यांचे डोळे मात्र अधूनमधून घारीसारखे चौफेर फिरून, भोंवतालच्या सर्व्यांची पाहणी करीत होते.

अकारण उत्सुकतेचं जाळं टाकण्याच्या त्यांच्या त्या चतुर पद्धतीचं, मला मनांतल्या मनांत प्रथम हंसूच आलं. पण, काय असेल तें असो; त्यांच्या स्वभावाच्या त्या तसल्या बारकाव्यांची मला पुरेपूर जाणीव असून देखील, त्यांना सरळ हात दाखवून, जरा स्वतःला अवलक्षण करण्याचीच, एक स्वैर लहर, त्याक्षणीं, माझ्या मनांत संचरली.

मी हळूंच त्यांच्याजवळ गेलों व त्यांच्या हातांतील 'अर्धोन्मीलित' पुस्तकाला ओझरता स्पर्श करून, त्यांना मोघमच म्हणालों—"नांव काय हो?"

वास्तविक, माझा तो प्रश्न साधा, सरळ; केवळ निर्मळ कुतूहलाचा होता!

पण त्यांनीं मात्र, हातचं पुस्तक (इंगळी डसावी तसं) पटकन् बंद केलं. माझ्या 'दुष्ट' दृष्टीपासून जणू सुरक्षित राखण्यासाठींच, त्यांनीं तें आपल्या मांडींत दडपलं.

ते मग एकदां सूक्ष्म हंसले. आपल्या नेकटायची गांठ, नेहमींच्या सरावाप्रमाणें त्यांनीं जागच्या जागीं दाबली. 'हं! बरं सांपडलं सावज!' अशा अर्थाचे आपले त्या क्षणचे डोळे, क्षणकाळ, बेरक्या नजरेनं माझ्या चेहऱ्यावरून फिरवले.

किंचित् अधिकारी आवेशांत ते मोठ्यानं खाकरले; आणि पुढं विविध आंदोलनं घेत मला त्यांनीं प्रतिप्रश्न अगदीं संथपणें केला—"अंऽ? काऽय?—'नांऽव' काय??—नांऽवांत हो काऽय??—"

तत्काळ मी ओळखलं; त्यांना सहजसहवास नको होता; सवंग संग्रामच हवा होता! मला, माझ्या तथाकथित प्रतिष्ठेला, त्यांनीं आव्हानपूर्वक लावलेला तो चढाईचा, पहिलाच हेतुपुरस्सर कल्पक सुरूंग होता! तसं अकारण वाकड्यांत तेच आधीं शिरले होते. पण स्वभावाला औषध काय ?

तेव्हां मग, मिस्कील हंसत, मीहि चटकन् म्हणालों–" असंऽ आहे पहाऽ! 'कोणाऽच्या नांवांत ?' यावरच सारं अवलंबून असतं; नाहीं ?...त्या पुस्तकाच्या किंवा त्या लेखकाच्या नांवांत कदाचित् कांहीं असेलहि ! आतां प्रश्न पडेल,...तुमच्या नांवांत, काय ?...खरंच,...प्रश्नच आहे हा बाकी !"

ते चपापले; अस्वस्थ झालेले दिसले; त्यांनीं हळूंच एक आंवढा गिळला. आणि अखेर, माझ्याकडे रोखून पहात, त्यांनीं मला पुढला खवचट प्रश्न टाकला–" बऽरं ! तर मग, आतां मला सांगा, डोक्यांत काय आहे ? ?..."

" म्हणजे ? तुम्हांलाच माहीत असणार कीं तें, अधिक ! पण, मला वाटतं बुवा, कांदेबटाटेच असणार !–दुसरं काय ?–" आणि एवढ्यावरच उसंत न घेतां, मी पुढंहि हल्ला केला–" बरं ऽ...डोक्यावर म्हणाल, तर...पूर्वी 'मा-बाप सरकार' ची साहेबी टोपी होती !–पण आतां, सत्तेचाळीसपासून, काँग्रेस-परीट-घडीची पांढरी टोपी आली आहे !–अहोऽ...पाहायचं नि सांगायचं !...दुसरं काय ?–हेंच ना उत्तर ? ?..."

त्या प्रश्नोपप्रश्नांच्या परस्पर फैरीनें, खरें पाहतां, मनांत ते खूप चिडले होते. कारण, त्यांना तो हल्ला अनपेक्षित होता. तरी, आपल्या डोक्यांत नव्यानें आली असलेली गांधी टोपी, आपल्याला फिट्ट बसलीच नाहीं, असा साळसूद चेहरा करून, पण, तरी देखील, किंचित् चिडक्या, पिचक्या आवाजांत व बोलतां बोलतां, आवाज चढवत नेत, त्यांनीं माझ्यावर प्रश्नांची एक नवी जळती सरबत्ती डागली-–" अऽस्सं ऽ ? ? तर मग आतांच–स्पष्टच होऊं द्या !–अंगांत काय आहे ?—हातांत काय आहे ? ?...नि पायांत काय आहे ? ? ?–आतां पुन्हां, पाहा नि सांगा पाहूं, असेल हिंमत तर ?..."

त्यांच्या आवाजांत संताप, हातवारे–आंदोलनांत धमकी व सभ्य शब्दांच्या शालजोडींत, मवालीपणा ओतप्रोत प्रतिबिंबित झाल्याची मला तत्काळ जाणीव झाली !



लांबून लांबून, चार दोन डोकीं आमच्याकडे वळून वळून पहात असलेलीं मला दिसलीं.

इतरांबरोबरच्या त्यांच्या तसल्या नित्याच्या दादागिरीचा अनुभव असल्यामुळें, मला मात्र, आतां मध्येंच सारं आवरतं घेणं शक्य नव्हतं.

तेव्हां, संथ शांत स्वरांत, त्यांच्याच अनुक्रमानें, मी त्यांना उत्तरं दिलीं—

" विचारलेत ते सारे प्रश्न, तसे सामान्य बाजार-बुणग्यांचेच आहेत ! तुमचे आमचे नव्हत; माझे तर खासच नव्हत !...पण तुम्हीच विचारल्यावर, आतां स्पष्ट सांगणं प्राप्तच आहे मला !—हें एक प्रथम निश्चित, कीं, अंगांतील कपड्यांच्या रुबाबावर नि त्यांच्या किंमतीवर कोणत्याहि माणसाची किंमत कधींच ठरत नाहीं.

" पुन्हां असं, कीं, सगळ्याच सभ्य माणसांच्या पायांत तसले बूट असलेच पाहिजेत, असा कांहीं नियम–दंडक नाहीं !...पण मग—सभ्यपणाचा तोरा मिरवणाऱ्या कोणाच्या हातांत कधीं कोणाला बूट दिसला, तर तो मात्र एक सभ्य मवाली असावा, हें जाणायला तुम्हां-आम्हांला मुळींच वेळ लागूं नये ! ...काय ? पटलं सारं ?...तर मग, आतां हवं आहे कशाला आपल्याला, कशांत काय नि कशांत काय तें ?...आतां नांव न सांगतांहि, त्या दुसऱ्या हातांतलं तुमचं तें पुस्तक मघांसारखंच पुढं वाचूं लागा कसे ! माझी तरी कांहीं हरकत नाहीं !—तुमचा नाहीं ना दुसरा कांहीं बेत ? ?—"

त्यावर ते बोलले नाहींत. पुस्तक पुढं वाचूं लागण्याऐवजीं, ते जागचे उठले; उभ्या जागींच क्षणमात्र घुटमळून, त्यांनीं आपले पाय आपटले निं अखेर, माझ्यासकट भोंवतालच्या आम्हां साऱ्यांकडेच तुच्छतेनें पाहून, ते झटकन् दुसरीकडे निघून गेले.

अकारण प्रश्नांच्या आपल्या छेडणींमधून, तेच त्या क्षणीं नामोहरम झाले होते ! बेचैन झाले होते !

चमत्कारिक प्रश्नांची 'खाजवून खरूज' काढली, कीं, कधीं कधीं, अखेर, अशी, आपली आपल्यालाच, ती खूप खूप भगंभगूं लागते !...त्यांना मात्र, हा पहिलाच प्रत्यय आला होता, कीं काय, न कळे !—

हातगांवकरांनीं केलेल्या अकारण चढाईशीं दोन हात करतांना, केवळ स्वसंरक्षणार्थ, मी तें सारं बोलत गेलों, हें खरं. पण मग, कुठल्याहि दृष्टीनें पाहिलं, तरी-त्यावेळीं मी बोललों त्यांतला कुठलाहि शब्द, कोणत्याहि अर्थानं, खराच होता !—

खरोखरच, कोणाच्याहि नांवांत, तसं असतं काय ? कांहींच नसतं ! पण, असामान्य व्यक्तींच्या नांवांत, त्यांच्या अखंड कर्तृत्वतपश्चर्येमुळेंच, हळूहळू पुष्कळसं सामावूं लागलेलं असतं. योग्य वेळींच, रसिकतेनें, यथार्थपणें जाणून घेऊन, तें आपणहि अगदीं आत्मसात करीत गेलों, तर आपल्या जीवनांतहि, तो मोठेपणा नक्की येत जातो. आणि मग, आपला तो वाढता मोठेपणा, हळूहळू आपल्याहि नांवाला व्यापूं लागतो; किंबहुना, आपल्या नांवाला व्यापून उरून, तो इतरांनाहि मोठं होण्यास पुरतो ! निदान, इतरांना तशी योग्य चालना तरी देऊं शकतो.

अनेक गोंधळांचे कांदे-बटाटे, प्रत्येकाच्या डोक्यांत, केव्हां ना केव्हां हे शिजायचेच. पण मग, ते नेहमींच तसे शिजत राहून मुळींच उपयोगी नाहीं. समजा, एखाद्याच्या डोक्याच्या ठिकाणीं मडकं असलं, तर तिथं कांहीच नसण्यापेक्षां, नक्कीच तें परवडेल ! कारण, त्यांत थोडं तरी पाणी मुरेल. पण मग, तीं मडकीं अनुभवानें-संस्कारानें, हळुंहळू कच्च्यांचीं पक्कीं तरी होत गेलीं पाहिजेत. आणि अखेर, भट्टीतून काढल्यानंतरचा अनुभवी थंडपणाहि, तिथें स्थिरावलेला दिसला पाहिजे ! खरं कीं नाही ?

दुसरं असं, कीं, दोन व्यक्तींच्या संगतींत नि सहजीवनांत एक जरी 'कच्चं मडकं' असलं, तरी तिथलं वातावरण ( त्या केवळ एकाच्या वैगुण्यामुळेंहि ) ओघानेंच, अगदीं अकारण, भट्टीएवढं देखील गरम होतं. पण उलट, त्या दोन्ही समयज्ञ व युक्तिवादी असल्या, 'भांड्याला भांडं हें लागायचंच नि तसं लागलं, कीं, प्रत्येक भांडं आपापला नैसर्गिक आवाज काढायचंच !' असली एक जाणीव सदैव मनांत ठेवून वागणाऱ्या असल्या, तर...त्या दोन पक्क्या मडक्यांच्या परस्पर आघातांतूनहि, नेहमीं मंजुळ ध्वनीच बाहेर पडतात !

त्या दोघांची कदाचित् जोरदार चकमक झडली,...संघर्ष घडला, तर



त्यांतूनहि, नव्या तेजस्वी ठिणग्याच बाहेर पडतील !—आणि अखेर, त्या नवनवीन ठिणग्याहि, जवळपासच्या अनुकूल कापसामध्यें घर करतील; त्यांत नवतेजाच्या ज्ञानज्योति पेटवतील. आणि त्या प्रकाशानेंहि, अखेर, समाजजीवनाचीं नव-नवीन क्षितिजं उजळूं-तळपूं लागतील. काळोख कायमचं काळं करूनच जाईल ! पटतं ?...

'कशांत काय नि कशांत काय ?' या प्रश्नाचं उत्तर ? त्या त्या बाबी-कडे पाहण्याच्या ज्याच्या-त्याच्या दृष्टिकोनावरच तें अधिक अवलंबून असेल ! हा प्रश्न सखोल विचाराचाच आहे.

म्हणूनच—कधींहि...कशांत कांहींच नसेल !—किंवा,...अगदीं सारं सारं कांहीं असेल !!—तुम्ही—आम्ही ठरवूं,...तेंच त्यांत असेल.

● ● ●

# दि ल ज मा ई

सभोंवारच्या त्या गांभीर्यांत, आपल्या संथ गंभीर आवाजामध्यें, अखेर त्यांनीं सुरवात केली.

“उपस्थित मित्र हो, एका अत्यंत दुःखद घटनेबद्दलच्या आपापल्या भावना व्यक्त करायला, आज आपण इथं जमलों आहों! अगदीं अकालीं नि अचानकपणेंच, आपल्यामधून उठून गेलेले आपणां सर्वांचे स्नेही अण्णा! त्यांच्या चिरवियोगानं झालेली ही हानि, कधींहि परत भरून निघण्यासारखी नाहीं. पण,...दुःखानं कोंदाटलेल्या तुमच्या-माझ्या मनाला केवळ विरंगुळा म्हणून,...अण्णांच्या सहवासांत मी वावरलों त्यांत घडलेल्या दोन घटनांच्याच दोन आठवणी, यावेळीं मी आपल्यापुढें उभ्या करणार आहे.

“अण्णांकडे, जिवंत...अहोरात्र धडधडणारं, रसरसतं असं हृदय होतं!... इतरांनाहि तें तसंच असणार, याची एक कायमची जिवंत जाणीवहि त्यांच्याकडे होती! आणि, आपल्यापेक्षां दुसऱ्यांच्या हृदयाची अधिक किंमत करायची त्याची एकूण नैसर्गिक वृत्ति असल्यामुळें त्या बड्या दिलदार जीवाची, कोणाशींहि, कधींहि, पटकन् दिलजमाई होऊन जात असे. स्वतः अण्णांना इतर



लोक कसे वाटत, कोण जाणें! पण त्यांच्या सहवासांत आलेल्या इतर कोणालाहि मात्र, ‘अण्णा म्हणजे आपलेच कोणी तरी एक रक्ताचे!’ असंच केव्हांहि वाटे. जीपाजीवांची खरी दिलजमाई ही अशीच...दिलखेंचक नि प्रभावी असते!”

आणि त्यानंतर, श्रोत्यांपुढं त्यांनी ज्या दोन आठवणी मांडल्या, त्या खरोखरच अत्यंत हृदयस्पर्शी होत्या. त्यांचा तर त्यामुळं गळा दाटला होताच; पण, त्यामुळं, इतर प्रत्येकाच्या देखील हृदयांत कालवाकालव, डोळ्यांत पाणी नि डोळ्यांसमोर दिलदार अण्णांची साधीसुधी प्रेमळ मूर्ति—जणूं साक्षात्‌च—उभी राहिली होती.

पण मग—माझ्या हृदयांत मात्र, त्यामुळंच, एक निराळीच कालवाकालव होत होती—“अण्णा!...त्यांची दिलजमाई!!”

कारण, अण्णा माझे स्नेही नि त्या सभेंत त्यांच्या त्या आठवणी सांगणारेहि माझे स्नेहीच! फरक फक्त ‘तर-तम’चा...

पण, त्या दोघांच्या परस्पर संबंधाबाबतच्या माझ्या तरी सर्वच आठवणी अगदीं निराळ्या, उदासीनतेच्या, कांहींशा सात्विक संतापाच्या होत्या.

तसं त्या दोघांचं अगदीं ‘अहिनकुल’ नसलं, तरी फारसं सख्यहि नव्हतं.

एक अगदीं तोलूनमापून मोजकं बोलणारे; तर दुसरे बेफाट मुलुखमैदानींत सदा तल्लीन, सदा वाकबगार! एक अगदीं हळवे, भावनाप्रधान; तर दुसरे तितकेच बेछूट, तर्ककठोर, फटकळ!

तेव्हां मग, संसाराच्या ठरलेल्या गाड्याला जुंपलेल्या, कष्टाळु सोशिक बैलाप्रमाणं निमूट नाकासमोर चालणाऱ्या, (जवळ जवळ यांत्रिक चाकोरी-आयुष्यच कांहींशा गबाळेपणें जगणाऱ्या) त्या पहिल्यांच्या प्रत्येक हालचालींत, त्यांच्या आयुष्यांतील प्रत्येक घटनेंत, या दुसऱ्या बेछूट ब्रम्हचाऱ्याच्या कठोर काकदृष्टीला, पदोपदीं दोषस्थळंच दिसावींत व त्यांच्या त्या व्रणांवर, वेळीं-अवेळीं, (खाजगी—चारचौघांत)...रक्तबंबाळ करणाऱ्या चोंची यानें माराव्यात, यांत आश्चर्य तें कसलं होतं?

माझा तरी तो कैक वर्षांचाच अनुभव होता!

हो ! त्यामुळंच, कै. अण्णांच्या आधींच्याच अबोल वृत्तीला, ओशाळेपणाचा, न्यूनगंडाचा, वैफल्याचा, एक प्रकारचा दाट गंज,...अधिकाधिकच चढत गेला होता; महिनामहिना त्यांच्या हालचाली–अकारणच—एखाद्या चोरासारख्या, एकलकोंड्या, खिन्न, निराश होत जात गेल्याचं, मला नेहमींच पहायला मिळालं होतं—

अशा त्या अनेक भूतपूर्व प्रसंगीं, माझ्या मनांत येई–' घाणीवर चोंच मारणाऱ्याला चांगल्या गोष्टी दिसणार तरी कुठून ? हा कावळा त्या बिचाऱ्या गोगलगायीचा साता जन्मांचा वैरीच ! ! '

पण काय आश्चर्य ? त्यांनींच तर आज अण्णांच्या दिलजमाईवर तन्मयतेनें प्रकाशझोत पाडले होते !

दोनच आठवणी सभेंत सांगून, त्यांनीच स्वतःच्या नि इतरांच्या डोळ्यांत पाणी आणण्याइतकी स्वतःचीहि माणुसकी, जिवंत रसरशीत रसिकता–पूरेपूर व्यक्त केली होती !

आणि त्या दोन आठवणी ? अण्णांच्या व्यक्तित्वाच्या नि अंगच्या विशेष गुणांच्या त्या संपूर्ण निदर्शक, प्रातिनिधिक होत्या;—म्हणजे, सर्वच दृष्टीनें त्या समर्पक अशा होत्या.

या जाणिवेनें नि नवख्या अनुभवानेंच, माझ्या हृदयांत तसली चमत्कारिक न्यारी कालवाकालव होत होती.

तोंच, त्यांच्या त्या भाषणाचे समारोपात्मक शब्द माझ्या कानीं पडले—"तेव्हां—माणसाची माणुसकी त्याच्या प्रत्येक लहानसहान हालचालींत दिसते. त्याच्या अंगचे खरे गुण, त्याच्या संकटकाळींच,...खऱ्या यथार्थतेनें दृष्टोत्पत्तीस येतात. म्हणूनच, त्यांच्या साऱ्या व्यक्तित्वाचं प्रतिबिंब असल्या केवळ दोन आंठवणींतहि आपल्याला आढळेल. मला इतकंच सांगायचं होतं;... पण, त्यांच्याबद्दल बोलायचं...म्हणजे—दुसऱ्याहि कुणाला याहून अधिक कांहीं सांगतां येईल, असं मला तरी वाटत नाहीं ! अण्णांच्या आयुष्याचा प्रत्येक क्षण, म्हणजे–एका दिलदार जिवाची रसरसती दिलजमाई ! ! "



ते उतरले. सारे उभे राहिले. निमूटपणें दुखवट्याचा ठराव पसार झाला. आमची सभा बरखास्त झाली—

त्यानंतर, संध्याकाळीं आम्ही एका हॉटेलांत चहा घेत होतों.

घडल्या घटनेनं नि मनांतल्या विचारानं मी तरी अगदीं खिन्न झालों होतों.

पण, त्या टेबलाभोंवतीं बसून चहा घेतां घेतां, आमचे 'ते स्थितप्रज्ञ स्नेही' पुन्हां हंसतखेळत होते. त्यांच्या बेफाट बडबडीला नि बेछूट विनोदाला, आजहि नेहमींइतकाच पुन्हां ऊत आला होता.

कळ दाबली, कीं, रडणाऱ्या यांत्रिक बाहुलीची मला आठवण झाली !...

तेवढ्यांत, माझ्याबद्दलचा कसला तरी क्षुल्लक, कुत्सित विनोद करून, ते स्वतः हंसत व दुसऱ्यांना हंसवीत होते.

क्षणकाळच माझं डोकं भिरभिरलं !–तरीहि, मी त्यांना संथपणेंच म्हणालों, "रसिकवरमहाशय, माझ्याबद्दलच्याहि दोन भल्या आठवणी आतांपर्यंत तयार करून ठेवल्याच असतील कीं मनांत तुम्हीं ! मग आजच जरा त्या मला आगाऊ ऐकवाल का ? नेहमीं, अशा वेळीं तरी...तुम्ही बोलतां छान !... पण–पुढच्या त्या सभेमध्यें, अण्णांसारखाच, मीहि हजर नसणार; म्हणून म्हणतों ! जरा आजच घ्या ना माझी सभा—"

हंसतां हंसतां, त्यांचा चेहरा एकदम पालटत गेला. ते माझ्याकडे कावरेबावरे पाहूं लागले. कदाचित्, माझ्या त्या अनपेक्षित ' अभद्र ' बोलण्याचा त्यांना रागहि आला असावा ! नाहीं कोणी सांगावं ?

पण, तिथल्या त्या चालू विनोदी वातावरणाचा मात्र, माझ्यामुळं एकाएकी भंग झाला होता. ' मूड ' जाऊन, कांहींशा गांभीर्यांतच, मग सगळे उठले; हॉटेलबाहेर पडले. आपापल्या घरांकडे पांगले.

तरी पण, घरीं आल्यावरहि, त्या साऱ्या प्रकाराबद्दलची माझ्या मनांतील संमिश्र विचारप्रणालि, मला कांहीं केल्या सोडून जाईना—

माझ्या मनाला राहूनराहून एकच एक रुखरुख वाटत होती—“ एक अलिखित सामाजिक दंडक, म्हणून लोक मृताबद्दल कधीं वाईट बोलत नाहींत. दुखवट्याच्या सभेंत नेहमीं त्याच्याबद्दल चांगलं तेवढंच बोलतात; दोन आठवणी सांगतात; त्याच्या आत्म्याला अखेर चिरशांति मिळवून देतात. ‘ तो गुणी दिलदार माणूस गेला—जगाची कधींहि भरून न निघणारी हानि झाली,’ असा निर्वाळा देऊनहि मोकळे होतात. पण त्यांत निर्भेळ दंभापेक्षां, अहंपणा नि अतिशयोक्ति यांचीच आवड अधिक असते, माझ्या मतें ! हें कां ? हें असं कां ?...”

आणि फिरफिरून, माझ्या मनांत, काळ्याकुट्ट अभ्रपटलांप्रमाणें,...सारखं एकच दाटून येत होतं—

“ कुणा जिवंत माणसाच्या कानांवर त्याच्या दोन हृदयस्पर्शी आठवणी घालून, त्याचे गुण रसिकतेनं जाणून घेऊन, त्याच्या आत्म्याला त्याच्या जिवंतपणींच कां कुणी शांति देत नाही ? त्या वेळीं तेवढी क्षुद्र छिद्रान्वेषी दृष्टि नि राईचा पर्वत करण्याची सवंग कल्पकताच आपल्या अंगीं कां बरं संचारते ? शांति फक्त मृतात्म्यालाच कां मिळावी ? बिचाऱ्या जिवंत, स्खलनशील आत्म्यालाहि ती कां मिळूं नये ? एकतर्फी दिलजमाईचं हें एवढं कौतुक हवं कशाला ? ”

का कोण जाणें; जगांत तसं कधीं होत नाही, इतकं मात्र खरं !

हो, म्हणूनच तर, आज अण्णांच्या दिलजमाईच्या त्या दोन आठवणी सांगणाऱ्या माझ्या या रसिक स्नेह्याच्या प्रत्यक्ष सहवासांत—बिचारे कै. अण्णा स्वतः मात्र अगदीं सदोदित पुरेपूर होरपळून निघत असत;...त्यांच्या अंगचा असलानसला, उरलासुरला आत्मविश्वास साफ डळमळून जायचा ! उलट, आपल्या अंगच्या साऱ्या उणीवांची, दोषांची, त्यांची त्यांनाच सारखी दहशत वाटत राहायची; नि त्यामुळंच, आम्हां सर्वांपुढं, आपल्या अंगचे तें सारे लहानमोठे गुण अधिकाधिक उत्कटतेनं व्यक्त करण्याचीं त्यांना कधीं छातीच होत नसे !

पण आतां ? आपलं अर्धवट धरसोडीचं आयुष्य कसंबसं जगतांजगतां, ते एकाएकी जगांतूनच निघून गेल्याची खात्री झाल्यावर मात्र;—आमचे हे रसिक स्नेही, पुढें होतात. त्यांच्या मृतात्म्यावर—त्या त्यांच्या दोन वैशिष्ट्यपूर्ण,



गुणवाचक आठवणींचीं—हळुवार सुमनं वाहातात. त्याक्षणीं त्यांची अण्णांशीं खरी दिलजमाई होते. त्यावेळीं ते स्वतः हळहळतात. दुसऱ्यांनाहि भाव—पाझर फोडतात.

ही कदाचित् जीवनांतली रसिकता असेल; पण ती माणुसकी खासच नव्हे !

म्हणूनच, मला तरी वाटतं, खरी रसिकता, खरी माणुसकी, खरी दिलजमाई. प्रकर्षानं प्रकट होते, ती दुसऱ्यांच्या दोषांकडे पाहतांनाच—

दुसऱ्याच्या दोषांकडे पाहतांना, त्याच्या जिवंतपणींहि, तो तेवढ्यापुरता मृतात्मा आहे असं मनाला बळेंच समजावणं, प्रघातानुसार तें सारं विसरून, त्याच्याअंगचे उरलेले गुण टिपून घेणं, हीच खरीखुरी माणुसकी !—

कारण असं, कीं मेल्या म्हशीचं अमाप दूध मोजून, पश्चात् मिटक्या मारण्यापेक्षां, जिवंत म्हशीच्या तुटपुंज्या दुधांतून आवळाभर लोणी करणं—निदान, कपभर चहा तरी करणं—यालाच अधिक रसिकता नि माणुसकी लागते !

अशा दृष्टीनं सभोवार नि जगाकडे आपण पाहूं लागलों कीं आपण दिलदार होतों. आपली साऱ्यांशींच दिलजमाई होते. आणि त्यामुळें आपला तर फायदा होतोच होतो; पण, दुसऱ्या प्रत्येक जिवंत माणसाच्या अंगच्या प्रत्येक लहानसान गुणाचं, ( तो मृत होण्यापूर्वींच ) त्याला व समाजाला दोघांनाहि हितकारक असं खरंखुरं चीज होतं !

पण नक्की याच चिजेची तर आपल्याला भोवतालीं सारखी उणीव भासते ! अंगांत रुतून मोडलेल्या सलणाऱ्या बाभळीच्या काट्याप्रमाणं जीवाला सारखी ठुसठुस, रुख रुख वाटते.

हो ! त्यामुळंच, आपलं प्रत्येकाचं मन दुसऱ्या प्रत्येकाच्या सहवासांत अधिकाधिक कमकुवत होत जातं. आपण स्वतःला नि दुसऱ्या कुणाला खरं कार्यप्रवण नि उत्तेजित कधींच करूं शकत नाहीं. आपल्या मनांत विधायकतेपेक्षां विध्वंसकताच अधिक दाटत जाते.

त्यामुळं तर आपण आपल्याला अगर दुसऱ्या कुणाला खरं जीवन कधींच जगूं देत नाहीं. जीवनाचे धडे आपण कधी शिकूं शकत नाहीं, शिकवूं शकत

नाहीं !—दुसऱ्याचं हृदय विसरल्यावर आपल्या हृदयाची तरी खरी जाणीव आपल्याला कशी उरणार ? नि मग दिलजमाई तरी कशी आढळणार ?

याच चुकीच्या भूमिकेनं आपल्या मनांत ठाण दिलेलं असल्यामुळं, आणखीहि एक वाईट होतं. सवयीमुळं, केवळ मृतात्म्याबद्दल विचार करतांनाच, ही जीवनांतली अत्यावश्यक भावशीलता, सहसंवेदना, दिलजमाई, ऊतूं जाऊं लागते; नि त्यामुळंच, तिचं रूपांतर केवळ निष्क्रिय भावनाप्रधानतेंतच फक्त होतं.

मृताबद्दलच्याच तेवढ्या असल्या दोन आठवणी !...तो हजर नसतांना त्या काढून मना-ज्नांत स्वतःला अगदीं कृत्यकृत्य मानणं, याला काय म्हणायचं ?

त्याऐवजीं, त्याच्या व आपल्या जिवंतपणींच, सहानुभूतीला आसुसलेल्या त्याच्या मनासमोर नि आपल्या जगाच्या वेशीवर, त्याच्या गुणी आठवणी—त्यांतल्या दोनच का होईनात–हळुवार रसिकपणें मांडणं,...टांगणं–हें आपल्या व त्याच्या आयुष्याला जास्त उज्ज्वल नाही का करणार ?—त्यानेंच जीवाजीवांत जास्तींत जास्त दिलजमाई नाहीं कां होणार ?—

पण, ही रसरसती जाणीव मानवी मनाला नैसर्गिकपणें जेव्हा पेलतां येईल, तेव्हांच, जगाचं नंदनवन होईल; माणसांचे देव होतील. दारचीं नि शेजारचीं अंगणं सारखींच फुलतील; टवटवतील. त्यांची शोभा, त्यांचा सुगंध, एकमेकांना सारखाच सुखवीत राहील; आपलं नि दुसऱ्याचं–शेजारचं–राष्ट्र यांत आपपर विचार-भावनांच्या हद्दी–वेशी नि तटबंद्या उरणार नाहीत. ॲटमबॉम्बचीं गुपितं नि त्यांबद्दलचीं परस्पर दांभिक स्पष्टीकरणं उरणार नाहींत. ॲटमवर हायड्रोजनचे तोडगे शोधण्याची खटपट होणार नाहीं !

या हिडिस नव्या शोधानीं मानवाची राख होण्यापूर्वी, त्याच्या गुणांची सहानुभूतीनं जाणीव करण्याच्या...दुसऱ्याशीं नैसर्गिक दिलजमाई साधत रहाण्याच्या असल्या संवयीमुळंच—जगाची पुरी राखरांगोळी होण्यापूर्वींच—त्यांतल्या चांगल्या गोष्टींची निवड व जाणीव आपल्याला खरीखुरी जमेल.

मगत्र, त्यांतल्या दोषांची तेवढीं मढीं जाळून टाकून, त्यांतल्या गुणांचीच अद्याप ऊब आपल्याला सहजतेनं घेतां येईल.

सभेंतल्या स्नेह्यांनी सांगितलेल्या–दिलजमाईच्या त्या दोन आठवणी–ती त्यावेळची जाणीव–नि मनांला फिरून प्रफुल्ल नि उल्हसित करणारी आतांची ही यथार्थ व्यापक जाणीव !

केवळ जमीन अस्मानच !

• • •

# पावसाळी तत्वज्ञान

कोणालाहि, कसलीहि सुट्टी मिळणं, हें केव्हांहि चांगलंच; ती अचानक मिळाली, तर अगदीं दुधांत साखर !

दर पावसाळ्यांत, पावसासाठीं, शाळाशाळांतून अशीच एकतरी अनपेक्षित सुट्टी मिळते;...' मास्तर भिजले ! ' म्हणून मात्र नव्हे; केवळ ' मुलं भिजलीं ' म्हणूनच ! ( हल्लींचं शिक्षण व हल्लींच्या शाळा–काळानुरूप–मुलांच्याच मध्यबिंदूभोंवतीं पिंगा घलीत वर्तुळाकार फिराव्यात, हें साहजिकच नव्हे का ? )

पण मास्तर झाला तरी तो माणूसच ! असल्या ' हातोहात सुटी ' चा मुलांना जितका आनंद, तेवढा तरी त्याला होतोच ! ( आतां—' शाळा हेंच आपलं घर '—अशी तीव्र भावना उराशीं बाळगून वागणारे, कोणत्याहि शाळेचे ' संस्थापक '—' संचालक, ' ' प्रिं. ' किंवा ' हे. मा. ', हे या आनंदाला अपवादहि ठरतील ! नाहीं कोणी म्हणावं ? )

शहरांत असा महामूर पाऊस सुरू झाला, कीं, रस्त्यांतून पाण्याचे व कोणत्याहि शाळेच्या महाद्वारांतून मुलामुलींचे लोंढे दुथडी वाहूं–धावूं लागतात.

अशा वेळीं, पोरापोरींच्या स्वैर आनंदी आरडाओरडीला ( नि त्यांच्यामागून हळूच सटकणाऱ्या मास्तरमास्तरणींच्या कडवट चेहऱ्यांवरील गंभीर समाधानालाहि ) आकस्मितपणें महापूरच येतो !...आणि ज्या ज्यावेळीं, वरून

अशा निसर्गधारा कोसळतात, त्या त्या वेळीं, मानवी समाजांतहि, एका विशिष्ट पावसाळी तत्त्वज्ञानाचा महामूर पाऊस चौफेर सळसळत असतो.

या तत्त्वज्ञानापैकीं, एका 'तत्त्वा'च्या गोष्टीचाच त्या दिवशीं माझ्याकडे अभाव होता ! म्हणूनच, एका दिवसाच्या अकस्मात् सुटीचा पाऊस माझ्या चिमुकल्या जगांत पडूनहि, मी त्या दिवशीं प्रथम दाराशींच नकळत घुटमळलों.

शेवटीं, दुसऱ्या एका 'स्वजातीया'ला सचैल भिजण्याच्या धोक्यांत घालूनच, (स्वतः निदान साफ भिजणार नसल्याचं समाधान मिळविलं व) बाहेरील त्या 'जीवन'कल्लोळांत धीरानें एकदांची उडी घेतली मी !

त्यानंतरहि मी अनेक लहान मोठ्या उड्या घेतल्या.—धांवत्या मोटारींनीं माझ्या कपड्यांची अगदीं 'चिखलवाडी' करूं नये, म्हणून; सालींवरून माझे स्केटिंग सुरूं होऊं नये, म्हणून; बसमातेनें मला आपल्या उदरांत ठाव द्यावा, म्हणून; दादर गांठल्यावर उतरतांना, म्यु. च्या 'डामरट' रस्त्यांतलं छोटं डबकं चुकवावं, म्हणून....

मग पुन्हां नवा धीर करून, (बंदुकीच्या आवाजासरशीं सुरू व्हावी, तशी) माझी एकाकी 'ऑबस्टेकल-रनिंग-रेस' सुरू झाली; त्यांतहि पुन्हां लहान-मोठ्या उड्याच उड्या !—

वारा येईल तशी पाठ फिरवण्यासाठीं,...वळचणी-वळचणींनी चालतांना, मध्यें लागणाऱ्या दोन इमारतींमधल्या 'धार'-माऱ्याच्या खुल्या जागा चुकवण्यासाठीं; रस्त्यानें यदृच्छया जातांना, आसपास दिसणाऱ्या 'अनोळखी छत्री'चा तुटपुंजा आश्रय डोक्यावर तात्पुरता तरी घेण्यासाठीं—

शेवटीं, अगदींच निराधार-निराश्रित वाटल्यावर, खिशांतला (भिजलेला) रुमाल काढून; स्वसमाधानार्थ, तोच मी डोक्यावर पसरला; नि कधीं धांपा टाकीत, कधीं अगतिकपणें संथ चालत, तीन मिनिटांच्या अंतरावरचं माझं बिऱ्हाड दहा मिनिटांत एकदांचं गांठलं !...



प्रत्यक्ष परिस्थितीशीं तोंड देण्याचा माझा तो मधला 'जीवन-कलह' थांबतांच, तोंपर्यंत—शीर केवळ सलामत ठेवतां ठेवतां गोठत गेलेले माझे आंतले विचार,...त्यांना पुन्हां भरभर पाणी सुटून...वितळूं लागले.

प्रथम, मधल्या धांवत्या पावसाळी प्रवासांतले सारे असामान्य चमत्कारच क्षणभर माझ्या डोळ्यांपुढें फिरून उभे राहिले.—

मघां येतांनाचा तो देखावा !—मधल्या रुळांवरून, जणूं ट्रामप्रमाणें गजगतीनें चालत व एखाद्या बोटीप्रमाणें चौफेर पाणी कापीत आमची बस गेली होती. रस्त्यांतल्या त्या तात्पुरत्या समुद्रांत, (शेजारच्या आरबी समुद्रा-प्रमाणेंच) फेसाळत्या लाटा फटाफट फुटत होत्या. जागजागीं नांगर टाकून तरंगत पडलेल्या चित्रविचित्र आकाराच्या होड्यांप्रमाणें दिसणाऱ्या थंडावलेल्या मोटारी समाधि लावून होत्या. घोड्यांनीं गुढघ्यांवरपर्यंत व व्हिक्टोरिआंनीं आसांपर्यंत अर्ध-जलसमाधि घेतली होती. परळचीं म्यु. मराठी पोरं, शाळा सुटल्यावर, भररस्त्यांत ऐसपैस पोहण्या-डुंबण्याचे पहिले धडे घेत होतीं. रस्त्यावरील काटक्याकचरा गरगरा फिरवून, त्याला अगदीं रसातळाला नेण्याचा जणूं विडाच उचललेल्या प्रबळ भोंवऱ्यांप्रमाणें वाटणारीं, तीं जागोजागचीं उघडीं 'मॅन-होल'—वर्तुळं ! त्या क्षणीं, तीं तिकाट्यांवर 'धोक्या'चीं तांबडी निशाणं मिरवीत होतीं...

आणि त्याच पार्श्वभूमीवर,...(अनपेक्षित, अचानक रीतीनें आपल्या पदरीं येऊन पडलेलीं) ओझीं ढकलण्याची-कधीं नव्हती ती-हमाली, मनाविरुद्ध व निरुपायानें करणारे (इस्त्री साफ चुरगाळलेले, व केविलवाण्या तोंडाचे) दुचाक्या-फटफट्यांचे प्रतिष्ठित ओलेचिंब मालक,...ठिबक्या-ठिबक्याप्रमाणें हलतांना दिसत होते...

तरी पण, या अनेक चमत्कारांच्याहि तोंडांत मारणारा व मला विचार-गंभीर करणारा, एक वरवर क्षुल्लक वाटणारा चमत्कार मी पाहिला होता !

जागजागीं, हजारों माणसं हातांतल्या छत्र्या (जणूं हातांतल्या काठ्यां-प्रमाणें) नुसत्या हातांत धरूनच, 'पाऊस लेकाचा जातोय् तरी केव्हां ?' अशी सनातनी वाट पाहात, वळचणी-वळचणीला उभीं होतीं !

होय, तो भयंकर चमत्कार पाहूनच, माझं मन असं आज पावसाळी तत्त्वज्ञानांत नकळतच शिरलंय्—

पावसाळ्यांत पावसापासून संरक्षण करण्यासाठीं ज्या चीजेचा उपयोग करतात, तिलाच ना छत्री म्हणतात ?—मग, इतक्या ‘ छत्रपतीं ’चा तो स्वाभिमान-आत्मविश्वास, त्याक्षणीं गेला होता तरी कुठं ?

नवं पाजळलेलं तें शस्त्र हातीं असतांहि, शत्रू जाण्याचीच ते वाट कां पाहात होते ?

जीवनांतला स्वतःचा बचाव करणारीं छत्रं हस्तगत करून घेण्यांत अगदीं पहिला नंबर लावणारे हे साधनांनीं सिद्ध असलेले शूरवीर ! पाऊस पडूं लागला, कीं, मग मात्र—त्या प्रत्यक्ष ‘ जीवन-संग्रामा ’ला घाबरून, पुढल्या अनुकूल कोरड्या क्षणाची वाट पाहात, वळचणीवळचणीला, भेकडपणं ते कोरडेच उभे !—कां ? खरंच, कां बरं असं ?—

मघांच्या त्या शिरीं पडलेल्या पर्जन्य—धारांपाठोपाठ, ज्ञानाची ही पहिली सर मनांत आली ! पावसाळ्यांत मला लाभलेलं एक नवं तत्त्वज्ञान...तें इथूनच सुरू झालं.

तेवढ्यांतच,—( छत्री असून व ती वापरूनहि ) छत्रीसकट सचैल-सर्वांग भिजलेले माझे शेजारी, मला थेट त्यांच्या दारांतच उभे दिसले.

त्यांचा चेहरा व धोतर हीं त्यांच्या नव्या छत्रीच्या उपयोगानें व रंगानें काळवंडलीं होतीं. त्यांना मी तशा स्थितींत ( मोडलेली व दांडा निखळलेली छत्री सांवरतांना ) पाहिलं,...या जाणीवेनें तर ते अधिकच रडकुंडीला आलेले दिसले.

आणि त्यामुळें ( परिस्थितीच्या माऱ्यांतून नुकताच सजीव बाहेर पडलेला माझा जीव जागा झाला. ) त्याच्या त्या नवख्या पावसाळी तत्त्वज्ञानांत तशी भरच पडली !

मला वाटलं--“ पाहिलं ना ? असणाऱ्या ’ ( ‘have’s ) लोकांचीच ‘ कांहीं एक नसणाऱ्या ’ ( ‘have’s not’ ) लोकांपेक्षां अशी जादा फजीती होते, या जगांत !—प्रतिकूल परिस्थितींत जन्मलेला मनुष्य, साहजिकच, अधिक



वरच्या पदाला चढतो; कारण, त्याला परिस्थितींतून वाट फोडायची—काढायची असते ! उलट, अनुकूल परिस्थितीमुळें, मनुष्य गाफील होऊन अधिकाधिक धोक्यांत पडत जातो ! ‘ मानाची माघार घेणं ’ ही तर चालू काळच्या महायुद्धांची नि साऱ्या राजकारणांचीच यशस्वी गुरुकिल्ली ! तेंच आजचं अमोघ शस्त्र ! होय !—परिस्थितीच्या या खऱ्या जाणिवेमुळेंच, पावसाबरोबरच्या माझ्या मघांच्या छोट्या युद्धांत, मी ती मख्खी वेळींच जाणली-राबवली. अंतीं यशस्वीहि झालों ! निदान माझं तोंड अखेर काळं तरी खास झालं नाहीं ! ”

आणि मग मला वाटलं—“ नाहीं तर ते मघांचे वळचणींत तोंड खुपसणारे हजारों दुबळे ‘छत्रपती’ !...किंवा ‘ छत्री दाखवून अवलक्षण करून घेणारे ’ हे माझे शेजारी ! ! ”

त्यांच्याहून किती श्रेष्ठ मी !

• • •

# पावसाळी गुन्हेगारी

खरं म्हणजे, एका तौलनिक उद्धट आत्मसंतुष्ट मनोवृत्तींतच मी त्यावेळीं होतों. छत्रीचा मी ‘ शत्रु नं. १ ’ होतों !

मला त्यामुळेंच वाटलं होतं—“ पाहा ! छत्री नसणं हा कांहीं गुन्हा नव्हे; नीट विचार केला, तर तो शहाणपणाच ! पावसानें झोड उठवली, कीं, कोणताहि शहाणा, त्या पर्जन्यराजाची जाण्याची वाट पहातच––घरांत, हॉटेलांत, अगर एखाद्या आडोशाला–सरळ ताठ उभा राहतो. पण पावसाळ्याच्या सुरवातीस, ‘ टिकाऊ छत्री ’ किंवा ‘ अस्सल रेनकोट ’ विकत घेण्याच्या आपल्या धडपडीच्या वेळीं मात्र, आपण ही साधीच गोष्ट सपशेल विसरतों ! त्यामुळें, या खरेदी केलेल्या ‘ टिकाऊ ’ वस्तू लंबे होऊं न देण्याची नि त्यांची चाळण होऊं न देण्याची खबरदारी घेतां घेतां, प्रतिक्षण होणारा मनस्तापच पुढें आपल्याला कायमचा सोसावा लागतो ! तर मग, त्यापेक्षां, पावसाला तोंड देत सरळ भिजून फिरणं किंवा त्याला घाबरून चार दोन दिवस...किंबहुना चार दोन महिनेहि, अगदीं घरकोंबडा होऊन ( अंडीं उबवत ) बसणं, हेंहि एक वेळ अधिक बरं ! ”—

पण पुन्हां मला उपरति झाली. आणि क्षणार्धांत, मनाचे खेळ गमतीचे निराळेच झाले.......



प्रकाश म्हणतांच आपल्याला मिणमिणत्या दिवटीभोंवतीं पसरलेलं भयाण काळोखी अरण्य दिसतं !...उन्हाळा म्हणतांच, वाफा टाकणारी बर्फाची लादी आपल्याला स्पर्श करीत असल्याचा किंवा हिवाळा म्हणतांच, अंगाभोंवतीं ऊबदार ‘ लालीमली ’ लपेटल्याचा क्षणभर सुखद भास होतो !

अगदीं थेट तशीच—पावसाळा म्हणतांच, त्या क्षणीं, एक काल्पनिक उघडी छत्री उडत उडत आली; नि माझ्या डोक्यावर डुलत राहून मला सुखद छत्र करूं लागली.

पावसाळा आणि छत्री या दोन गोष्टींचं हें साहचर्य माझ्या मनाला तसं पटल्यावर, नव्यानें बंड पुकारून, त्यानें एकदम एक उलटीच पलटी खाल्ली !

मला वाटलं...“ पावसाळ्यांत छत्री असणं–नसणं यावर सर्व कांहीं, अगदीं माणसाची माणुसकीहि फार अवलंबून आहे;...किंबहुना, आपल्याकडे ती नसणं, हा एक फांशीची शिक्षा देण्यायोग्य असा घोर गुन्हाच होय ! ”

माझ्या मनानें अशी क्षणांत पगडी फिरवल्याबद्दल मला कोणी चंचलतेचा दोषहि देतील. पण खरं प्रवाही तत्त्वज्ञान हें विचारांतीं असंच वारंवार बदलत असतं ! त्यांत मला कमीपणा कसला ?

मघांच्या मनोभूमिकेंत छत्री आपल्याकडे नसण्याचं समर्थन करतांना, मला वाटत होतं...“ ती नसल्यामुळें पावसाळ्याची खरी मौज आपल्याला अनुभवतां येते. विजाइंद्रधनुष्यांसारखं नभोवैभव, ‘ छत्री-आड ’ न होतां, सारं मनसोक्त पाहतां येतं. सभोंवार सांचलेल्या लहान-मोठ्या डबक्यांत—‘ मध्यें लंबित अपुलें भुवन ’ चा सुखद भास, आपल्याला क्षणोक्षण, पावलोपावलीं, होतों. क्वचित्, छत्रीच्या निमित्तानें, ‘ नव्या ओळखी ’हि होतात. चालू महागाईत पैसा वांचतो. छत्री नसल्यामुळें, पाऊस अंगावर कोसळला, तरी तीच खुद्द हातोहात हरवल्याचा प्रसंग अगर त्या पाठोपाठ होणारं दारुण दुःख तरी आपल्यावर कोसळत नाहीं ! ”

पण, आतां मला उलट वाटतंय्,...केवळ ‘ अप्रस्तुत मूलगामित्वा ’च्या मानसशास्त्रीय नियमाचंच तें एक ठसठशीत उदाहरण होतं.

छत्री नसण्यापासून, आपल्याला व दुसऱ्याला त्रासच अधिक होतो, हेंच अधिक खरं ! याचे अनेक पुरावे देतां येतील....

म्हणजे–वेळ मोडतो;...पाऊस जाईपर्यंत दुसऱ्याला अघळपघळ गप्पांत गुंतवावं लागतं. त्याच्याकडून, वेळीं अवेळीं, चहा ' उकळण्या'कडे आपली घातुक प्रवृत्ति होते. दुसऱ्याच्या छत्रींतून जाण्याचा वारंवार मोह होतो. मालकासकट तिघे जाऊं लागले, म्हणजे सगळेच भिजतात, हें खरं; पण छत्री नेहमींच नसणाऱ्यांना तसं भिजण्याची संवय असल्यामुळें, ते हातोहात सुटतात; उलट, आपला छत्रीवाला भिडस्त मित्र मात्र, थंडीवाऱ्यानें शेवटीं अकस्मात् दगावण्याचीच भीति असते !

हळूच कानांत विचारतोंय् हें तुमच्या मी...सभ्यांतल्या सभ्य माणसालाहि, क्वचित् क्वचित्, दुसऱ्याची चांगली नवी कोरी छत्री चोरण्याचा मोह होत असतो,...याचा तुम्हालाहि आहे ना अनुभव ?...

या दृष्टीनेंच, अधिकाधिक सर्वांगीण विचार करून, मला आतां ठाम वाटतं, कीं, समाजांत राहणाऱ्या एखाद्या माणसाकडे छत्री असणं-नसणं ही मुळीं त्याची वैयक्तिक बाब असूंच शकत नाहीं ! त्या परिस्थितीला एक सामाजिक पार्श्वभूमी व सामाजिक महत्त्व आहे. एकमेव सरळ गोष्ट अशी आहे, कीं, ' पावसाळ्यांत आपल्याकडे छत्री असणं, हीच खरी नैसर्गिक स्थिति; ती नसणं हेंच अनैसर्गिक !–ती असणं हीच आपल्या नीतिमत्तेची परमोच्च खूण; ती नसणं हा एक अक्षम्य सामाजिक गुन्हाच ! '

कां ? मनांत संशय डोकावतोय का तुमच्या ? मग स्पष्टतेसाठीं एकच उदाहरण सांगतों.—

माझ्या एका बिनछत्रीवाल्या दोस्तानें एकदां माझ्याकडे आपल्या मनाची मळमळ मोकळी केली; तो म्हणाला—" जरा विचार करा...या पावसाचा नि शहरांचा हो काय संबंध ? तिथं काय शेतं पिकायचीं असतात ? बरं, केवळ रस्ते–गटारं धुण्याचीच जर ही बाद असेल, तर मधून मधून, रात्रीचा, हवा तर, हवा तेवढा तो पडावा, कीं..."



हा माझा मित्र सुदैवानें रात्रीं घरांतच सांपडतो याची मी हमी घेतों; नि त्यांतल्या त्यांत ती समाधानाची गोष्ट होय. नाहीं तर, त्यानें पावसाला मध्यरात्रीं नंतर केव्हांची तरी ' अपॉइंटमेंट ' दिली असती ! नाहीं कोणी म्हणावं बुवा ?

तेव्हां, यांतून एकच दिसतं–पावसाळ्यांत छत्री नसण्याची एक अनैसर्गिक परिस्थिति एखाद्याच्या आयुष्यांत एकदां ठाण देऊन बसली–कीं, असल्या अनेक अनैसर्गिक चमत्कारिक कल्पना त्यांच्या मनांत आपोआप शिरतात. बैठक मारूनच बसतात.

उलट, आपली एक मालकीची छत्री असल्यावर, असलं कांहीं कोणाला सुचेल का ?—छे : ! नांव नको !—

आणि—छत्रीबाबतच्या सामाजिक जबाबदारींचा, नीती–अनीतींचा प्रश्न डोकावतो, तो इथंच !—

फक्त रात्रीचा पाऊस पडतो, असा एकदां वारंवार अनुकूल अनुभव आला,...कीं, तो छत्रीहीन मनुष्य, दिवसां पाऊस न पडणं हें नैसर्गिकच धरून चालणार ! तसा तो कधीं पडला, तर त्याबरोबर, त्याच्या कपाळावरहि आठ्यांचं जाळं पडणार ! ओघानेंच, त्याची नैसर्गिक सहानुभूति, नेहमीं, अनैसर्गिक अशा ' कोरड्या पावसाळ्या ' कडे, आणि...पार्यायानें दुष्काळा-कडेच असणार !

मग, तो एक भयंकर समाजद्रोही नव्हे, तर आणखी कोण ? तुम्हीच सांगा—

तेव्हां, याच महत्त्वपूर्ण दृष्टीनें, या बाबीकडे आपणहि पाहिलं पाहिजे.

पाऊस पडावा म्हणून शंकर पाण्यांत बुडवण्यासारख्या जुन्या काय अगर सामुदायिक प्रार्थना करून पावसाला आळवण्यासारख्या नव्या काय...कोण-त्याहि सामाजिक हिताच्या कल्पनेइतकीच ही ' छत्रीच्या जबाबदारीची ' बाब गणली पाहिजे; आणि समाजहिताच्या दृष्टीनें, समाजांतील प्रत्येक लहान–मोठ्या व्यक्तीकडे, ' पावसाळ्यांत चार महिने छत्री असलीच पाहिजे ' असा आपल्या उगवत्या लोकशाहीनें लागलीच एक कायदा पास केलाच पाहिजे; तो तात्काळ जारीहि झाला पाहिजे !

मग, स्वतःची छानदार छत्री असलेला प्रत्येक मनुष्य, आपल्या उपजत अहंगंडानुसार, ती चारचौघांत मिरविण्यासाठीं तरी, पावसाची नेहमीं चातकाप्रमाणेंच वाट पाहील. हो, आणि मग सर्वांच्या सांघिक सहानुभूतीनें व इच्छाशक्तीच्या प्रभावानें, दरवर्षीं, पावसाळ्यांत पाऊस पडेल !

आणि तसा तो वेळींच पडला म्हणजे ?

म्हणजे ? म्हणजे काय ?

उकाडा नि घामोळं जाईल; रस्ते धुऊन निघतील...नि त्याच वेळीं, ( नेहमीं काळजीपूर्वक आंघोळ न करणारीं ) कांहीं माणसं देखील स्वच्छ धुऊन निघतील. अशा वेळीं, छत्र्या असूनहि स्त्रीपुरुष पावसांत सचैल भिजल्यामुळें, विविध गमतीचीं ' मृच्छकटिकीं ' दृश्य,—वर्षांतून एकदां तरी—सर्वांनाच राजरोस नि फुकट पाहावयास मिळतील. उसासणारीं मनं नि झुरणारीं शरिरं क्षणकाळ निवतील. हवेंत गारवा येईल; त्यामुळें रोग्यांना टवटवी येईल; सारी रोगराईच जाईल ! पावसाची सुटी मिळाली, कीं, मुलं रस्त्यारस्त्यांतून कागदी होड्या सोडतील; नि कल्पनेनें लांबलांबचीं जलपर्यटणं करूं लागतील ! डोंगरदऱ्यांतून पाण्याचे पाट नि पाचूच्या मखमलीचे मनोहर सारीपाट पसरतील. नद्यांना पूर, झाडांना टवटवी, गुरांना चारा ! शेतं हिरवींगार; मग पुढं कणसं घोंसदार !...असा सारा आनंदच आनंद अपार !!

आणि हीं सारीं सामाजिक विविध सुखं कशीं लाभतील ? तर पावसाळ्यांत आपल्याकडे एक छत्री असण्यासाठीं, वेळींच, स्वतःचे चार पैसे स्वतःसाठींच खर्च करण्याची, आपलीच सामाजिक जबाबदारी आपण तत्परतेनें सांभाळली, म्हणजे ! निर्मळ स्वार्थांतूनहि परार्थ—परमार्थ साधतां येतो तो असा !

मग पाहा बरं, प्रत्येक पावसाळ्यांत प्रत्येक माणसाच्या हातांत दिसणारी छत्री, ही प्रत्येक सौभाग्यवतीच्या गळ्यांतल्या मंगळसूत्रासारखीच समाजांतील एक नैतिक बाब नव्हे काय ?

आणि मग, या विचारानेंच, भर पावसाळ्यांतहि छत्रीविरहित फिरणारा असा मनुष्य म्हणजे पुच्छविहीन पशूप्रमाणें नि समाजद्रोही घोर गुन्हेगाराप्रमाणेंच दयामाया दाखवण्यास अगदीं नालायक ठरणारा प्राणी नव्हे काय ?

# पावसाळी छत्र

वास्तविक पाहतां, छत्री किती सुंदर चीज आहे ? वेळींच अंथरुण पाहून दांड्यागोड्यांचं सौंदर्य दाखविणारं आटोपशीर सुन्दर रूप धारण करण्याइतका—पण उलट, जरूर तेव्हां ऐसपैस जागा व्यापून, (स्त्री जातीचा विनय सोडून) चारचौघांना धक्के देण्याचा उद्धटपणाहि दाखवण्याइतका तिच्यांत व्यवहारी चाणाक्षपणाहि सांपडतो.

तिच्याबरोबर आणखी एक काठी बाळगणारे कांहीं म्हातारे, आपला एकूण भार काठीवरच अधिक आहे, असं सिद्ध करीत असले, तरी हल्लींच्या सर्रास सुरेबाजीच्या काळांत व अहिंसेच्या कायदेकानूनमधें, तरुणांनाहि बंद छत्री कांहीं प्रमाणांत स्वसंरक्षणासाठीं राजरोस वापरतां येतेच.

बंद छत्री काळोखांत रस्ता कापील. घरांतल्या मुलांना घोडा घोडा करायला परवानगी देईल; तर ' श्रीपाद कृष्णां 'च्या अनुभवाप्रमाणें, उघडी छत्री मस्त बैलाइतकीच चढेल धनिकाला अगर नको असलेल्या माणसालाहि तोंड देण्यास व बघतांबघतां त्याला ' छत्रीआड ' करण्यास उपयुक्त होईल ! उघड्या छत्रीच्या साहाय्यानें तोंडाळ बायकोशीं दोन हात करतां येत नसल्यामुळें गोविंदाग्रज कवी हळहळले; मला तो अनुभव नाहीं. तरी हातांतल्या उघड्या छत्रीमुळें, भर रस्त्यांत, बंद खोली मात्र निर्माण होऊं

शकते !...आणि या खोलीच्या वर्तुल भिंतींत राहून, केवळ औपचारिक शुष्क प्रश्नोत्तरांच्या सरबत्तींतून तरी आपण शीरसलामत वांचतों. हा माझा अनुभव आपणहि जमेस धरण्यासारखा खास आहे !...

मात्र माझ्यामतें, इतर खोल्यांप्रमाणेंच आपल्या या खोलीलाहि, एकदोन मोक्याच्या खिडक्या जरूर असाव्यात; म्हणजे मग, नको तें दृश्य समोर येतांच, हातांतील दांडा गरकन फिरवून, 'बंद खिडकी' डोळ्यांसमोर आणतां येईल; उलट, वेळीं सबमरीनमधील दुर्बिणीप्रमाणें, तिचा उपयोग करण्यासाठीं ती चौफेर फिरती ठेवतां येईल. अशावेळीं, पाहतां पाहतां, आरास केलेल्या एखाद्या गणपतीच्या डोक्यावरील छत्रीची, आपल्याकडे पाहातां पाहतां, कोणालाहि आठवण होऊं शकेल !--

छत्रीसारख्या या महान् मानवी शोधाच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचा, कुतूहलानें जरा अधिक सखोल विचार करूं लागल्यास, आपली खूपच करमणूक होण्यासारखी आहे--खऱ्या इतिहासाशीं मला कर्तव्य नाहीं. पण मला वाटतं, सुरवातीस, 'या नव्या चीजेला छत्री म्हणतात' असं जाहीर करण्यासाठीं--'छत्री'--अशी मोठींथोरलीं अक्षरंच तिथं लिहिलीं गेलीं असतील. मग, परिचयानें, पुढें पुढें, इतर वस्तू (नांवांच्या लेबलांशिवाय) आपण जशा ओळखूं शकतो, तशीच छत्रीहि ओळखली जाऊं लागल्यावर, हीं अक्षरं तिथून निघून गेलीं असतील. मग ती जागा मालकी हक्काच्या कल्पनेनें बळकावली असेल.

सुरवातीस तरी निर्भेळ उपयुक्ततावादाची ही बैठक होती असावी. पण हळूंहळूं, त्याला सौंदर्याच्या कल्पनेचेहि फांटे फुटले असतील. आणि मानवानें मानवासाठीं शोधलेले हें साधन, त्याच्या उत्क्रांतीनुरूपच, आपलं स्वरूप हळूहळू पालटत गेलं असेल.

इतर बाबतींतले आपले अनुभवहि आपणाला हेंच दर्शवतात –

प्रथम शरीर पूर्ण झांकायला मानव साधीं जाडीं-भरडीं वल्कलं वापरी. पण आज आतां, त्या जागीं झिरझिरीत व वेलबुट्यांच्या (नायलॉन कीं क्रायलॉनच्या ?) तलम कापडाचे लांडे पारदर्शक झगे आलेच कीं नाहीं ? किंबहुना, वस्त्र ठिकाणावर असूनहि तें साफ नसल्यासारखंच पाहणाऱ्याच्या



दृष्टीला दिसावं, या बाबतची अहमहमिकाच चालू काळांत चालू आहे ! नाही ? मग, तलम कापड, घोंसदार दांडा, डौलदार बांक, नाग-कुत्रं,-मांजर-सिंह यांची शिरं मिरवणारा शेंडा, कमळाच्या काड्या, 'रबरनी रिंग', इत्यादि प्रकारें सुरवात होऊन, पुढं पुढं आपलं हें शिरो-रक्षणाचं साधन मानवानें सुशोभित (पण, नकळत तकलदीहि) करत आणलं असावं ! यांत नवल तें कसलं ?

हो, माणसाच्या या संगतीचाहि छत्रीवर असाच परिणाम झाला असावा. त्यामुळेंच, त्याच्या कमी होणाऱ्या आयुर्मर्यादेनुसार तिचंहि आयुष्य व तिच्या सुरवातीच्या सोळाअठरा काड्यांची संख्या कमी कमी होत, आठावर म्हणजे निम्यावर आली. एकाच पावसाळ्याला, एकेका माणसाच्या दोनदोन तीन-तीन छत्र्याहि 'मरूं लागल्या'. नि जिवंत छत्र्यांच्या डॉक्टरांचं बिल तर अफाट वाढूं लागलं; अगदीं आपल्या घरांतल्या माणसांच्यासारखंच !

आणि माणसाचा जन्मजात मालकी हक्क गाजवण्याचा हा स्वभाव ? तो तर छत्र्यांवर अत्यंत सुबकपणें व विविध स्वरूपांत उमटलेला दिसतो !

फक्त आपलं नांवच घालून समाधान न पावल्यामुळें, नांवाअलीकडे-पलीकडे सजावटीसाठीं वेलबुट्ट्या, रंग, धागा इत्यादींची योजना करण्याचीहि हळूंच एकदां त्याला इच्छा झाली ! छत्र्यांवर नांवं घालण्याचा व घालून घेण्याचा हा नाद मध्यें कांहीं काळ तर इतका वाढला, कीं, त्याचं स्वतंत्र संशोधन करून, प्रबंध लिहून, 'छत्र्यांचा डॉक्टर' हि एखाद्याला होतां येईल.

एवढं मात्र खरं, की, मालकी सिद्ध करण्याबरोबरच त्याचे त्यांत इतरहि हेतु असावेत. चोराला धाक वाटावा; एखाद्या नवख्या पेन्टरचं पोट भरावं; आपल्या बायकोची 'कशीबशी'-कलाकुसरी चारजगांत सहज प्रगट होऊन, तिचीहि जातां जातां वाहवा व्हावी; अगर (आपलं नांव कुठंच प्रसिद्ध होण्याचा संभव नसणाऱ्याला) भररस्त्यांतून फिरतांना, आजूबाजूनें जाणाऱ्या-येणाऱ्यांनीं आपलं नांव (गांव-पत्त्यानिशीं) मोठ्यानें उच्चारलेलं ऐकण्याचं सुख लाभावं, इत्यादि हेतु त्यांत नसतीलच, असं कोण म्हणेल ?

आणि असं आपलं नांव घालण्याबद्दलहि माझा मुळींच वाद नाहीं. पण, त्या नांवाचं व तें घालतांना वापरावयाच्या विविध रंगांचं अगर त्याभोंवतीं काढावयाच्या वेलबुट्ट्यांचं एकमेकांशीं कोणतं प्रमाण असावं, हें ठरवणं मात्र कठीण काम आहे. आणि माणसांच्या बुद्धीला त्याबाबत खात्रीनेंच मोठं थोरलं धोरणी गणित सोडवावं लागलं असेल !

कारण, तसं न झाल्यास वाचणाऱ्याच्या डोळ्यांपुढें फक्त तांबडे, पिवळे, हिरवे, निळे काजवे चमकल्यासारखंच नुसतं होईल; अगर, भोंवतालच्या वेलबुट्ट्यांच्या जाळ्यांत, करवंदीच्या जाळ्यांप्रमाणें तो अडकून–गुरफटून पडणार; व त्यांत दडलेल्या नांवाच्या बारक्या अक्षरांकडे मात्र त्याचं दुर्लक्ष होणार !

आणि मग, नांव घालण्याचा, मालकाचा मुख्य हेतु कसा सफळ व्हावा ?– नांवांतच नसतं का सारं ?

पण कदाचित असंच झालं असेल, मला वाटतं—

एकानें आपल्या नांवाची शोभा वाढवण्यासाठीं जवळ एक कुंडी ठेवली; लागलीच दुसऱ्याला तींत एक झाड किंवा वेल लावण्याची इच्छा झाली. तिसऱ्याच्या कुंडींतील वृक्षलतिकांना आकाशांतून पडणाऱ्या पावसाच्या महामूर पाण्यानें आपोआप पर्णपुष्पें लागलीं असतील. आणि एकदां तीं रंगीबेरंगी फुलं चौफेर दिसूं लागल्यावर, भोंवतालच्या लहानमोठ्या फुलपाखरांना उडत येऊन तिथं बसायला कितीसा उशीर लागणार ?—

कांहींच्या छत्र्यांवर अजूनहि दिसणाऱ्या असल्या अफाट जंगलांची उपपत्ति लागली, तर अशा तऱ्हेनेंच लागायची !

रंगांच्या योजनेबद्दलहि असाच एक कयास मला बांधावासा वाटतो.—

प्रथम, एकानें आपल्या काळ्या छत्रीवर पांढरीं अक्षरं घातलीं; तेव्हां, दुसऱ्यानें आपल्या पांढऱ्या छत्रीवर काळीं अक्षरं घातलीं. मग या दोन टोकांच्या मुख्य कृष्ण-शुक्ल–पक्षांनीं, आपल्या मधल्या सर्व सुप्त सत रंगछटांना आपापल्या छत्र्यांवर निरनिराळे अगर संयुक्त संसार थाटायला जागा मोकळी करून दिली.



अर्थात्, मग वर्णसंकर व्हायला कितीसा उशीर लागतो ? रंगारंगांप्रमाणेंच रंग–वेलबुट्ट्यांचेहि मिश्रविवाह व मिश्रसंसार होऊं लागले. आणि मग, हां हां म्हणतां, छत्र्यांवर झालेल्या या नव्या वसाहतींत, आमच्या हिंदुंच्याच पावलांवर पाऊल टाकून, अठरापगड जाती दाटीदाटीनें पण 'सुखानें' नांदूं लागल्या !

छत्र्यांच्या आकार–रंगांकडे पाहूनहि, त्यामागलं समाजकारण–राजकारण लक्षांत यावं, असं उत्कट कुतूहलहि आपल्या मनांत डोकावून जातं—

कोडं वाटतं—सुरवातीस एकाच आकाराच्या असलेल्या छत्र्या निरनिराळ्या कशा झाल्या असतील ?

मला मात्र वाटतं, समान हक्कासाठीं भांडणाऱ्या बोलघेवड्या बायकांचीं तोंडं एकदम बंद करण्यासाठीं, त्यांच्या हातांत पुरुष कारागिरांनींच बुटक्या, बिनदांड्यांच्या, कमी काड्यांच्या,...अशा निराळ्याच प्रकारच्या छत्र्या—'सुंदर व इष्कीबाज' असा उगीचच बभ्रा व आभास निर्माण करून—जास्त किंमतींत दिल्या. आणि बिचाऱ्या साध्याभोळ्या बायका ! त्यांतच समाधान मानून मोठ्या किंमतीच्या त्या नव्या काव्याला त्या फसल्या !

बुद्धीपेक्षां भावनांवरच अधिक मदार ठेऊन चालणाऱ्या या बायका ! अशा एकदां त्या हातोहात फसलेल्या पाहून, नेहमीं अतिसावधगिरीनें वागणाऱ्या म्हाताऱ्याकोताऱ्यांनीहि, आपलं वैशिष्ट्य दाखवण्यासाठीं, आपल्या अनुभवाला अनुसरून मोठ्या घेरांच्या व आपल्या केसांना अनुसरून पांढऱ्या रंगाच्या छत्र्या तयार केल्या असाव्यात !–इतरहि कोणी, गय करून, त्या म्हाताऱ्यांच्या वाटेला गेले नसतील !...बघतां बघतां, त्या तऱ्हेच्या छत्र्याहि मग रूढ झाल्या असतील !

तेव्हां, मला तरी वाटतं, अशा तऱ्हेनें, हां हां म्हणतां, या उपयुक्त शोधाच्या बाह्यस्वरूपांत मानवी पराक्रमानेंच असा मोठा गोंधळ उडवून दिला. त्यामुळेंच, त्यांत भयानक गणितश्रेढीनें अशा पोटजाती निर्माण होत होत गेल्या; बजबज माजली !—

या छत्र्यांच्या आकार-रंग-रुपावरून त्यांच्या मालकांचं मनोविश्लेषण करतां येईल, असं कोणी म्हणतात; पण ती विद्या मला कांहीं अवगत नाहीं.

एवढं मात्र खरं, कीं छत्र्या धरण्याच्या पद्धतीवरून आपल्याला त्यांच्या मालक–पालकांबद्दल थोडंफार तरी निश्चित धोरणानें सांगतां येईल !

बंद छत्री बंदुकीप्रमाणें खांद्यावर टाकून चालणारा मनुष्य...हा बहुतेक पेन्शनर किंवा पेन्शनीजवळपास आलेला असतो. 'आपले आजन्म आज्ञाधारक सेवक' ही अंगीं मुरलेली त्याची वृत्ती त्यांत छानदारपणें प्रतिबिंबित होते !

दुसऱ्याला दुखापत होऊं नये अशा बेतानें, खालीं टोंक केलेली छत्री खाकेंत मारून चालणारे लोक ! ते हमखास चार कच्च्याबच्च्यांचे धनी असतात;—तर उलट, स्वर्ग–आकाशाकडे अगर लोकांच्या डोळ्यांकडे टोंक करून गडबडीनें ट्राम-ट्रेनमधून उतरणारे लोक !...एकतर ते घोडब्रह्मचारी तरी असतात; किंवा एकाद्या कजाग बायकोचे ( स्वर्गाचा सरळ रस्ता आपल्याला कधींच मोकळा होणार नाहीं, अशी डॉक्टरी पुराव्यानिशी जवळजवळ खात्री झालेले ) 'तिरसट नवरे' असतात.

पण जमिनीला समांतर ठेवून खाकेंतच मारलेली छत्री वागवणारे छत्रपति ? त्यांचं काय ? ते कोणाच्या कधींच अध्यामध्यांत न येतां, सर्वांनाच समांतर असा मध्यम आयुर्मार्ग अवलंबिणारे कारकून असावेत ! असा बिनधोक अनुमानधपका करावयास कांहीं हरकत नसावी !

आणि आपल्या वांकड्या मुठीच्या छत्रीला मुठींत ठेवण्याची लटपट करण्याऐवजीं, आपल्या एका हाताचा काटकोन करून, त्यावर तिला ऐटींत लटकवून, शांतपणें चाललेले लोक तुमच्या पाहण्यांत आले असतील ना ?—ते लोक–असेल त्या परिस्थितींत, समोर वाढून आलेलं संसाराचं साधंसुधं ताट, चविकपणें चाखणारे...प्रसन्न मनाचे गृहस्थ असतात ! असा माझा तरी अनुभव आहे.

रबराच्या फितींत कापड गुंडाळून छत्री एखाद्या काठीप्रमाणें मधूनमधून टेकत जाणारे प्राणी ? ते रुबाबदारींत रंगलेले तरुण असतात, हें निश्चित !—मग ते उपवधू असतील किंवा नुकेतंच लग्न होऊन अजून प्रणयाचा उन्माद न संपलेले असतील !—



पण छत्री हातांत घेऊन आपल्या चपलांप्रमाणेंच तिलाहि फरफटत फरफटत नेणारे लोक ? त्यांना कोणत्या गटांत निश्चितपणें टाकतां येईल ? तें ठरवणं मात्र जरा कठीण आहे ! तथापि, त्यांच्या छत्रीच्या बोंथट टोंकाप्रमाणेंच त्यांच्या आयुष्यालाहि त्या बरोबरच बोथटपणा आलेला असतो. तिच्याप्रमाणेंच त्यांचाहि बराच भपका फुकट असतो. ते विवाहित असले, तर–आपल्या छत्राखालच्या बायका–मुलांच्या लटांबराला, आपल्याबरोबर ते तसेच अनिश्चितपणें फरफटत नेत असतात. आणि ते विवाहित नसले, तर साऱ्या जगालाच आपल्यामागून रस्त्यानें फरफटत नेण्याचा आपला जन्मसिद्ध हक्क ते बजावून टाकतात !—

माणसांप्रमाणेंच छत्र्यांच्याहि जाती असतात. हें ठाऊक आहे का तुम्हांला ?—नेहमींच्या अनुभवांतला हा एक नियमहि लक्षांत घ्या—

एखादी विशिष्ट पार्श्वभूमी व तिच्या साहचर्यानें राहणारी वस्तू यांतला अपेक्षित नैसर्गिकपणा कमी झाला, कीं, तें जगावेगळं होतं, नि म्हणून—कोणाचहि तिकडे लक्ष जातं !—

धोतराच्या कांच्यावरच शिरोभागीं घातलेल्या हॅटवरून, आपण पुणेरी-नागपुरी तरूण पटकन् ओळखतों. अंगांतील विशिष्ट सूटवरून, विजारीच्या पायाच्या रुंदी-लांबीवरून किंवा हातांतील 'गणपती' छाप बाजारी पिशवी-वरून, आपण एखादा गांवठी प्रोफेसर ओळखतों. खरं ना ? तिथं हाच नियम राज्य करीत असतो !

मग हाच नियम छत्र्यांच्या जातींच्या उपयोगाबाबत वापरणं तसंच फलदायी होईल !—

त्या ठिकाणीं नको त्या जातीच्या छत्रीची मूठ मुठींत धरून आपण चालूं लागलों, तर लोकांचं लक्ष आपल्याला आपल्याकडे नक्कीच आकर्षून घेतां येईल.

कळ दाबतांच उघडणारी–बंद होणारी छत्री घेऊन कोणी खेडेगांवांतील भरबाजारांत उभं राहिलं–तर तिला पॅराश्यूटच व तिच्या मालकाला युद्ध-वैमानिकाचं महत्व खास येईल !...धोंगडी पांघरून कोणी पांढरपेशा गिरगांव नाक्यावरून जाऊं लागला, तर त्याचा ' दे. भ. ' पणा जगजाहीर होऊं शकेल. थोडं पुढं चालून जाऊन ठाकुरद्वारच्या नाक्यावर एखाद्यां जवानमर्दानें आदीवासींची ' ईरली ' शिरावर घातली, तर त्याचक्षणीं त्याला ' कॉम्रेड ' ठरायला कांहींच हरकत नाहीं.

आपल्या छत्रीकडे पाहण्याची त्या छत्रपतीची व त्या छत्रपतीकडे पाहण्याची इतरांची...ही नवीन दृष्टि !...अत्यंत विविध नि अत्यंत मनोरंजक तर खरीच ! !—

• • •

# पावसाळी धोरण

जीवनांतील क्षुल्लक गोष्ट का असेना–तिच्याकडे पाहण्याची नवी दृष्टि नेहमीं प्रगतिकारक नि उपकारकच असते...पण—

सावधगिरी व उपयुक्ततावाद यांचा सदैव सासुरवास मानवाच्या साऱ्याच जीवनाला ग्रासलेला दिसतो. आणि त्या सामान्य नियमाला धरूनच, छत्री ' नामांकित ' करण्याच्या कल्पनेला कावेबाजपणाची पुढेंपुढें दुमड पडत गेली. फर्लांगावरून दिसूं शकणारीं सुरवातीचीं ( ' मारवतीराव गयानबा शिनदे ' असलीं ) छत्रीच्या दोनदोन तीनतीन खणांत मावणारीं नांवाचीं अक्षरं ! आकारानें लहान होत होत, अखेर तीं गुप्तच झालीं. पुढें मागें मोडक्या होणाऱ्यां छत्रीचे मालक म्हणून ठरण्याची आपल्यावर पाळी येऊं नये, प्रच्छन्न गुप्त नांवाची चोरालाहि दहशत असावी नि आपल्या गुप्त खाणाखुणांवरून, त्याला चारचौघांत पकडून, मागून लाजवतां यावं, असली एक मुत्सद्देगिरी त्यांत शिरली.

सुदैवानें छत्र्यांच्या मुठी सुलभपणें निघण्याइतक्या त्या तकलादी होत गेल्या ! मग तर तीच मुत्सद्दीगिरी कांहींनी पराकोटीला पोंचवली. पूर्वीच्या काळच्या गुप्तीकाठीला अनुसरून त्यांनीं नांवपत्ता आंत दडवण्यास सुरवात केली. त्यानीं आपल्या नांवाची झांकली मूठ अशी सव्वा लाखाची केली !

पण त्या छत्र्या हरवल्यानंतर मात्र एकच एक हाहाःकार उडूं लागला; त्यांच्या त्या मुठींतच्या गुप्त पत्त्याचा त्यांनाच मागून राजरोस पत्ता लागेनासा झाला....त्यामुळें, त्यांना त्याबरोबरच अधिक गुप्त पोलिसीहि सुरू करणं भाग पडलं.

त्याचा पुढें परिणाम असा झाला, कीं, चोरलेली ती छत्री घेऊन चोर सावासारखा चालूं लागला. छत्री चोरीस गेलेले हे एके काळचे मालक मात्र, दुसऱ्यांचे डोळे चुकवून, चोरटेपणें इकडेतिकडे पहात, इतर साऱ्या लोकांच्या छत्र्या वरखालीं फिरवून पाहातांना आढळूं लागले. कधीं कधीं तर सारख्या दिसणाऱ्या मुठी आसक्तिपूर्ण अंतःकरणानें पाहातांना अगर कधींकधीं ‘ खात्री-पूर्वकपणें’ त्या मुठी निखळून काढतांना, इतरांनी त्यांना मुद्देमालासकट पकडलं. त्यामुळें, त्यांच्या छत्रीची पूर्वीं चोरानें केली होती तशीच, शेवटीं तिच्यासकट त्यांचीहि उचलबांगडी पोलिसांनी आतां मॅजिस्ट्रेट कोर्टाकडे केली !

त्या प्रकाराची मात्र दहशत घेऊन, अलीअलिकडे बहुतेकांनी छत्र्यांवर नांवं घालण्याचं बंद केलं आहे नि आपल्या इतर बांधवांबर अधिक विश्वास टाकून छत्रीसह फिरण्याचं ठरवलं आहे. अर्थात्, त्यामुळें कांहींच्या पोटांवर पाय आला असल्यास इलाज नाही !

पण त्याच सुमारास किफायतशीर असा जाहिरात-जमाना सुरू झाला. आंत राहणाऱ्या संसारी जीवांना आसरा करण्याचं मुख्य काम, कसाबसा जीव धरून, मेटाकुटीनें वावरणाऱ्या मुंबईमधल्या घरांच्या पडक्या भिंती ! पण, त्याहि आतां बाहेरच्या बाजूनें कोणातरी बाहेरच्या धंदेवाईकांच्या मालांचा रंगीबेरंगी जाहिरात संसार मिरवूं लागल्या ! मालकांना पडक्या भिंतींचं दुहेरी भाडं मिळूं लागलं !

फार काय ? धांवत्या गाड्या, पळत्या ट्रामबसी, तटस्थ स्टेशनं, दांड्यांचे पंखे, बाजारी पिशवी ( पुढंपुढं तर, काड्याच्या पेट्या नि ट्राम-बसचीं तिकिटं देखील ) उठावदार जाहिराती करूं लागल्या !

हळुहळू याबाबतचे कल्पना-साहचर्य अखेर टिकाऊपणें वाढत गेलं; इतकं, कीं मग, एखादी गजबजलेल्या चौफाट्यावरील भिंत किंवा एखादं ट्रामचं



तिकिट ( दुसऱ्या बाजूनें ) कोरं दिसलं, कीं पाहणाऱ्याला कसंसंच वाटून, त्याचाच जीव कासावीस होऊं लागला !...

आणि यामुळेंच–कांहीं कल्पकांना, उघडी छत्री आंतबाहेर काळी कुळ-कुळीत पाहूनहि, कसंसंच वाटूं लागलं !–हो, कवीला होणाऱ्या नव्या कवितेच्या जन्मवेळासारखीच ती त्यांची अस्वस्थता होती !—

तत्काळ, पूर्वींच्या जमान्यांतील मालकी हक्काच्या नांवांऐवजीं, तिथं–‘ कॅप्टन चहा ’–‘ गॉडसन् कॉफी ’ ‘ कोडेकर मसाले ’ ‘ प्रो. काबारींचा त्रिकालदर्शी अद्‌भुत आरसा ’ असले मजकूर आले ! आणि मुख्य म्हणजे इतर निनांवी चालू छत्र्यां इतकाच याहिछत्र्यांचा उपयोग होत असून देखील, वापरणाऱ्यांना त्या विनामूल्य मिळूं लगल्या ! त्यामुळें त्यांतच लोकांनाहि ‘ अर्थ ’ दिसूं लागला !

दुसऱ्यापेक्षां स्वतःच्याच धंद्याची अशी जाहिरात करायचं ठरवून ‘ टायपिंग स्वस्त दरांत; इथंच भेटा ! ’ ‘ शिकवण्या रु. १५ अगर त्याहून कमी–चौकशी तर करा ! ’...‘ युवर मोस्ट ओबीडिअंट सर्व्हन्ट–शिफारस-पत्रें खिशांत आहेत ! ’—अशीं पुकारवाक्यं, स्वतःच विकत घेतलेल्या छत्री वर घालून, फिरण्यास वास्तविक कांहींच हरकत नव्हती.

पण, स्वतःचा संसार उघडा टाकून, चार पैशांच्या तात्कालिक फायद्या-साठीं, दुसऱ्यांचे संसारच सजवणारे बिनतडफेचे गतानुगतिक लोकच आमच्यांत अधिक !

तेव्हां–अशी आळशावर गंगा आली म्हणून, या नवीन जाहिरात–कल्पनेचा उपयोग स्वतःला फायदेशीर करून घेण्याचा, पुरोगामी धंदेवाईकपणा आमच्या सनातनी वृत्तीला कधींच झेंपला नाहीं !—आणि तो कधीं झेंपणारहि नाहीं !–ब्लॉक हेडलाइनींसह इंग्रजी वर्तमानपत्रं छापलेले नव्या धर्तीचे ( ? ) बुशकोट ( ‘ अपटुडेट ’ म्हणून ) अंगावर चढवून, स्वतःला मोठ्या तोऱ्यांत मिरवणारे ‘ बेकार ’ मूर्ख लोक, रस्त्यारस्त्यांतून हल्लीं आपल्याला भेटतातच ना ?—

असा विचार करतां करतां, एक मात्र मनाला पटतं, कीं, छत्र्यांच्या किंमतींत दोन रु. पासून अठरावीसपर्यंत–कितीहि चढउतार झाला, तरी

आपली स्वतःची एक छत्री असणं ही जीवनांतील महाआवश्यक बाब आहे!—

पण आपल्या मालकीची छत्री असणं एवढीच गोष्ट फक्त आपाल्याला भूषणास्पद नव्हे. ती आपली छत्री कशी असेल व कुठं असेल, यावरहि आपलं सामाजिक जीवन बरंच अवलंबून असत.

मोडकी किंवा उंदीर-मुंग्या-झुरळांच्या प्रतापानें 'चाळण' झालेली छत्री नीट करायला (नवीन घेण्याइतकाच) खर्च होतो; म्हणून, चालढकल होते. 'एक घरांत आहे, तेव्हां नवीन कशाला? आणि आहे ती टाकून दुसरी कशाला घ्या?' असा विचार आपल्या आर्य एकनिष्ठ मनांत येतो. पण आपली अनायसें गेली व दुसऱ्याची नवी विनायासें आपल्या पदरांत पडली, तर मात्र आपली हरकत नसल्यमुळें, ती बरोबर घेऊन आपलं फिरणं सुरूं होऊन, आपलं चारचौघांत जाणं-येणं-बोलणं-उठणं वाढतं!

'हाबिबुल्ला हेपतुल्ला' किंवा 'इब्राहीमभाई करीमभाई' यांनीं आपला धंदा वाढवण्यासाठीं, स्त्रियांच्या छत्र्यांचा सवता सुभा निर्माण केल्यामुळेंहि आपला हा गोंधळ होतो. आपल्या पत्नीच्या मालकीच्या चार छत्र्याहि घरांत असल्या, तरी एका पुरुषी छत्रीची तिला सर येत नाहीं व आपला पावसाळी पुरुषार्थ भागत नाहीं.

आपल्या मालकीची छत्री....'जरा घरापर्यंत' जाण्यासाठीं आपल्या फुकाल्या मित्रानें नेलेली असली, तरी देखील आपली पंचाईतच होते. ती मासानुमास परत येत नाहीं. पावसाळा संपल्यावर 'ती आतां परत आणण्यांत तरी काय अर्थ?' या तर्कशुद्ध तत्वज्ञानानुरूप आपण गाफील होतों व शेवटीं 'आपल्या मालकीची एक छत्री जगांत आहे!' या एकाच केवळ काल्पनिक समाधानावर चार पैसे बाळगून देखील लोकांच्या दृष्टीनें छत्र-विहीनपणें दारिद्र्यांत फिरण्याची आपल्यावर पाळी येते.

आणि अशा चमत्कारिक परिस्थितींचा आपल्या नैतिक मनोवृत्तीवरहि परिणाम होतो—

ट्राममध्यें बसल्याबसल्या, आपल्यासमोरच उतरून गेलेल्या आपल्या शेजाऱ्याची बेवारशी छत्री! गिरगांवपासून परळपर्यंत, ती तशीच, आपल्या



नकळतच, पडून राहिली! म्हणजे आपल्या जिवाची भयानक कालवाकालव होते. 'जगांतल्या एका छत्रीचे,...आपण बघतां बघतां कायम मालक होण्याचा हा अनायासें आलेला मोका आहे!' असं आपल्याला राहून राहून वाटतं.

शेवटीं, सर्व लोक उतरत उतरत, ट्राम जवळजवळ रिकामी होत गेली, म्हणजे तर ही रस्सीखेंच परमोच्च बिंदूला जाऊन भिडते.

तोंच मागल्या कुठल्या तरी बांकावर बसलेला पट्टीचा 'साव चोर' (आपल्या इतकीहि नजीकची त्या छत्रीची जानपछान नसतां) आपल्या देखतदेखत तिला एखाद्या दाट परिचिताप्रमाणें उचलून घेतो व उतरूनहि जातो!

'माझी आहे ती!' असा त्याच्याकडेहि पुकार करण्याची ताकद त्या क्षणीं आपल्या सभ्य मनांत नसते; आणि कंडक्टरकडे त्याबाबत तक्रार करण्यापेक्षां, 'आपल्याला जें साधलं नाहीं तें त्या धीट माणसानें केलं' याबद्दल त्याचं कौतुक करतच आंपण खालीं उतरतों.

आपल्या सर्वांगीण दुबळेपणाची त्यावेळीं आपल्याला तशी जास्तींत जास्त जाणीव होऊनहि आपण स्वतःचं खोटं समाधान करण्यासाठीं मात्र, स्वतःशीं मनांतल्या मनांत स्वतःचा आत्मगौरव करून घेतो—"छे!—त्यांतले नव्हतच मुळीं आपण! ती जातच निराळी! असो! चला—ज्याचं कर्म त्याच्याकडे!"

तेव्हां, छत्री ही चीज अशी आहे! ती माणसाच्या डोक्याचं संरक्षण करतेच; पण माणसाच्या मनाच्या बरंवाईटपणावरहि आपलं छत्र धरते!—म्हणजेच, त्याच्या डोक्यांतहि नैतिकतेचं छत्र करते!!—

पाऊस पडत असतां ग्यालरींतून खालीं रस्त्याकडे पूर्वी तुम्ही कधीं पाहिलं होतं कां?—

हाऽ एक भला मोठा छत्र्यांचा काळा समुद्र हेलावत पसरलेला तुम्हांला दिसला असता! वरखालीं होणाऱ्या लहान मोठ्या लाटाच जणूं, अशा त्या निरनिराळ्या आकारारूपांच्या छत्र्या! हो—त्यावरून पूर्वी एकदां आपल्याला

कांहीं कयासहि बांधतां येत असत—‘ हा म्हातारा ’ ‘ हा पोरगा ’ ‘ही प्रौढ बाई ’ ‘ ही फटाकडी ! ’

माणसांचं तसं ढोबळ कां होईना, आपल्याला वर्गीकरण तरी करतां येत असे.

त्यावेळची आपली दृष्टी ती असे. पण आज ? छे : !

आज रस्त्यांतल्या त्या ‘ काळ्या समुद्रा ’ कडे पहाण्याचा आपला दृष्टिकोनच आमूलाग्र बदलला आहे.

आजच्या महागाईच्या परिस्थितीनुरूप, तसं तिकडे पाहतां पाहतां, आपल्या डोक्यांत एकदम कल्पना येतात—“ ही दहा रुपयांची;...ती नाहीं तरी सोळा रुपयांची...” आणि ह्या सगळ्या सरसकट आठनऊ रुपयांनीं धरून हिशेब केला, तर...रस्त्यांतल्या त्या कळ्या खवळत्या समुद्राची लाखाची बाबच आपल्या मनाला झटकन् स्पर्शून जाते; पटकन् पटतें—

आणि छत्री खालच्या माणसांबद्दलचा आपला तो पूर्वीचा अनुभवी ठोकताळाहि साफ चुकत जाण्याचे हे बदललेले दिवस आहेत !—आजकाल, अगदीं पांढऱ्या कापडाच्या छत्रींत देखील, कदांचित् एखादी स्त्री सांपडेल !– बिनशेपटाच्या बुटक्या बायकी छत्रींत एखादा जख्खड म्हाताराहि असूं शकेल ! तर अठरा काड्यांच्या पांढऱ्या तंबूत पांच वर्षाचा पोरहि झांकलेला आढळेल !–

‘ बदलत्या काळाचा हा प्रताप ! ’ असं कोणी म्हणेल, तर म्हणो. मला स्वतःला तर त्यांत मानवी आयुष्याकडे पाहाण्याच्या मानवी मनाच्या बदलत्या दृष्टिकोनाचंच सुखस्वप्न दिसूं लागतं !—

आतां जाती–पोटजातींकडे दुर्लक्ष करून, ‘ छत्री म्हणजे छत्री ! ती कुठल्या जातीची हा महत्त्वाचा प्रश्न नव्हे ! ’ या नव्या दृष्टीनेंच, छत्री या चीजेकडे पाहण्याचं आपण हळूहळू शिकूं लागलों आहों !—

मग आतां असं सांगा—‘ माणूस म्हणजे माणूस ’ अशाप्रकारें माणसानें माणसाकडे पहावं, माणसाशीं वागावं, हेंच नव्हे का मनुष्य जातीचं अंतिम श्रेष्ठ ध्येय ?—तीच नव्हे का त्याची माणुसकी ? ?



तर मग, जातीजातीचा गलबला संपूर्ण विसरून—“ छत्री म्हणजे छत्र ! ’ या एकाच व्यापक भावनेनें कल्पनेनें, आपण आतां छत्रीकडे तरी पाहूं लागलों आहों ना ? मग ही आपली वायुवेगाची प्रगतिच नव्हे कां ?

हळूंहळूं त्यांच्याखालच्या माणसांकडेहि आपण त्याच व्यापक उदार मनोभूमिकेच्या दृष्टीनें खास पाहूं लागूं.

अशा या शिरीं पर्जन्यधारा ! मनीं ज्ञान–धारा !

•••

# २०० यार्डावर ?
# —कीं पावलापावलावर ? ?

ही माझी चांगली जागा मला कशी मिळाली म्हणतां ?
त्याचं असं झालं—मोठ्यांची लढाई झाली; म्हणूनच, मला पामराला जागा मिळाली.

‘ जपानी आले–’ ही किंकाळी त्यावेळीं आकाशांत अकस्मात् उसळली ! त्या कुप्रसिद्ध पळापळींतच, कोणा एका अति सावध अनोळखी प्राण्यानें– अगदीं नोटीशीचं रोख भाडं मालकाच्या अंगावर टाकलं नि आपली ही मुंबईंतली राहती जागा २४ तासांत खालीं केली. त्याच्या त्या प्रशस्त जागेंत मालकाच्या बिनशर्त संमतीनें प्रथम अगदीं ‘ बिनभाड्या ’नें नि थोड्या सवलतीनेंच–पटकन् मी प्रवेश करून घेतला तो असा कायमचा ! आतां या जन्मीं तरी मी ती बदलणं शक्य नाहीं; मला शक्य नाहीं.

‘ एका निमिषांत मुंबईचं स्मशान होणार ! ’ ही त्याची बिचाऱ्याची सरळ कल्पना !–पण उलट, आंत शिरतांना माझा तरी स्पष्ट विचार होता, तो असा–



...“ आपण ऐकतों त्याप्रमाणें ‘ ते ’ खरोखर आलेच, तर ? तर, जोपर्यंत, माझा नक्की पत्ता त्यांना माहीत असण्याइतका मीं प्रसिद्ध नाहीं, तोपर्यंत तरी, मुद्दाम माझ्यावर–निदान एकट्या माझ्यावरच—आपले महाग बॉम्ब टाकण्याइतकें ते मूर्ख नसतील ! आतां, जवळपास चौफेरच राख दिसली किंवा त्यांतच आपलीहि चिमूटभर जमा झाली, तर त्यावर मग, आपला तरी इलाज काय चालणार ? आपण जिवंत असेपर्यंत, अखेरच्या क्षणापर्यंत, आपली मूठभर हाडं टाकायला तर जागा हवी ? ”

पुढं झालं मात्र सारंच विपरीत ! जपान्यांचे बॉम्ब येण्यापूर्वींच, स्वतः त्यांना ‘ ॲटमबॉम्ब ’ व त्यापाठोपाठ पराभवहि मिळाला; उलट, मला मात्र, आजच्या धकधकींत ( तुम्हांलाहि कुतूहल वाटतंय् इतकी ) हवेशीर नि प्रशांत अशी ही जागा, या मुंबईंत, ( अगदीं छदाम पागडीशिवायहि ) कायमची मिळून गेली आहे !...

तेव्हां, योग्य वेळीं स्मशानवैराग्य टाळल्यामुळेंच सर्वांच्या आदरास, अभिनंदनास व एका चांगल्या जागेचा भाडेकरू ( म्हणजे आजच्या हिशेबीं पाहतां, मालकच ) होण्यास, आज मी असा पात्र ठरलों आहे !...

सगळ्यांनाच हें जमत नाहीं.

वर्षाभरानेंच, माझ्या एका निकट स्नेह्याचा अकल्पित नि तडकाफडकी अंत झाला. घरांतल्या त्या हाहाकारांत आणि त्यापाठोपाठच्या नैराश्यांधःकारांत, त्याच्या धाकट्या भावानें डोळे पुसले; जागेच्या किल्ल्या माझ्याहातीं दिल्या; नि त्या अपेशी स्थळाचा व आपला संबंध तात्काळ संपवला. सामानाची हालवाहालव व नवा भाडोत्री शोधण्याची कामगिरी, त्यानें माझ्याच गळ्यांत बांधली; तेव्हां, माझा गळा दाटून आला होता. पण आपला तो निश्चय तसाच ठाम ठेवून ( नोटिशीचं भाडंहि माझ्या हातीं देत ) तो म्हणाला होता, “ छेः...या भकास स्मशानांत, माझा एक क्षणदेखील जाणं यापुढं शक्य नाहीं !—”

अनिच्छेनें गळ्यांत पडलेलं तें ‘ मित्रकार्य ’ पार पाडण्यासाठीं, ‘ जागा हवी का ? ’ या पृच्छेसह, त्याच्या–माझ्या परिचयाच्या बहुतेकांना त्यावेळीं

मी भेटलों. पहिल्या महिन्याचं भाडं आगाऊ भरलेलं असल्याचं आमिष साऱ्यांना दाखवून पाहिलं. तरी देखील–या ना त्या सबबीवर, (अशुभ ठरलेल्या त्या जागीं) त्यांच्यापैकीं कोणीच रहायला पुढें येईना !

अर्थात्, जागा देणाऱ्या मुंबईतल्या देवदूताचा नवा किफायतशीर धंदा मला उघडायचा नव्हता—(इथे तुमच्यांतले कित्येक आतां हळहळणार—हें मी जाणतों;—पण माझा तरी नाइलाज होता.) अखेर–कसलीहि पागडी न घेतां, ती जागा, त्यावेळीं अखेर एका अगदीं तुमच्याइतक्याच मला अपरिचिताच्या पदरीं पाडून, मी कायमची पवित्र करून टाकली आहे. माझा तिच्याशीं आतां कांहींएक अर्थाअर्थी संबंध उरलेला नाहीं.

आश्चर्य मात्र असं, कीं, चार आठ महिन्यानंतरच—दुबळ्या भावना-प्रधानतेचा तो क्षणिक कैफ–तो झटका—उतरल्यावर, त्यांतल्याच कित्येकांनीं (त्यांत, किल्लया माझ्याहातीं देणारा तो माझ्या मृत मित्राचा भाऊहि होता !) 'जरूर तर हजारभर पागडीहि द्यायची तयारी' दाखवून, एखाद्या चांगल्या जागेसाठीं खटपट करायला मला अनेकवार विनंति केली.

हें सर्व ज्या ज्या वेळीं मला स्मरतं, त्या त्या वेळीं मला मानवी मनाच्या गुंतागुंतीची एक खिन्न गंमत वाटते नि त्या बरोबरच कडवट हसूंहि येतं !

इथं यावरूनच आणखी एक आठवतं आहे—

त्यानंतर, वर्षभरानंतरचीच गोष्ट. अत्यंत यशस्वी नि व्यवहारदक्ष अशा माझ्या एका दुसऱ्या मित्रानें (भावाभावांच्या भांडणांतून कर्जांत पडलेला) दादरचा समुद्राजवळचा एक बंगला कर्जांतून सोडवला व त्याचा साठे-करार केला.

एका शुभ प्रातःकाळीं, अगदीं खुषींत येऊन, ही खुषखबर त्यानें मुद्दाम येऊन मला सांगितली.

त्याच्या म्हणण्याचा सारांश, थोडक्यांत, एवढाच होता—

तिथं दहा ब्लॉक–भाडोत्री; दोन रिकामे मालकी ब्लॉक; भोवतीं ऐसपैस बाग; त्याभोंवतीं दगडी कायम कोट; चारी बाजूस चांगलीं दूर दूर अंतरावर घरं; माथ्यावर प्रशस्त आगाशी; आगाशींत सदैव भिरभिरणारा खारा वारा;



नि दूर दूर, सारखा सळसळणारा, आपल्या आकाशांतील बापाच्या अफाट अमर्याद नील समुद्राचा आरबी पसारा ! अगदीं गुदगुल्या होत असलेल्या आनंदी चेहऱ्यानें, त्यानें स्वतःच हें त्या जागेचं सारं वर्णन माझ्यापुढं केलं होतं.

बरं,...व्यावहारिक बाजूनेंहि त्यांत कुठं कांहीं उणं–लंगडं नव्हतं. कारण, अगदीं चाळीस सालींच बांधलेल्या त्या 'जुन्या' इमारतीच्या या नव्या मालकालाहि, म्युनिसिपालटी जाऊन, चांगलं साडेसात टक्के व्याज सुटणार होतं, गुंतणाऱ्या त्याच्या रकमेवर !

तेव्हां, मीहि 'तथाऽस्तु' स्वरांत त्याला आशीर्वाद दिला—"मग, आणखी हो दुसरं काय हवंय् आपल्याला ?"

नि त्यावर, तोहि खुषींत येऊन खुदखुदला होता, "पुढल्या पंधरवड्यांत वास्तुशांति करीन ! त्यावेळीं, मुद्दाम आठवण ठेवून,...यायचं बरं का, समारंभाला—"

पण, आठ दिवसांनीं, त्याचं आमंत्रण येण्याऐवजीं, तो स्वतःच पुन्हां माझ्याकडे आला—आणि त्यावेळचा त्याचा पडका चेहरा पाहून, भीतीनें आपणहून त्याला मी पुढलं कांहीं विचारलंच नाहीं.

शेवटीं, तोंडांतल्या तोंडांत शब्द घोळवीत, तोच मला हळूहळू म्हणाला, "परवां म्हणालों खरं, तुम्हाला: पण अखेर, सोडूनच दिला बरं तो व्यवहार ! दीड हजाराचा बयाणा भरला होता. तोहि हातोहात दवडला मी ! काय करणार, सांगा ?—आमच्या हिच्याच तें प्रथम लक्षांत आलं. नि तीच म्हणाली मला ! तें मलाहि मग पटलं, म्हणा !"

"अस्सं ? काय असं म्हणाल्या वैनी ?" साश्चर्य मी विचारलं.

"सगळं कांहीं ठीक होतं, बघा"—तक्रारी स्वरांत, पण तरी त्राग्यानेंच तो म्हणाला–"एकच चमत्कारिक गोष्ट ! पण मग,...भयंकरच !! म्हणजे असं,–अगदीं दोनशें यार्डावरच स्मशान होऽ ! आगाशींत वारा खात उभं राहिलं नि त्या नारळीच्या बागेंतून उजवीकडे दूर पाहूं लागलं नां,...कीं, रोज आपली एखादी भडकलेली चिता आपल्याला दिसायचीच ती पाळी !... आतां सांगा,–अशा स्थितींत करायचं कसं नि काय ?—आपलं हें असं मुलाबाळांचं भरलेलं घर ! तेव्हां म्हटलं..."

" हं...तेंऽहि खरंच—" एक सुस्कारा तेवढा सोडला मी !

त्याचं त्यांत तसं अगदींच कांहीं चुकलेलं नव्हतं. त्याच्या त्या अंतिम निर्णयाला, ती सबळ भावनात्मक खळबळ, खासच योग्य कारण होती...

—पण मग,–असल्या या न्याऱ्या प्रत्यक्ष अनुभवांबद्दल, आपलं मन जों जों अधिक सखोल विचार करूं लागतं, तों तों तों, आपलंच आपल्यालाच ( आणि तसल्या त्या दुसऱ्या प्राण्यांचंहि ) सारख हंसूं येतं. म्हणूनच तर, एखाद्या दरींतल्या प्रतिध्वनीप्रमाणें, माझ्या मित्राचे ते शब्द माझ्या मनांत अजून अनेकदां दुमदुमतात;...आणि मी, स्वतःशींच कित्येकदां पुटपुटतों— " दोनशें यार्डावर स्मशान ?...रोज एखादी भडकती चिता समोर ?... हं...आहे खरं ! !—"

कुठलंहि लहान-थोर मानवी घरकुल, म्हणजे जीवनाचा फुलबागच !... उलट, स्मशान म्हणजे साकात् मृत्यूचच साम्राज्य ! ! आणि त्याच दोहोंतलं अंतर असं फक्त दोनशें यार्डाइतकं जवळ आलेलं पाहून, माझ्या स्नेह्याच्या मनांत ती खळबळ उडाली; यांत आश्चर्यनें कसलं ?

धोरणी व्यवहाराच्या गडबडींत, आधीं त्याच्या हातून नकळत झालेली ती भावनात्मक घोडचूक !...ती सुधारण्यासाठीं, त्यानें लाग-लींच दीड हजारांचा भूर्दंडहि भरून टाकला. मनानें नि शरीरानें, जमली तेवढी अफाट खटपट लटपट करून, तो तिथून, त्या दोनशें यार्डावरील स्मशानापासून, शक्य तितक्या लौकर, शक्य तितक्या दूर दूर पळाला !...

आपल्या व आपल्या माणसांपासून स्मशान दूर ठेवण्याचा माणसाचा असला हा प्रयत्न ! कोण नाहीं तो करणार ?

पण जमतं कां तें त्याला ?...

आणि म्हणूनच, तसल्या गोंधळी कल्पनांचं नि हालचालींचं, मनांतल्या मनांत, विचारांतीं, अनेकदां संमिश्र हंसूंच येतं, आपल्याला.

कारण, दोनशें यार्डावरलं तें त्याला तसं वरवर तरी झटकन् टाळतां आलं; पण मग–क्षणोक्षणीं, पदोपदीं, रस्त्यांत, दारांत, घरांत, माणसाच्या अगदीं



प्रत्यक्ष शरीरांत नि मनांतच जे असतं, तें स्मशान त्याला कसं टाळतां येणार ? कसं दृष्टीआड करतां येणार ? ?...

' मरणाधीन ' अशी माणसाची व्याख्या ऐकल्या-वाचल्यापासूनच, मनुष्य-प्राण्याच्या मृत्यूची भयद कल्पना, आपण पूर्वीं एकदां निर्भयपणें पेललेली असते. म्हणूनच, दुसऱ्या अपरिचितांच्या मरणाची कल्पना—तसलं रस्त्यावर हरघडी दिसणारं प्रत्यक्ष दृश्य–आपल्याला बऱ्याच निर्विकारपणें सहज सह्य होऊं शकतं. किंबहुना, आपल्या परिवारांतील व्यक्तींचा प्रत्यक्ष ( वा काल्पनिक ) अंतहि, कमी अधिक दुःखासह, आपण गिळतो नि आपली पुढली वाटचाल करूं शकतों—

पण आपला मृत्यू ? ती नुसती कल्पनाहि करणं, आपल्याला भेसुर वाटतं; त्यावर विश्वास ठेवण्याची आपण टाळाटाळच करतों !

केवळ चुणुक म्हणून, शास्त्रीय आधारानें जरी कोणी आपणाला ज्ञानकण दिला—कीं, " अरेऽ दर सात वर्षांनीं तुझं सारं जुनं शरीर मरतं; मातींत मिसळतं; नि तिथं नवीन निर्माण होऊन, तेंच तुझ्या रूपानें उभं राहतं !— तुला हें ठाऊकसुद्धां नसतं !—थोडक्यांत, तुझ्या एकाच आयुष्यांत तूं शरीरानें अनेकदां मरतोस !—" तर ?—

तर, या नुसत्या विधानानें देखील, आपण एकदम बिचकूं–हदरूं !... कांहीं केल्या, तें शास्त्रीय तत्त्व मात्र आपल्या गळीं उतरणार नाहीं. तें आपल्याला पेलणार नाहीं; पचणार नाहीं !...

याला कारण एकच; त्यांत दडलेली आपल्या साक्षात् मृत्यूची कठोर कल्पना ! !—

हें झालं शरीराचं !...नि मनाचं मरण ?—तोहि एक न्याराच अनुभव !...

" भित्र्या मनाचीं माणसं, त्यांच्या मृत्यूपूर्वींच, हजारों मरणं मरतात !— मेल्यागतच जगांत जगतात ! !—" असं, एक जुनं सुभाषित आपल्याला हडसून-खडसून बजावतं. पण, मला तर वाटतं; अगदीं धीरावीरांचीहि तीच अवस्था असते !—तेहि एकाच जन्मांत हजार मरणं मरतात ! !

कारण असं, खऱ्या जिवंत माणसाच्या मनाचं मरण तर. प्रतिक्षण नि पंदोपदीं होत असणं, हेंच नैसर्गिक ! नव्हे का ? आणि वास्तविक, तसं होण्यांतच, त्याचा खरा विकास सामावलेला नसतो का ? आपल्याच लहानपणींच्या नि गतायुष्यांतल्या कांहीं प्रबळ कल्पना, उत्कट भावना, प्रमाथी महत्त्वाकांक्षा, नि बलशाली ध्येयाकांक्षा, आशा ! जसजसे आपण अधिक जगत जातों, तसतशा, त्या बाबी आपल्याला पोरकट वाटूं लागतात !

आहे ना अनुभव ?...

तरी पण, कालचीं ताजींतवानीं फुलं, हीं आजचीं निर्माल्यं ठरणं, ही तर जगाची सरसकट रीतच आहे !...तेव्हां, काल जें आपण प्रत्यक्ष जगत होतों, तें आजच्या मनःस्थितींत कायमचं मेललं असल्यामुळेंच, आपल्याला पोरकट वाटूं लागतं. किंबहुना, मला तरी वाटतं, मानवी मनाच्या खऱ्या आदर्श जिवंत जीवनांत, आपला आपल्या मृत्यूशींच जास्त जास्त संबंध येणं हें नैसर्गिक; नि तो तसा कळत-देखत सारखा येत राहण्यांतच, आपला खराखुरा जिवंतपणा सामावलेला असायचा ! !

पण, ही गोष्ट इतकी स्पष्ट असूनहि, आपल्या व आपल्यांच्या मृत्यूला आपला नेहमींच नाहक भयंकर घाबरतों. रात्रीच्या वेळीं सापाचं नांव घेतल्याबद्दल, लहानपणीं जसा मोठ्यांकडून आम्हां छोट्यांना दम मिळायचा, तसाच—आपल्या जीवनभर, आंपल्या जिवंतपणीं, आपल्या अगर आपल्या कोणाच्या ( किंबहुना, केवळ नुसत्या काल्पनिकच ) मृत्यूचं नांव घेण्याबद्दल देखील, कोणी ना कोणी, आपल्याला दम देतंच. पण मग, कोंबडं झांकलं म्हणून उजाडायचं थांबत नाहीं, हें साधं तत्त्व त्यांना कसं कळत नाहीं, हेंच मुळीं मला समजत नाहीं !...

हो ! या विशिष्ट दृष्टिकोनामुळेंच, मला तरी वाटतं नि पटतंहि, कीं—तसं दोनशें यार्डावरून, जीव मुठींत धरून जिवाच्या भीतीनें पळून जाण्याऐवजीं, पळून जाण्यापेक्षां, आपल्या पायाखालचं, देहांतलं, मनांतलं, तें निरंतरचं मरण—तें स्मशान, आपण बेडरपणें नि रोजच्या रोज पहावयाला शिकलं पाहिजे ! एवढंच नव्हे, तर तें जाणून घेऊनहि, पुन्हां त्यापुढली आपली



प्रत्येक हालचाल, तितक्याच संथ विचारीपणें, रसरशित जिवंतपणाची केली पाहिजे. यांतच, आपलं खरं श्रेष्ठ जीवन सामावलेलं असतं !

आणि असली भूमिका एकदां आपल्या मनांत स्थिरावली, कीं, आपलं आपल्यालाच, अनेक प्रसंगीं, अनपेक्षितपणें विराट विश्वदर्शन होईल ! मगच, आपला प्रत्येक क्षण, खऱ्याखुऱ्या जिवंतपणें आपल्या हातून जगला जाईल. त्या त्या क्षणाच्या आपल्या जिवंतपणाचा खरा उपयोग, आपल्याला व पर्यायानें समाजाला, तरच अधिकाधिक होत जाईल.

आजची यःकश्चित् मूठभर माती—ते रजःकण...एके काळची रसरशित जिवंत कुडी होती; आजचं भकास स्मशान, एकेकाळचं एखादं गजबजलेलं घर होतं; आजचं हमरस्त्यावरचं सदन, हें एकदां कानन, किंबहुना,...कोणी सांगावं, कोणातरी जिवंत जिवाची चिताराख मिरवणारं स्मशान होतं; तर, आजचं निर्जन अरण्य, मदोन्मत्त राजाच्या सुखासीन राजवाड्यानें व्यापलेली राजधानी होती !

या अगदीं अशक्यप्राय वाटणाऱ्या इतिहासाची, आपल्याला एकदां अशी खरीखुरी—कठोर पण यथार्थ—जाणीव झाली, कीं...जीवनाचं कोडं अधिक सुलभ नि सोपं होतं ! त्यामुळेंच, आपल्या जिवंतपणीं, आपल्या जिवंतपणाचं अधिकाधिक नवजीवन आपल्या जीवनांत भरतं !—

मला तर असं वाटतं, शंकर नेहमीं स्मशानांत भिरभिरायचा, तो याच जीवनाच्या खऱ्या जाणिवेनं ! त्या भ्रमणामुळेंच, 'मृत्यु हाच जीवनाचा खरा आधार ! खऱ्या जीवनाचं तेंच एकमेव स्फूर्तिस्थान !'...याचा उमज त्याला पडला होता. मृत्यूमुळेंच मानवी जीवनाला इतकं मोठं महत्व आलं आहे, याची खरी प्रतीति त्यांतूनच त्याला झाली होती. त्या व्यापक समजुतदार बेडरपणामुळेंच, त्या भोलानाथाला, साक्षात् मृत्यूला असामान्य आव्हान देणं, ही एक अगदीं क्षुद्र गोष्ट वाटली !

ज्यावेळीं, इतर सुखासीन नेभळट देव, नानाविध रत्नांमागें लागले होते, त्यावेळीं, अकल्पितपणें, हलाहलाच्या रूपानें भयंकर संकट ओढवलेलं समोर दिसतांच, ( कोणी तयार नाहीं तर ) हा आपला स्वतःच बेडरपणें पुढें झाला;

नि तें भेसुर रसायन, अगदीं हंसत हंसत, पिऊन तो मोकळा झाला. तें साक्षात् मृत्यू–प्राशनच होतं ! पण, त्या एका क्षणींच, तो खरंखुरं जीवन जगला ! आणि म्हणूनच, त्या हलाहलाचं, त्या मूर्तिमंत मृत्यूचं, त्याच्या कंठीं तत्काळ निर्मळ जीवन झालं ! त्यानें तो नीलकंठ झाला; तरी त्यानंतर अमर होऊनच मागें उरला ! !—

स्मशानामुळेंच मानवी घराला—मृत्यूमुळंच मानवी जीवनाला, खरीखुरी माधुरी, खरंखुरं महत्त्व येतं–तें हें असं !–' मरणांत खरोखर जग जगतें ! '

विचारांतीं पटलं, अनुभवांतीं थोडंथोडं खरं वाटलं, तरी प्रत्यक्ष वागतांना, मानवी मन दुबळं होतं. आणि म्हणूनच,–त्या माझ्या मित्राप्रमाणें, त्या दोनशें यार्डांवरील स्मशानाला नि कोणत्या तरी—कोणाच्या तरी–धडकलेल्या चितेला, आपण नाहकच घाबरतों — खऱ्याखुऱ्या जीवनापासून दूर दूर पळून जातों !–आपणच आपला असा पराजय करतों !

—होय !–मानवी जीवनाच्या मंदिराच्या पायऱ्या स्मशानापासून सुरू होतात; नि त्याचा सुवर्णकळस त्या स्मशानापलीकडच्या बाजूलाच असतो !

एवढ्याचसाठीं, त्या शिखरापर्यंत पोंचण्याचा मार्ग जाणून घेऊन, आपलं प्रत्येक पाऊल,...निर्भयपणें, जाणतेपणीं नि जाणूनबुजून टाकतच, आपण वाटचाल केली पाहिजे !

• • •

# ' नॉट् पेड् ! '

" आमच्या चार पैशांवर आलेली आपली ' संक्रान्त ' पोंचली बरं ! फार आभार ! तुमचं विस्मरण जन्मभर नाहीं होणार ! रंगीबेरंगी प्रेमाची ती पांखर !...आणखी किती जणांवर केली आहांत ?... फार उपकार !...शुक्रिआऽ; लई गोड संक्रान्त..."

औषध–खरेदीसाठीं मी दुकानांत शिरलों मात्र; आमच्या केमिस्ट गणपतीनें माझ्यावर तो अकस्मात् भडिमार केला !

' हें सारं कशाबद्दल ? ' माझ्या ध्यानींच येईना, प्रथम.

तसा आमच्या मित्रपरिवारांतच तो प्राणी जमा होतो; नि वरवरच्या अनुभवानें, आमच्या घरांतल्या पोरांनाहि आतां तें ठाऊक झालंय्. आतांपर्यंत मला अज्ञात असलेलं आजचं हें प्रकरण, माझ्यासमोर दत्त म्हणून तसं एकदम उभं राहिलं होतं, तेंहि आमच्या मोठ्या चिरंजीवांच्या तसल्याच ज्ञानांतून ! ( म्हणजे, माझ्यामतें, अज्ञानांतूनच ! )

चालू-मा–बाप–कॅांग्रेस–सरकारचीं नव्या पैशांबद्दलचीं नि टपाल–तिकीटां-बाबतचीं कोष्टकं अहोरात्र पालटतात, हें महशूर आहे; त्याबाबतच्याच आमच्या चिरंजीवांच्या ( नि त्यांच्या ' सर्वज्ञ ' मातोश्रींच्याहि ) अज्ञानाची, या गोंधळांत नकळत भर पडली होती. अर्थात्, ड्रॅाइंग पेपर; नवी जपानी रंगट्यूबांची पेटी; निरनिराळ्या नंबरांचे अर्धा डझन ब्रश; जवळ जवळ येत असलेल्या वार्षिक परीक्षेच्या अभ्यासाला उपयोगी पडतील, असल्या किमान दोनतीन तासांची प्रत्येक बैठकींतील उधळपट्टी; इ. इ. विविध

बाबींचा नि दृष्टींचा विचार करून पाहिलं, तर आमच्या गणपतीनें केलेलं तें आजचं, माझं ( संक्रांतीबाबतचं कडवट ) स्वागत, म्हणजे—सारीच एकूण, एकमेव माझ्याच खर्चानें अवतीर्ण झालेली एक बाब होती !

—म्हणूनच, त्या क्षणीं, मला सगळ्यांत आधीं एकदम भास झाला, तो कोणी तरी माझा खिसाच कापल्याचा.

त्या पुढल्याच क्षणीं, माझ्यासमोर खवळलेला विस्तीर्ण समुद्र पसरला होता; फडफडणाऱ्या शिडांत भरलेल्या वाऱ्यावर चालणारं एक जहाज, त्यावर दिसूं लागलं होतं; त्याच्याशींच आकाशांतून भरारण्याची स्पर्धा करणाऱ्या दोन पक्ष्यांचे—मराठी ४४ सारखे दिसणारे–ते पांढरे लपेट–फटकारे !..मागील मंद निळसर पार्श्वभूमीवर तर ते कसे अगदीं उडूनच दिसत होते.

...तें सारं दृश्यच, माझ्या डोळ्यांत भरूं लागलं होतं; नि त्याबरोबरच, ( त्या चार नव्या पैशांच्या नव्या आठवणीनें ) डोळेहि भरून येत होते !

इतरांसमोरच, माझ्याहातीं गणपतीनें जाहीरपणें कोंबलेल्या त्या ' टपाल भानगडी 'चं आंतलं पानहि, त्यापाठोपाठच, तोंपर्यंत, मी उलटून–उघडून पाहिलं होतं...

त्या जागीं तर, आमच्या चिरंजीवांनीं कमाल केली होती. आपल्या पोपटपंचीची नि ' अज्ञानी ज्ञाना 'ची आणखीच उधळपट्टी, अमाप खैरात केली होती. तिथं, कोरीव लपेटींतलीं हिरवीं अक्षरं, पानाच्या मधोमध, हवेंतच आडवींतिडवीं उडवलीं होतीं—

' माणुसकी !...प्रेम !.. प्रगति !...शांति...'

प्रत्येक शब्दाखालीं, एकेक गुलाबाचं फुललेलं फूल होतं; त्या पानाच्या शिरोभागीं, एका तबकडींत, कांटेरी हलव्याचे पांढरे दाणे होते; ( त्यांतला तो एकुलता एक केशरी दाणा तर अगदीं डोळ्यांतच भरत होता. )

खालीं आपली सही करतांना मात्र,—आपल्या बापाला अवास्तव आदर देण्यासाठीं कीं काय, कोण जाणे—आपल्या नांवा–उपनांवाच्या अक्षरांपेक्षां, माझ्याच नांवाचा उद्धार त्यानें अधिक जोरकस केला होता !—



गणपतीची संक्रांतीबाबतची तसली हकनाक तोहमत...ती नवी संक्रांत ! माझ्याकडे आज ती वळली होती, ती नेमकी यामुळेंच !—भेटकार्डावरील त्यां साऱ्या दृश्य–तपशीलाकडे ( वर वर नि उतावळ्या अनवधानानें ) त्यानें पाहिलं होतं, म्हणूनच !...त्या साऱ्या कलेचा योजक—जनक–कलावंत, व्यक्तिशः मलाच धरून, तो मोकळा झाला होता.

अशा परिस्थितींत, त्याचीं इतर गिऱ्हाइकं उतरून जाईपर्यंत, मी आपला समयज्ञपणें मुग्धच राहिलों; त्यानें माझ्या हातीं टाकलेल्या, माझ्या चिरंजीवांच्या त्या कलेचं नि अकलेचं आमूलाग्र अवलोकन करण्यांतच, मी माझं नाइलाजानें मन गुंगवलं ! खरं म्हणजे, त्या ' नॉट पेड् ' चार नव्या पैशाबाबतची आजची ती गणपतीची बोलकी संक्रांत, माझ्या तरी जिव्हारींच जाऊन भिडली होती.

कारण,...ओळखींतून निर्माण झालेल्या एका विश्वस्त श्रद्धेच्या आधारावर आमच्या गणपतिमहाशयांनीं,...चारच काय, चाळीस नवे पैसेहि, माझ्या नावें आपल्या लठ्ठ वहींत नोंदून, आजवरं हिशेबी टिपणं ठेवलीं होतीं. तरी पण, त्याबद्दल कधींच, नि किंचित्हि, कसला वाद मी घातला नव्हता; जुन्या आणे–पै–पर्यंत देखील, त्याचा हिशेब प्रत्येक वेळीं मी पुरा चुकता केला होता ! इतकं असूनहि, माझ्या अव्यवहारी मुलाच्या प्रेमभेटीनें, गणपतीच्या केवळ चार पैशांवर ती ' संक्रांत ' आज अकस्मात् येतांच, त्याचा जीव तसा चुटपुटला होता ! त्यामुळेंच, आतां माझाहि जीव अकारण चुटपुटूं लागला होता.

अपमानाचा असला अदृश्य वणवा माझ्या मनाला लागला होता; तेवढ्यांत, किंचित् मिस्कील हंसत, माझ्या हातून तें बुक-पोस्ट गणपति हळूच काढून घेऊं लागला.

तेव्हां मात्र, भानावर येऊन मी तें पटकन् मागं ओढलं नि उलट, खिशांतून पांच नव्या पैशाचं नाणं काढून, तें त्याच्यापुढें करीत म्हणालों, " हं ऽ...घ्या ! मुलाच्या चुकीबद्दल बापाला शिक्षा ही व्हायलाच हवी ! "

पण, ते पैसे न घेतां, उलट मोठेपणाच्या अभिनिवेशांत तो म्हणाला, "चला ऽ! वेड् बीड् लागलंय् कीं काय तुम्हांला? ठेवा ते ऽ..."

"अस्सं ऽ? बरं तर!...दोन्ही ठेवतों..." पैसे नि तें कार्ड...दोन्ही एकदमच खिशांत कोंबून, मी त्याला पुढें म्हणालों—"जशी तुमची मर्जी! या झाल्या-गेल्याची भरपाई व्हायला, आतां आपल्या औषधी राज्यांत, तोडगा सांपडायला तसा वेळ लागणार आहे थोडाच?"

व्यवहारी गणपतीवर मी भिरकावलेल्या त्या टोमण्याचा खरा रोख त्याच्या ध्यानीं आला कीं नाहीं, कोण जाणे! पण, जसं कांहींच झालं नाहीं, अशा स्वरांत तो मला म्हणाला, "तें असो; आज हवं काय होतं?"

"हवं होतं ऽ एक टॉनिक्..." कडवट स्मित करीत मी म्हणालों, "पण, आजच्या दिवसापुरतं तरी नुकतंच मिळालंय् मला तें! थँक्स हं!"

किंचित् चपापलेल्या त्याच्या चेहऱ्याकडे अधिक लक्ष न देतां, तसंच खालीं उतरून, मी फुटपाथला लागलों खरा; पण आमच्या चिरंजीवांचा त्या 'नॉट् पेड्' संक्रान्तीचं तें एकूण प्रकरण, माझ्या मनाला अधिक अधिकच ग्रासूं लागलं. माझ्या मनाचीं पावलंहि, त्याच विचारांच्या काळोखांतील प्रकाश चांचपडत, पडूं लागलीं होतीं.

वास्तविक, मी जात्या तसा मख्ख आहे. संक्रान्तच काय, नाताळ, नववर्ष नि 'सोनें'-दिवाळी भेटी इ. इ. सुद्धां—त्यापैकीं कांहीं एक-माझ्याकडून कधीं नीट पाळलं जात नाहीं. 'अहेर चुकवण्याच्या हेतूनें' असंच वाटावं, इतक्या सातत्यानें, लग्नसमारंभादि कार्यांत देखील, माझी हमखास अनुपस्थिति असते. संमेलनांचं आकर्षणच नसल्यामुळें, त्यांतहि मी कधींच सामील होत नाहीं...

ह्या सर्वांच्या मुळाशीं, तसा कोणाचा वा कशाचा, जाणता-नेणता अनादर नसतो; साधारणतः, अशा स्थळीं व वेळीं, नेहमीं आढळते त्या औपचारिकतेची अभावित नावड नि त्यांतूनच निर्माण होऊन स्थिर झालेली माझी वैयक्तिक संकोची वृत्ति, हेंच याचं दुहेरी मुख्य कारण असतं—



तसंच, दुसरं एक! पत्ररूपानें भेटून, कोणाचं झटपट अभिनंदन किंवा सांत्वन करणं! तेंदेखील माझ्या हातून नीट घडत नाहीं; तेंहि या असल्याच कारणांमुळें. अशा वेळीं मला वाटतं, कीं—'अमक्या अमक्याचं, हें अमुक अमुक असं चांगलं झालं, हें ठीक!...पण मग, चार औपचारिक शब्दांत, त्यालाच पुन्हां तें आपण लेखी कळवल्यानें अधिक काय होणार?'

किंवा एकेकदां उलट वाटतं,..."आपल्या साचेबंद सांत्वन-शब्दांनीं कोणाचं दारुण दुःख शतांश तरी कमी होईल का? दुःखावरचा एकमेव खरा नि सर्वोत्कृष्ट दुहेरी तोडगा, म्हणजे एकच—'काळ आणि विचार!' या मार्गानेंच तें कमी होणार; हळू हळू साफ विरूनहि जाणार! आपला तरी हा अनुभव आहेच ना? तेव्हां, जीवन जगतां जगतांच, त्यालाहि तो येत जाणारच. तर मग, तोच ज्ञानाचा जुनाट गड्डा, ठरीव औपचारिक शब्दांत, त्याला अगदीं आपण घरपोंच करण्यांत, स्वारस्य तें काय? असे आपण तरी कोण मोठे टिकोजीराव लागून राहिलोंय्? तो अधिकारच मुळीं काय आपल्याला?"

माझी ही प्रामाणिक विचारप्रणालि! त्याबरहुकूमच माझ्या आचाराला नेहमीं कांहींसा तुटकपणा येतो; नि त्यांतूनच, कोणाकोणाला (माझ्यामध्यें नसलेल्या औद्धत्य, बेफिकिरी, शिष्टपणा, अरसिकता, भावशून्यता इ.) अनेक गोष्टींचा अकारणच वास येतो; त्यामुळें कित्येकांचे माझ्याबद्दल गैरसमजहि माजतात;...अर्थात् माझ्या तरी मतें, ते तात्पुरतेच असतात; म्हणूनच, मला तर आतां कसली भीतीच वाटेनाशी झाली आहे!—कारण, व्यक्तीव्यक्तींच्या परस्पर प्रत्यक्ष संबंधांवर, केवळ योगायोगाच्या अनौपचारिक भाव-जीवनावर, नि नैसर्गिकपणें जुळून येणाऱ्या स्नेह—प्रेम-रज्जूंवर, माझा तरी फार बळकट विश्वास आहे.

मला मनापासून वाटतं,—'माणसाचं खरं मन, शब्दांत कधींच उतरूं शकत नाहीं; मनांत मात्र, खरे शब्द नक्कीच विरतात; नेहमीं,...ते तिथें घरहि करतात!'...

माझं हें मत कांहींहि असो; माझी ती आवड कसलीहि असो; पण पाश्चात्यांच्या चालीरीतींचे, आवडीनिवडींचे, अनेक कायम परिणाम मात्र,

नकळतच, आपल्यावर होत आहेत; ते कायम होत आले आहेत; हें तरी निश्चित ! त्यांतील सापेक्ष यांत्रिकता व औपचारिकता तर, आतां चांगलीच मूळ धरूं लागली आहे.

‘ छापील स्नेह-प्रेम-भाव ’ आतां टपालानेंहि घरपोंच जाऊं शकतो. अर्थात्‌च, त्या स्नेह-प्रम-व्यवहार–व्यापाचाहि एक मोठा व्यापार होऊन, त्यांतून एक नवा धंदा वाढीस लागला आहे. दिवसेंदिवस ‘ पडूं लागलेल्या ’ पुस्तकधंद्याला नि त्याच्या विक्रेत्यांना, ऋतुपरत्वें,—किंबहुना, बारमहा तेरा काळ–चार पैसे रोजच्या रोज दिसायला ( नि प्रत्यक्ष हातींहि असायला ) तो एक चांगलाच नवा पूरक उद्योग झाला आहे. राष्ट्रीय सरकारच्या पोष्ट खात्याची तर ती एक उत्पन्नाची मोठीच नवी बाब झाली आहे. चित्रकार नि छापखानदार यांनाहि त्यांतून चार पैसे अव्याहत भेटूं लागले आहेत.

—वाईटांतूनहि चांगलं निघतं, म्हणतात ना ? मग हें तर मुळच्या कांहींशा चांगल्या भावनेंतूनच बरंचसं चांगलंच निर्माण झालेलं !

एवढ्याचसाठीं याबाबतचं माझं मत नि माझ्या भावना कांहींहि असल्या, तरी, हें लोकशाहीचं राज्य आहे, हें जाणूनच मी वागतों नि माझ्या टेबला-वर चुकूनमाकून येऊन पडणाऱ्या, असल्या टपाली प्रेम–भेटींना अत्या-दरानेंच उचलून हातीं घेतों; त्यांची, शक्यतोंवर, काळजीपूर्वक जपणूकच करतों. एवढी तरी रसिकता, एवढी सहिष्णुता, दुसऱ्यांचा दृष्टिकोन जाणून घेण्याची नि त्यांत स्वतःला नीट सामावून घेण्याची, एवढी तरी किमान कुवत, आपल्यामधें नक्की असायलाच हवी, असंच मला मनापासून वाटत आलेलं आहे.

अगदीं घडीच्या संसाराच्या आजच्या या काळांत, तसं सर्वच बाबतींत पाहा ! आपल्या कुवतीप्रमाणें पैसे टाकून, आपल्याला हवी ती वस्तू, हव्या तशा मोठ्या-छोट्या पॅकबंद पाकिटांत मिळूं शकते. या मागणी–पुरवठ्याच्या धंद्यांच्या कक्षा तर आतां सर्वच क्षेत्रांत पसरत गेल्या आहेत; त्यांची गणतीहि गणितिं–श्रेढीनें अफाट वाढली आहे ! पण इतकं असूनहि, अजूनहि घरच्या पिठलं–भातांकडे, घरगुती पापड–लोणच्याकडे, बायकोनें स्वतः विणलेल्या स्वेटरकडे नि असल्याच इतर अनेक गोष्टीकडे आपलं लक्ष जातं. सापेक्षतः,



अधिक सुखकर नि अधिक ऊबदार, अशा दृष्टीनें नि भावनेनेंच त्यांच्याकडे आपण आकर्षित होतों ! नाहीं ?—निदान माझं तरी बुवा तसं नेहमींच होतं !

तेव्हां, असल्या नैसर्गिक ऊबदार भावनांमधून, मघां यांत्रिक म्हटलेल्या प्रेमभेटींनाहि, आतां हळू हळू घरगुती वळण लागूं लागलेलं आहे. त्यांत एका गोष्टीनें तर अधिकच भर पडूं लागली आहे.—ती म्हणजे ‘ नव–कला ’ !

नव–कलेचा जमाना आल्यापासून, आतां तर कोणीहि क्षणार्धांत चित्रकार होऊं शकतो. आडव्या उभ्या ब्रशानें काढलेल्या रंगाच्या बेछूट पट्ट्यांतून, वास्तविक, एखादी नव्या बाळाची गोधडी व्हायची; पण त्याऐवजीं, आतां पाहणाऱ्याला एकदम जरीकाठी कलाकुसरीचा तलम शालू दिसतो; झगमगत्या पैठणीचाच, बघबघतां, त्याला एकदम भास होऊं लागतो. उघडच आहे हें ! नव–काव्यकथादि शब्दरूप लिखित–कलेंत, जशी रचनेची–कल्पकतेची एखादी दडलेली ‘आकृति’ कोणी कोणी असामान्य रसिकतेनें उलगडून दाखवूं शकतात, तसंत हेंहि ! लहान मोठ्या त्रिकोन–चौकोन–षट्कोनाच्या जाळ्यांत नि रंगांच्या आडव्यातिडव्या फरकाट्यांमध्यें देखील, ( सहस्र शब्दांत सुद्धां मावणार नाहीं, इतकं ) भावना–कल्पना—रचना–योजना—कलाकौशल्य, सहेतुकच दडलेलं आहे, असं दाखवून देणं त्यांना अशक्य कां बरं व्हावं ?

एक मात्र !...अशा वेळीं, समोरील शब्दरूप कलेकडे पाहतांना, प्रगूढ ‘ आकृत्या ’ बघण्याची नि अद्‌भुत ‘ प्रतिमा ’ जाणण्याची, एक असामान्य व अभिजात अक्कल आपल्याला जमेस धरावयास हवी असते; उलट, रंगा-कृतींच्या गौडबंगाली जाळ्यांमधें दडलेल्या नवकलेच्या साम्राज्यांत आपण मनानें शिरतांना व तिच्याकडे पाहतांना, सहस्र शब्दांचा कोशच आपल्याला मुखोद्गत असायला हवा; त्यांतील विविध मालमसाल्याची अजब नि अभूतपूर्व गल्लत करण्याची, ती बेडरपणें बोलून दाखवण्याच्या व ऐकून घेण्याच्या सहिष्णुतेची नि बेछूटपणाची, एक नैसर्गिक कुवत व किमयाहि आपल्या रोमरोमांत भिनलेली असावी लागते !

मग मात्र, हां हां म्हणतां, आपल्याला एखादा ईश–प्रेषित नव–कलावंत, —किमानपक्षीं नवकलारसग्राही रसिक मधुप तरी—खासच होतां येतं !...

आणि उलट, तसं तें नसेल, तर ? तर काय ? भरलीच आपली कंबक्ति ! आपल्याकडे आधीं जें थोडं फार असेल, तेंहि उलट आपण पार गमावून बसतों; नि मग, आपल्या तोंडावर एखादं पोरहि आपल्याला पटकन् म्हणतं–
" अरसिकेषु कवित्व..."

असला आहे हा आजचा जमाना; असल्याच त्यांतल्या एकूण अनेकविध खटाटोप–उद्योगांची ती रस्सीखेंच !

तिच्यांतूनच, आमच्या भाबड्या चिरंजीवांच्या त्रिविध उत्साहाची ती संक्रांत, पंचांगी संक्रान्त–सणाकडे वळली होती !–भावनांची भरीव अभिव्यक्ति, नवकलेचा सराईत सराव, नि सहजसुलभ समारंभप्रियतेच्या अथांग अविष्काराचा चालून आलेला मोका ! अशी अगदीं एकाच दगडानें तीन पक्षी मारणारी मोठी शिकार, त्या मुहुर्तावर त्यानें गुपचुप साधली होती !

आपल्या नववींतल्या कुलदीपकाला नि त्याच्या अंगच्या नैसर्गिक कलांना ( नव्या मानसशास्त्रीय पद्धतीनें कलाटणी देऊन ) अद्ययावत् वळण लावण्याची महत्त्वाकांक्षा मनांत बाळगणाऱ्या आमच्या सुशिक्षित सौभाग्यवतीनें–आपल्या पदवीप्राप्त अनुभवाच्या केवळ एका पायावरच उभं राहून–त्याच्या त्या साऱ्या बेतांना गुपचूप पाठिंबाहि दिला होता; त्यामुळेंच तर, तें सारं ( माझ्याच खर्चानें, पण माझ्या नकळतच ) तसं तडीस जाऊं शकलं होतं !

आणि जर पोस्ट खात्याचे काटेकोर आंधळे नियम अस्तित्वांत नसते; स्वयंनिष्ठ व्यवहाराचा ( केवळ फुंकरीनेंहि ) प्रचंड डळमळणारा शीघ्रन्यायी तराजू नसता; नि त्या बाळाच्या 'पोस्टल प्रेमा' ला पहिला बळी पडलेला आमचा तो 'औषधी गद्य गणपति', पुराणांतील गणपतीप्रमाणेंच, अबोल, विघ्नहर्ता असता; तर ? तर आज हें सारं माझ्याहि कानीं आलं नसतं; हें सारं असं लिहिण्याचंहि माझ्या हातून कधींच घडलं नसतं ! तें सारं तसंच वातावरणांत विरूनहि गेलं असतं ! तुम्हांला तरी वाचावं लागलं नसतं !

गणपतीच्या हातून घेऊन, मघां मी खिशांत दडपलेली–माझ्या मुलाच्या कलेनं अलंकृत झालेली–ती 'संक्रांत भेट' ! तिच्यासह मंद पावलं टाकीत घराकडल्या वाटेनं चालतां चालतां, माझ्या मनांत, अर्थांत्च, असलेच स्वैर



विचार डोकावले होते. घरीं आल्यावर, ते तसेच मनांतल्या मनांत दडपून मी जेवलों होतों नि मग अबोलपणें असंच लिहीत बसलों होतों.

आंतल्या आंत माझ्या मनाचा खूपच कोंडमारा झाला होता. कारण, माझ्या घरच्या त्या कलावंताच्याच देखत, त्याच्या त्या कलेच्या झालेल्या तसल्या न्याऱ्या शोभेबद्दल, कोणाकडे कांहीं बोलण्याची सोयच नव्हती; त्यालाच त्यांतलं कांहीं अधिकोत्तर विचारण्याचीहि मला छाती होत नव्हती. किंबहुना, त्याच्या आईला तें सांगून–विचारून पाहण्याची नि तिच्या भावना अकारण दुखवण्याचीदेखील माझी तयारी नव्हती !—

तिचाहि स्वर्ग मला जपायचा होता !

तेव्हां, मी आपला स्वसमाधानासाठीं पिसाटासारखा भरभर लिहीत होतों...

बरीच रात्र होऊनहि माझा दिवा जळत असलेला पाहून, या कुशीवरून त्या कुशीवर होत, सौ. नेंच मला अखेर विचारलं, " काय हो चाललंय् इतका वेळ, टेबलापाशीं ? आज आलीय् वाटतं ?"

मी आपल्याच नादांत आहेसं पाहून, तिनें पुन्हां एकदां विचारलं, " काय हो लिहितांय् ? अं ऽ ? नांव तरी काय ?"

अखेर, मागें पाहात मी तिला म्हणालों, " अग आलं एक मनांत;... लिहितोंय् आपलं ! नांव नाहीं दिलंय्, अजून..."

ती पाणी प्यायला उठली; तरी तिच्या त्या सहजगत्या कुतूहलाची चिकाटी अजून कायमच होती..." कशाबद्दल ? अं ? नुसतं नांव तर सांगाल ? सांगा ना पण......"

मग मात्र, मला एकदम हंसूं आलं. क्षणभर किंचित् घुटमळून, मी म्हणालों, " अजून नांवाचा पत्ताच नाहीं !...तरी सांगूं ?–बरं...तर, अंऽहंऽ ! 'नॉट् पेड् !' "

" काय ?" एकदम चमकल्यामुळें तिच्या हातचा प्याला कणकन् तांब्यावर आपटला; पुन्हां जाऊन आपल्या पांघरुणांत गुरफटत, ती मला साश्चर्य म्हणाली, " म्हणजे ?...हें कसलं नांव, बाई ? कशाचं ?...एखाद्या पोस्टमनसारखं काय बोलतांय् ?"

"असूं देत !...समजेल तुला आपोआप...पुढल्या दोन दिवसांत..." हातांतलं पेन बंद करीत मीहि हंसून म्हणालों..."सारं पुरं व्हायचंय् "

त्यापुढला योगायोग मात्र खूपच गमतीचा ! पुढल्या दोन दिवसांतच, आम्हां दोघांनाहि नकळत, आमचे दोघांचेहि ते शब्द खरोखरच खरे ठरले होते !... कारण, त्या दोन दिवसांतच, तिला आपोआप त्यांतलं सारं समजलं होतं; नि एका पोस्टमनसारखंच आपण बोललों होतों, असाच मलाहि अखेर आत्मप्रत्यय आला होता.

संक्रांतीच्या निमित्तानें साऱ्यांना भेट देऊं इच्छिणारा नि आपल्या सर्व संबंधियांवर प्रेम करूं पाहणारा आमचा बच्चा ! एकूण, तो जरा जादा सच्चाच ! थोडक्यांत पुष्कळ करून दाखवण्याइतका तो महत्त्वाकांक्षीहि होता. बापाच्या केवळ साठ–सत्तर नव्या पैशांच्या भांडवलावरच, एक अफाट व्यापार करावा, साऱ्या जगाला आपल्या मुठींत मावून घ्यावं, असलं एक महान् संक्रमण त्याला करायचं होतं. रशियाप्रमाणें 'स्पुटनिकां'चं एक जाळंच्या जाळं आपल्या भोंवतालच्या अंतराळांत नि भोंवतालच्यांच्या अंतरंगांतहि फेंकून, त्याला एक अगदीं नवं अभूतपूर्व जग निर्माण करायचं होतं !

'माणुसकी...प्रेम...प्रगति...शांति' हीच–(तसं पाहतां, जाणत्यांकडूनच, त्यानं नकळतच, जणुं 'भाड्यानं घेतलेली'...) त्याची ती अद्भुत उड्डाण-भूमि होती. 'सद्भाव...सौजन्य...सहिष्णुता...सहकार' अशी (एकावर एक अवलंबून असलेली व एकाच्या पोटांत एक बसणारी) एक प्रभावी रॉकेट–मालिकाहि त्यानें त्यासाठीं हस्तगत केली होती. अखिल जगाभोंवतीं गरगरत ठेवायचा त्याचा तो महान् संदेश ! याच यंत्रणेंत त्यानें तो अलगद बसवण्याचा प्रयत्न केला होता. तसल्याच प्रकारच्या आणखी चार-दोन हमखास, वैचारिक, महशूर, 'यांत्रिक कळसूत्रां'चंहि, ठायीं ठायीं, कल्पक संयोजन केलं होतं त्यानें...

नि मग, आज असल्या संक्रमणाच्याच सुमुहूर्तावर, आपल्या बालिश, निर्मल, सहजसुलभ चैतन्याची एक ठिणगी टाकून, त्यानें ती बत्ती दिली



होती. त्याला तरी, त्या वेळीं, मनांत हमखास असंच वाटलं असेल, कीं... "आतां आपला हा दिव्य-भव्य 'स्फुटनिक', अनंत आकाशांत, अनंत काळ, सारखा गरगरतच राहणार !...कदाचित्, आपण ज्याला आपलं म्हणतों, त्या आपल्या जगाला तो कायमचाच प्रकाश देत राहणार !"...

पण...हाय ! 'आल्फा' पूर्वीच्या चार दोन 'पडेल' अमेरिकन उपग्रहांसारखी नि त्यांच्या 'बीटा' सारखीच...आमच्या बच्च्याच्या या स्फुटनिकांचीहि अवस्था झाली होती. कल्पनेंतलं तें अनंत अंतराळ तर दूरच राहिलं होतं; पण, त्या मूळच्या उड्डाणभूमीवर मात्र, चौफेर एकच एक हाहाकार पसरला होता !...

त्या बिचाऱ्याला काय माहीत, कीं, प्रीतीपेक्षां भीतीवरच आजचं जग अधिक चाललेलं आहे;...सहिष्णुता–सहकाराला अहंगंडी आत्मप्रतिष्ठेचंच ग्रहण लागलेलं आहे; त्यागी सौहार्द–सहानुभूतीपेक्षां, क्षुल्लक स्वार्थनाशाच्या संकुचित संशयी वृत्तीलाच अग्रेसरत्व आलेलं आहे !...इतरांच्या उत्कट सोज्वल भावनांना एखाद्या नव्या पैशाइतकीहि कोणी किंमत देत नाहीं !...चौफेर 'नॉट्–पेड्'–जमाना सुरू झाला आहे !...अगदीं 'नॉट्–पेड्' !—

असल्या अवांतर ज्ञानाचा आमच्या चिरंजीवांना कसला पत्ताच नव्हता. म्हणूनच, आपल्या निर्व्याज निवडींतून त्यानें निरनिराळीं आठ लक्ष्यं योजलीं होतीं; नि तीं एकूण आठ आयुधं त्यानें पोस्टामार्फतच अफाट अंतराळांत सोडलीं होतीं !

आणि हाय ! सांगूं काय ? कपाळ ? त्यांपैकीं (गणपतिकडल्यासकट) पहिलीं चार तर–दुसऱ्याच दिवशीं, माझ्याच कपाळीं येऊन कोसळलीं होतीं.

कारण, त्यांच्या शाळेंतला नववीचा वर्ग दुपारीं भरत असल्यामुळें ती नव्हता; कसल्याशा कामानिमित्त सौ. देखील दुपारीं बाहेर गेलेली, नि केवळ योगायोगानें, मी मात्र त्या दिवशीं घरींच !. त्यामुळें, पोस्टाचं तें 'उघडं गुपित', माझ्याशिवाय दुसऱ्या कोणालाच कळलेलं नव्हतं !

माझ्या मनच्या तसल्या सीलबंद गुपितामुळें आमच्या पक्यानें अंतराळांत सोडलेल्या, बाकी उरलेल्या चारांच्या भवितव्याबद्दल, माझ्या मनाला तर आतां अमाप उत्सुकतेच्या, अनंत व असह्य झळा आंतल्या आंत लागूं लागल्या होत्या. उद्यां रिझल्ट छापून येणार असल्यावर आज होत असते, तीच, तसलीच हृदयाची धडधड, मी क्षणोक्षण अनुभवीत होतों !—

तेवढ्यांतच, घरांत परतलेली सौ. आपल्या चपला कोपऱ्यांत काढून ठेवीत, मोठ्या घाईघाईनें नि कौतुकाच्या स्वरांत मला म्हणाली, "ऐकलं ऽ का ऽ !... ती ताई मोहनी अत्तां रस्त्यांत मला भेटली होती,...तिला मिळाली वाटतं आपल्या पक्यानें पाठविलेली ती 'संक्रांत भेट', पोस्टानें !—"

"हो ऽ !" मी चमकून विचारलं, "मग ?—काय म्हणाली ?"

"म्हणते कशी ऽ" आपल्याच तंद्रींत, सौ. अगदीं खुषींत येऊन पुढें सांगत होती—"'कित्ति...कित्ति ऽ छान काढतो चित्रं, तुझा मुलगा, ग ऽ !—त्याला आपला आपल्या आर्ट स्कुलांतच घाल बाई तूं ! कोण्णाऽचं ऐकूं नकोस !' आणखीहि काय काय बाई म्हणत होती ती; अगदीं तोंड फाटस्तर स्तुति करीत होती त्याची..."

"तें असो, म्हणा—" मला अखेर राहवेनाच; मध्येंच तिची ती तंद्री मोडून, मी तिला विचारलं, "आणखीऽ...पोस्टाबद्दल नव्हती का ग ती कांहीं बोलत ?"

"काय ? पोस्टाबद्दल ! !" सौ. साश्चर्य म्हणाली, "कांहींतरीच काय बाई तुमचं हें ऽ ! पोस्टाबद्दल हो काय नि कशाला विचारणार ती ? तिचे वडील पूर्वीं रिटायर्ड पोस्टमास्तर होते गांवीं, म्हणून म्हणतांय् कीं काय ?"

अर्थात्, त्यानंतर माझी दांतखिळी बसून, मीहि एकदम मख्खच बसून राहिलों. आपल्या लाडक्या आत्मजाबद्दलची तिची कौतुकमिश्रित चर्पटपंजरी तशीच 'पुढें चालूं' होती. पण तिकडे लक्ष देण्यांत, त्यावेळीं तरी, मला मुळींच कसलं स्वारस्य वाटत नव्हतं. मनांतल्या मनांत, तिच्या त्या...कोण त्या 'ताई मोहनी' चं मात्र मी खूप कौतुक केलं नि भरपूर आभारहि मानले !



मग, तिन्ही सांजेच्या सुमाराला, शाळेची ज्यूनिअर टीम—क्रिकेट प्रॅक्टिस वगैरे संपवून, आमचे ज्येष्ठ चिरंजीवच घरांत समक्ष प्रविष्ट झाले. अगदीं मुक्यामुक्यानें नि बोलक्या डोळ्यांनीं, मी त्याच्याकडे पाहूं लागलों. त्याच्या चेहऱ्यावर मी एखादी बातमी हुडकीत होतों; दिसेल तें टिपून घेत होतों.

चेहरा कांहींसा उतरलेला, रडवेला; आपलं दप्तर ठेवून, तो गूपचूपच घरांत गेला. शाळेंत कसले पैसे द्यायचे होते, म्हणून त्यानें सकाळीं जातांना पांचाची बंदी नोट नेली होती. त्यांतले उरलेले पैसे त्यानें आपल्या आईकडे नेऊन दिले; त्यावेळीं, त्यांत चार पैसे कमी असल्याचा पुटपुटता उल्लेख त्यानें केला; तसे मीं कान टवकारले.

मग जेवतां जेवतां, बोलण्यांतून बोलणीं निघालीं नि हळू हळू उलगडा झाला. आपल्या चित्रकला गुरुजींनाहि त्यांतलं एक 'भेट-कार्ड' त्यानें पाठवलं होतं. आज सर्वांकडून ड्रॉइंग वहीचे पैसे घ्यायचे होते; ते घेतांना, उरल्या खुर्द्यांतले चार जादा नये पैसे त्यांनीं परस्पर कापून, काढून घेतले होते. एवढंच नव्हे—तर त्याच्या त्या अर्धवट नि मूर्ख उपद्व्यापांची गुरुजींनीं जाहीर चिरफाडहि वर्गांत केली होती. तो सर्वच प्रकार या बालचित्रकाराच्या मनाला खूपच खुपला होता, हें त्याच्या तुटक उत्तरांतून, सरळच समजून येत होतं.

त्यावरून, त्याच ओघांत, त्या मायलेकांची मग एक हुजत लागली होती—"बाकी सर्वांना तिकिटं बरोब्बर लागलीं ! नि मग, त्या एकालाच रे कशीं अशीं कमी लागतील ?"......

मला त्या दोघांची एकीकडे कींव येत होती नि एकीकडे हसूंहि येत होतं ! तरी पण, एखाद्या त्रयस्थाप्रमाणें, मी तें सारं गुपचूपच ऐकत जेवत होतों. बिचाऱ्यांना वाटत होतं, कीं, सारीं ज्यांचीं त्याला पोंचलीं ! पण...अंदरकी बात एक राम जाने,...और एक हम !—

अज्ञानांत नि मौनांत किती आनंद नि अर्थ भरलेला असतो !......

त्या क्षणीं, मला त्याचीच जास्तींत जास्त व प्रत्यक्ष जाणीव होत होती;...

•

मग दुसऱ्या दिवशीं सकाळीं, पहिली डाक आली. त्यांतून, त्याच्या मामाचं त्याला कलकत्त्याहून पत्र आलं होतं. त्यांत मामानें त्याला लिहिलं होतं—

" दूर दूर अंतरावरून, तुझी गोड गोड संक्रांत, आमच्या घरांत अगदीं ऐन वेळींच शिरली. किती आनंद झाला !—

" दुसऱ्या पानावर ठेवलेल्या तबकांतले तुझे सारे तिळगूळ...मिटक्या मारीत मारीतच, मनानें पुनः पुन्हां खाल्ले आम्हीं ! तरी अजूनहि आमच्याकडे ते जसेच्या तसे शिल्लक उरले आहेत;...मुद्दामच, ते आम्हीं आतां पेटींत घालून शिल्लक ठेवले आहेत.

" तुझी चित्रकला तर घरांतील आम्हां सर्वच लहान थोरांना फार फार आवडली. एक मात्र ! कमळाचा तो देंठ जरा गुलाबाच्यासारखा ताठ व कांटेरी असल्याचा तुझ्या मामीला भास झाला, म्हणे; आणि कमळाच्या आवतीं-भोंवतीं गुंजारव करणाऱ्या त्या भ्रमराचे फक्त चार पायच येथपर्यंत सुखरूप येऊन पोंचले आहेत. तेव्हां, पुढील खेपेस, त्याला जरा ' षट्पाद ' करूनच पाठवलंस, तर तो जरा लौकर येऊन पोंचेल; नि शिवाय, तो त्याच्या इतर भाईबंदांसारखाहि दिसेल, असं आपलं मला वाटलं. आणि काय रे ?— इकडच्या थंडीला भिऊनच का त्यानें आपल्या पंखांवरून बुलन कोट घातला होता ? शक्य आहे ! पण मग,...तो रंगाचा ' कोट ' त्याला तितकासा शोभत नव्हता, एवढं खरं !

" तें कांहींहि असलं, तरी त्याच्याप्रमाणेंच आम्हीहि, मिळेल तो सर्व मध रसिकपणें चाखून घेतला, बरं का !—खरोखर...तो तुझ्याइतकाच गोड गोड होता. खरं म्हणजे, तुझ्या या ऐनवेळच्या अकस्मात् भेटींतलं सारंच कांहीं गोड गोड होतं !—

" नाहीं म्हणायला, आमच्या हातीं हें सारं गोड गोड आणून देण्याचं काम करणाऱ्या पोस्टाच्या भावशून्य आंधळ्या नियमानें मात्र, आमचं तोंड सुरवातीसच थोडं कडवट करून पाहण्याचा घाट घातला होता !...पण आम्ही कसले छट् !...तो कडू घोट आम्ही तात्काळ गिळून टाकल्यामुळें, त्यांत कसला भूर्दंड वाटलाच नाहीं आम्हांला...

" तरी पण...व्यवहारी जगांत वावरतांना, आपण आगाऊच व अधिक सावध असावयास हवं, हेंहि तितकेंच खरं ! कारण असं, कीं, माझ्यासारखे सगळेच कांहीं ' मामा ' नसतात ! खरं ना ? "



तें सारं वाचून, तो व त्याच्याबरोबरच आम्हीहि सारे मनमुराद हंसलों !...

त्यामुळेंच, आधल्या दिवशीं शाळेंतून परततांनाची त्याची खिन्नता तर क्षणार्धांत पार पळाली होती.

' आठ नये पैसे कीं, सहा नये पैसे ? ' याबाबतची, कालपासून त्याच्याशीं अधून मधून चाललेली, त्याच्या आईची हुज्जत सुद्धां थोडीशी ओसरली होती. कुठं तरी, कांहीं तरी चुकलं असल्याची तिलाहि आतां जाणीव झाली होती.

मीहि ती उघडी मूठ आतां फुकाची केली होती.

तिच्या चिरंजीवांचा आतां उरतां उरला होता आठवा ' अग्निबाण ? ' पण, तो तर त्यानें पोस्टांतून, मुलांच्या नभ संचारी ' गंमतजंमती ' वरच सोडला होता.

आतांपर्यंत झालेल्या भ्रमनिरासानंतरहि, " तो तरी आतां निश्चितच ' बूमरॅंग ' प्रमाणें परत येऊन पडणार नाहीं; त्याचं निश्चित स्वागत-सार्थकच होईल ! " असं आपलं खात्रीपूर्वक मतप्रदर्शन, ती माझ्याकडे हडसून खडसून वारंवार करीत होती.

मी मात्र, दबा धरून, घडेल तें बघण्याची साशंकपणें वाट पाहात बसलों होतों. कारण,...चालतीं—बोलतीं—वागतीं माणसं, जवळून व चारी बाजूंनीं पाहण्याची, मला कुतूहलपूर्ण उत्सुकताच लागली होती !

पुढल्या दिवशीं, बरींचशीं कामं सकाळींच उरकून, मी घरीं परतलों होतों, जेवलों होतों, व छाताडावर वर्तमानपत्र पांघरून, कॉटवर वामकुक्षी करीत पडलों होतों...

तेवढ्यांत, दारांतून एखाद्या देवदूतासारखी ललकारी आली—" टपाऽल ! "

जाग येऊनहि, मी तसाच निश्चल पडून राहिलों; तेव्हां सौ. च लगबगीनें पुढें झाली. त्याला तिनें उत्सुकतेनें विचारलं..." काय आहे हो ? "

" गंम्मत्...जंम्मत् ! " थेट आकाशवाणीच्या नाटकी धर्तीवर आंदोलत उच्चारलेले, पोस्टमनचे दारांतून आलेले हसरे शब्द, माझ्या बंद डोळ्यांवर व उघड्या कानांवर पडले..." फक्त चार नवे पैसे द्याऽ, बाई ! "

मला आंतून हंसूं येत होतं; तें दाबून, माझे चमकले कान मी टवकारले, नि तसाच गुपचूप पडून, ऐकूं लागलों...

" हो ऽ का ऽ ? अस्सं ऽ च का झालं ऽ शेवटीं ? " किंचित् हिरमुसल्या स्वरांत सौ. प्रथम उद्गारली; पण मग, पटकन् पुढें म्हणाली, " बरं बरं ! आम्ही बाकी वाटच पाहात होतों याची..."

ती तें धादांत खोटं बोलत होती; तिच्या बोलण्यांतील स्वरांदोलनांवरून, तें कोणालाहि सहज समजून येण्यासारखं होतं ! त्याक्षणीं, ' पडली तरी नाक वर ' होतं तिचं !—

" पण...वाट हो कसली पाह्यची होती त्यांत ? आहे काय त्यांत ? ' सहा नव्हे, आतां आठ नव्या पैशांत बुक-पोस्ट जातं '; हें पुष्कळांनाच माहीत नसतं. पण मग ..ही तर पोरांची ' गंमत जंमत 'च ! अगदीं सरकारीच होती..." पोस्टमन मिस्किल आंदोलनं घेत पुढं म्हणाला, " हं ऽ ! एन्. पी., एन्. पी... ! या गेल्या एप्रिलपासून एन्. पी. म्हणजे ' नॉट-पेड्'च झालयं ! आहे कीं नाहीं गंमत जंमत ?...सरकारदरबारींसुद्धां तेंच ! ' एन्. पी. ' !..."

" आहे खरं ! आणतें हं..." असं म्हणत, सौ. लगबगीनं घरांत शिरली. आपल्या पर्समधला सारा नवा-जुना खुर्दा तिनं झटकन् टेबलावर पालथा केला; शोधतांना, तिनं स्वतःशींच कांहींशी अस्वस्थ पुटपुट केली; नि मग, पुन्हां दाराशीं जात, ती पोस्टमनला अगतिक स्वरांत म्हणाली, " आतां ऽ हो काय करायचं ऽ ? सुटेच नाहींत नवे पैसे; आहेत माझ्या पाशीं, ते हे !...हे दोन नये पैसे नि हे दहा !...आत्तां ऽ ? "...

" तुम्ही तर दोन नये पैसे तरी जवळ बाळगून आहां, बाईऽ ! माझ्याकडे तर एकहि नाहीं सुटा !..." मिस्कीलपणं हंसत हंसत तो म्हणत होता— " बरं तर !—आतां असं करा—हे ते दोन पैसे...हं...हें घ्या ' नॉट् पेड् ' तुमचं—"



" म्हणजे ?...नि दोन नवे पैसे मी आणखी द्यायचे उरतात ते तुमचे ? वाः वाः ! दहा नवे पैशांचंच घ्या ना हें नाणं ? राहूं द्यात;...नाहीं तर, येतां जातां द्या, मागून केव्हां..."

" छे छेः !...ठेवा तें !...त्यापेक्षां दोन एन्. पी. भरीन कीं मीच ! असूं द्या...असूं द्या ! अहो ऽ,नियम शेवटीं माणसानेंच वापरायचा असतो —"

" पण्...पण्..तें कां म्हणून ? तुम्हीच कां म्हणून ? ? मला नाहीं समजत !..."

" दुसरं कोणी तरी नाहीं, म्हणून !...तुमच्यापाशीं सुटे नाहींत, म्हणून ! " तो मोठ्यानें हंसत हंसत, सौ. सारखींच आंदोलनं घेत म्हणाला - " का ऽ य तरी, बाई, तुम्ही ऽ तरी !—हा ऽ हो कसला हिशेब ?...या ऽ सोडून ! कालपासूनची तुमची ही चौथी...नव्हे, पांचवी...' नॉट पेड् संक्रांत ' ! निदान, हें तरी परत यायला नको होतं, मला वाटतं ! हं...म्हणे मुलांचं केन्द्र ! गममत् जममत् !...आतां केवळ, योगायोगानेंच, मी हे दोन पैसे भरतोंयू; पण म्हणून कांहीं वाटून घेऊं नका, बाई, तुम्ही, मनांत..."

पुढल्याच क्षणीं, जिन्यावरून भरभर उतरणाऱ्या त्याच्या पावलांची धडधड माझ्या कानीं पडली.

माझं हृदय जरा उजळलं होतं...

पण त्याच वेळीं, सौ. त्याला उद्देशून, दारांतून मोठ्यानें म्हणत होती, ..." वाः वाः ! तुम्हाला मात्र हा नाहकच भूर्दंड ! हें बरं नाहीं..."

आणि...काय आश्चर्य तरी...!

त्याच क्षणीं, पोस्टमनचीं तीं उतरतीं पावलं मधेंच थबकलीं. पुन्हां वर चढून येत, हंसत हंसत, तो हिला म्हणत होता—" बरं तर, बाई !...तुमच्या जिवाला तरी उगीच रुखरुख कशाला ? द्या तें ' नॉट्-पेड् ' इकडे; मलाच द्या,...तुमच्या घरांत पडून रहाणार, त्यापेक्षां !...नाहीं तरी...मी भरलेच आहेत कीं, दोन पैसे आतां ! ..देतां ? तुमची परवानगी असली, तर मोठ्या

आनंदानें घेऊन जाईन मीं !—फार आवडलंयू मला तें...मी करीन आपली गरिबाऊ गंमत जंमत !...चालेल ?...चालेल ? ? ”

मधें क्षणकाळच सारं शांत होतं !...

पण मग, एकदम फस्कन् दिलखुलास हंसू फुटत, सौ. चे शब्द आले... “ हो हो !...वाः वाः !...घ्या कीं ! खुश्शाल ! घेऊन जा...तुम्ही... अगदीं मोठ्या आनंदानें !...मी सांगेन आमच्या पक्याला हें सारं...”

“ त्याला सांगा—‘ शुक्रिया ! ’—म्हणावं, ‘ तूं मला न पाठवलेली संक्रान्त–भेट मला पोंचली ! ’ ”

तो हंसला नि पटकन् जिना उतरून, धडधड धडधड दूर दूर निघूनहि गेला......

पडल्या पडल्या, तें सारं आंतून ऐकतांना, आतां तर...आंतल्या आंत मला सहस्र गुदगुल्या होत होत्या. आनंदाचं एक न्यारंच भरतं येऊन, मला गुदमरल्यागतच होत होतं.

अगदीं सारींच्या सारीं...‘ नॉट् पेड्, ’ मी क्षणार्धांत साफच विसरून गेलों होतों...

कांहीं तरी अनपेक्षित चांगलं घडून आल्यावर, आपण जसं प्रथम भांबावतों, तसल्याच थोड्या संथपणानें दार बंद करून, सौ. घरांत परतली; येतां येतांच, झोंपेंतून मला झटकन् जागं करण्यासाठीं, ती अगदीं अधीरतेनें नि मोठमोठ्यानें म्हणाली—“ ऐकलं ऽ का हो ऽ ?...आहे का माहीत आतां कोण येऊन गेलं तें ?—नि काय झालं तें ?...”

डोळे न उघडतांच, पडल्या पडल्या स्मित करीत, मी म्हणालों, “ हं, ऐकतोंयू ! ऐकलंयू ! तुम्हीं सांगणार असाल, बाईसाहेब, एकच !... ‘ नॉट पेड् ’...‘ नॉट पेड् ’ !...खरं ना ? ”



“ होऽन्...” उतावीळपणेंच सौ. मला पुढं सांगूं लागली—“ तें उरलेलंहि परत आलं ! पण मग, अहोऽतो म्हणाला–‘ नॉट पेड् ’; नि माझ्याकडे तर...”

पटकन् उठून बसत, तिला मधेंच थांबवून, तोंडभर हंसत, मी तिला दटावून म्हणालों, “ अग् चल् चल् ! कोण कधीं म्हणालं ‘ नॉटपेड ’ ? तोहि नाहीं म्हणाला तसं ! छे छे ! आतां तर मुळींच नाहीं. नो नो ! नॉटटॉल् ! नॉट् ‘ नॉट-पेड ’ ! मादाम, नाउ वी आर फुलली पेड् ! डबूली पेड् ! ! यस्, डबूली पेड् ! ! ”

तेव्हां मात्र, सौ. देखील समाधानानं हंसली !

संसारी जीवनांतील एक अतीव सुख तिच्या सोज्वल चेहऱ्यावर फुललेलं दिसत होतं !

त्याचं प्रतिबिंब माझ्याहि हृदयांत पडलं होतं...

• • •

# इहलोकींचं अमृत

केवळ सहज म्हणून, रेडिओ सुरू करावा; ‘ वा. मं. ’ सारखी एक जबाबदार अधिकारी व्यक्ति वाङ्मयचर्चा करीत असावी; विषय— ‘ दोन नव्या पुस्तकाचं परीक्षण ’ हा असावा;...नि योगायोगानें तीं दोन्हीं पुस्तकं आपण स्वतःच लिहिलेलीं असावींत !

आश्चर्याचा केवढा गोड धक्काच बसेल ? आनंद—अभिमानानें धुंद होऊन, क्षणभर, आपण स्वप्नांतच असल्याचाहि भास होईल !

माझी तरी छाती, त्या क्षणीं,–दीड तपापूर्वीं–रुंदावली. नाक नेहमींपेक्षां वर झालं; मान ताठ झाली; पायांत नवा जोम संचारला; हात फुरफुरले; माझ्या काटकोळ्या मनगटाची स्वाभिमानी जाणीव होऊन, माझ्या हृदयांत विविध विचार–भावना कोंदाटल्या; अगदीं कल्लोळ करून उठल्या !

सहजस्फूर्तच उद्गार मनांत उमटले—“ हा खराखरा उपकारी माणूस ! हेंच तें मर्त्य मानवाचं अमृत ! माझं भाग्य,–कीं मला तें आज लाभलं ! ! ”

समोर पडलेल्या अनेक पुस्तकांच्या चळतींतून, तात्यांनीं आस्थेवाईक आपुलकीनें तींच प्रथम उचलावींत; आपल्या ‘ मालेचं पहिलं पुष्प ’ त्यांच्यासाठींच खर्चावं; एकांगी, आंधळा गौरव न करतांहि, मला त्यांनी वेळींच पण अनपेक्षितपणें गोंजारावं.

माझ्या मनावर नभांतून सिंचणारा असामान्य अमृत–वर्षावच नव्हे का तो ?...म्हणून तरच, मला वाटतं...माझं मन त्यावेळीं तरारून गेलं; त्या केवळ स्मृतीनें, आजहि, तें तरारल्यासारखंच होतंय्...



या अनुभवामुळेंच, याक्षणीं मला वाटतंय्–‘ योग्य माणसाच्या तोंडचे योग्य व उत्तेजक शब्द, कोणावरहि, चिरंजीव असं अमृत–सिंचनच करून जातात !—त्यांत दडलेली स्नेहाळ उत्तेजनाची ती दैवी किमया ! ती अशीच एक न्यारी जादुगारीण असते ! त्या जादुगारिणीच्या हळुवार हस्त-स्पर्शासाठीं प्रत्येक छोट्यामोठ्या व्यक्तीचं हृदय सदैव आसुसलेलं असतं !...’

‘ योग्य वेळीं, योग्य शब्द ’–म्हणजे, प्रयासानें लावलेल्या शेताला, योग्य वेळीं गोंजारणाऱ्या, आभाळींच्या जलधारांचं आगमन-सिंचनच !—जागरूक रसिकतेनें, इतर साऱ्यांवर आपण तसलं अमृतसिंचन आस्थेनें करीत राहणं, हें मला तरी वाटतं—आपलं एक श्रेष्ठ, पवित्र, मानवी कर्तव्यच होय !...

हा विचार मनाला पटणं सोपं आहे; पण, तो पेलणं, जीवनांत आपलं तसं प्रत्यक्ष वर्तन घडणं, हें मात्र महा कर्म कठीण !...तो दृष्टिकोनच, एक-प्रकारें, अतिमानव, दैवी असतो; हेंच त्याचं खरं कारण—

मानवाहातून चुका घडणं, हें नैसर्गिक मानतात. पण, त्याहून अधिक नैसर्गिक काय असतं, माहीत आहे ?–उडत्या पांखराच्या पिसांप्रमाणें, इतरांच्या चुका, त्यांचे दोष, त्यांचीं वैगुण्यं मोजणं–शोधणं !–बोचक नि भडक शब्दांत, इतरांना ( व त्यांचं त्यांनाहि ) त्याचं अहंगंडपूर्वक दर्शन घडविणं ! ही नैसर्गिक कला ( स्वतःला अकला नसलेल्याहि ) शंभरांतल्या नव्व्याणवांना सहज जमते, हा माझा अनुभव आहे.

पण उलट, दुसऱ्यांच्या अंगचे निश्चित गुण पारखणं, त्यांच्यांतील आपल्याला प्रतीत होणारं कमीअधिक चांगलं, त्यांचीं सानथोर यशं,–गुण-ग्राहकतेनें टिपून, वेळींच, भोंवतालच्या इतरांकडे अथवा त्यांची त्यांच्याचकडे तीं रुजू करणं, हें किती दुर्मिळ असतं पाहा ! तशी क्वचित् आपल्याला इच्छा झाली, तरी आपला दडलेला अहंभाव तोंडाच्या दारावरच उभा राहतो; पुढें सरणाऱ्या इतरांबद्दलच्या तसल्या शब्दांना तो जिभेखालीं चेंगरवूनच टाकतो; आपल्या डोक्यांत, आपल्या नकळतच, मत्सराचं वारं भरभरतं; नि आपल्या अंतर्दृष्टीच्या डोळसपणाला, बघतां बघतां, खग्रास ग्रहणच लागतं ! !

मला तर वाटतं,—सुलभ दोषदर्शनाच्या आहारीं जाणं, ही एक मानवी व्यथा आहे. मोठमोठ्यांच्याहि हाडींमासीं ती खिळलेली आढळते. पण कोणी तसं म्हटलं, तर मात्र ते आपलं उलट समर्थनच करतात.

ते म्हणतात–" योग्यच करतों हें आम्हीं. कोणी उगीच चढून जाण्याचं, त्यामुळें आपोआपच टळतं ! तसल्या दोषदर्शनानें, आपापल्या दोषांची त्याला जाणीव होते नि त्याच्या उणीवा–दोषांचं आपोआपच उच्चाटण होतं ! गुण अंगीं असतील तर ते असतात, राहतातच ! मग आतां सांगा, आम्ही करतों ...त्या त्या दोषदर्शनानें, ती ती व्यक्ति, अधिक गुणी, अधिक बाकबगार, जास्त हुशार नि उपयुक्त नाहीं का बनत जाणार ? दोषदर्शन हें कडू असलं, तरी तें रोग्याला पुष्टिकारक टॉनिकच होय !– "

क्षणिक विचारानेंदेखील, असल्या या समर्थनाचा पृष्टस्पर्शी एकांगीपणा जाणतां येईल. मला तर–त्यांत अल्पसंतुष्ट, संकुचित मानवी मनोवृत्तींचंच अधिक प्रतिबिंब पडलेलं दिसतं !–रोगट मन असतं, तें तर बोलणाऱ्यांचंच !–

कारण, दोष नि वैगुण्यं, म्हणजे—काय ?...असल्या ( दोषदर्शन—कानउघडणी यांच्या ) झाडूनें झटकून टाकतां येण्यासारखी–मानवी मनावर वरवर बसलेली धूळ थोडीच असते ती ? असल्या अट्टाहासानें मूर्तींचं अंगभूत सौष्ठव वाढेल थोडंच ? त्या ऐवजीं, असेल तीच प्रमाणबद्धता, आकर्षकता, यांची रसिक जाणीव घेऊन व ठेवून, त्यांना हळुवार हातांचा उजाळा मिळत जाणं, हेंच अधिक हितकर व समाजोपयोगी नव्हे काय ? प्राप्त गुणांची जोपासना व वाढ, योग्य व योग्य बेळच्या त्यांच्या जाणीवेनेंच होऊं शकेल. पण, हें कोणाला सांगायला का हवं ?...

इतकं असूनहि, गुण–दोषांकडे पाहण्याच्या सर्वसाधारण दृष्टिकोनांत, नेहमींच एक अफाट–जमीन-अस्मानी-फरक आढळतो, एवढं मात्र खरं !—

सकाळ–संध्याकाळीं, घरीं जेवतांना, कशांत मीठ किती कमीजास्त झालं आहे तें ओळखायला कुठल्या पाकशास्त्र विद्यालयाची पदवी आपल्या खिशांत असावी लागते थोडीच ? अर्थात्च, तसल्या वैगुण्य—दोषांचा तात्काळ पुकार करणं नि त्याचं पुरं माप पटकन् आपल्या आईच्या वा पत्नीच्या पदरांत टाकणं, हें आपल्याला सहजच, नित्याच्या नैसर्गिक सरावानेंच, जमत असतं !



—खरं म्हणजे, तेवढ्यानें, आधीं जास्त झालेलं मीठ कमी होऊंच शकत नाहीं. आणि कमी झालं असलं, तर तें आपल्याच हातानें चिमूटभर घेऊन, त्या पदार्थांत टाकल्याशिवाय, चवीसारखा तो बरोबर होणार नसतो. पण मग, त्या क्षणाच्या आपल्या तापलेल्या स्वयंकेंद्रित डोक्याच्या सहजसुलभ अरेरावीला, हा थंड डोक्याचा संथ विचार पेलणारच कसा मुळीं ?

उलट, दुसरं मात्र हजारदां घडत असतं; तें असं, कीं, आपल्या पानांतले सारेच पदार्थ, जिथंच्या तिथं, चविष्ट, अगदीं ' ए–वन् '—झालेले असतात ! कांहीं उलटून बोलायला, नांवं ठेवायला, तिथं जागाच नसते ! पण त्यावेळीं, त्या सर्वांगीण गुणीपणाचा मनमोकळा रसिक स्वीकार व उच्चार, तितक्याच सहजतेनें आपल्या तोंडीं येतो कां ?...त्याक्षणीं, अन्यप्रकारें रसास्वादांत गुंग झालेली आपली स्वार्थी रसना, तसल्याप्रकारच्या दुसऱ्या रसग्रहणासाठीं, सहसा वळूंच शकत नाहीं ! हा आपला सर्वांचाच, नित्याचा अनुभव नाहीं का ?...

पण, याला कारण मात्र वेगळं,.. अगदीं उघडं आहे !...वेळच्यावेळीं, तसं रसग्रहण व्हायला–उपजत नसली तर निदान जोपासलेली तरी–एक विशिष्ट अशी श्रेष्ठ दृष्टि, असामान्य अहेतुकता, औदार्य,...आपल्यांमध्यें असावं लागतं. पण मग,–त्याच चीजांची तर जगांत चौफेर मोठी वानवा असते !—

वाङ्मय, कला इ. सांस्कृतिक बाबी घ्या. त्या तरी, या नियमाला अपवाद असतात थोड्याच ? मग या विश्वव्यापी साम्राज्यांतसुद्धां, अशाच एका उद्धट अहंगंडी वृत्तीच्या शब्दबंबाळकुशल वाग्वीरांशींच आपली भेट होते, वारंवार !–

वस्तुतः, कलामंदिराचे ते स्वयंसंस्थापित पुजारी !...पण त्यांची चाल मात्र, सदैव, एखाद्या मदोन्मत्त हत्तीप्रमाणें–समोर येईल तें तें पायाखालीं तुडवणारी–असते. वास्तविक, रसास्वाद हा त्यांना सुदैवानें लाभलेला असामान्य, दिव्य वर,...अधिकार ! पण, त्यांच्यासमोर विनत झालेल्या कलाकृति–कमलिनींवर, त्यांचे आपले धुंद पदाघातच सदैव होत असतात. त्यांच्या रसिकतेला, सर्वांत आधीं, कुठल्याहि कलाकृतींतील सारीं सूक्ष्म वैगुण्यं, ' दोषास्पद गाढवपणा ', ' अफाट अज्ञान ' इत्यादि बाबींचाच तेवढा

साक्षात्कार होत असतो; म्हणून, ' कुठं काय नाहीं ' याचंच ते शब्दावडंबर करतात. तेव्हां त्या गडबडींत—तिथं काय आहे, रसिकतेला काय आढळेल, आवडेल, आवडावं, याची प्रतीति त्यांना कशी होणार ? नि त्याबद्दल ते कशाला कांहीं बोलणार ?

जिथं या महान् मार्गदर्शकांनाच प्रकाश-स्रोत आढळत नाहींत, ज्यांना कालच्या आजच्या किंवा उद्यांच्या, कुठल्याच संगीताचे यथार्थ स्वर ऐकण्याची शक्ति नसते,...तिथं त्यांचाच हात धरून चालणाऱ्या सामान्यांच्या डोक्यांतहि, यांच्या तसल्या ' रसिक ' वाग्जालांनीं, घनदाट अंधार तेवढा वाढत गेला, तर त्यांत आश्चर्य कोणतं ? कर्णकठोर गोंधळच उडाला, तर नवल काय ?

किंबहुना, यांच्या असल्या सतत संस्कार-संसर्गानेंच, हळूंहळूं, त्या सामान्यांनाहि काळोख तेवढा पाहण्याची व काळोखांतूनच समोर पाहण्याची संवय होते. अखेर, समोर नसलेलीं भुतंच शोधून काढण्याची तेहि सदैव पराकाष्ठा करतात. अर्थात्, सांदीफटींतून येणारे सूक्ष्म प्रकाशस्रोतहि पुढें पुढें त्या बिचाऱ्यांना लाभूं शकत नाहींत ! स्वतःचे डोळे असून ते आंधळे होतात.

खरंच ! ही ' काळोखाकडे सूक्ष्मदर्शक यंत्रांतून पाहण्याची कला '—म्हणजे, मानवी जीवनांतला एक महा भयंकर संसर्गजन्य रोगच आहे ! त्यानें बहुसंख्य लोक नेहमीं पछाडलेले आपल्याला दिसतात. अनेकदां, आपण इतरांकडे व इतर आपल्याकडे, या भयंकर कावीळेच्या दृष्टीनेंच पाहात असतात. शुभ्र-स्वच्छ गोष्टीहि म्हणूनच आपल्याला पिवळ्या दिसतात !

यावरूनच माझ्या परिचयाच्या एका पितापुत्र जोडीची इथं मला आठवण झाली. त्या दोघांनाहि मानणारे अनेक आहेत. तरी त्या दोघांचे परस्परांचे अनेक बाबीबाबतचे अव्याहत तीव्र मतभेद इतरांच्या दृष्टींतून सुटले नाहींत. त्यामुळें दोघेहि नेहमीं त्या झळीनें त्रस्त, दुःखी, असमाधानी राहिले. परस्परांचे लहानसान दोषहि टिपून, ते उगाळतच राहिले. त्यांच्या तोंडी-लेखी पुकारानें ते परस्परांना सदैव व्यथित करत राहिले. दोघांच्या हातून तसं तें नैसर्गिकच घडत राहिलं.



याचा अर्थ, परस्पर गुणांची जाणीव होण्याइतकी रसिकता त्यांच्यांत नव्हती, असं मात्र नव्हे. एकमेकांच्या पाठीं, ते दोघेहि, परस्परांचे इतरांसमोर आस्थापूर्वक गुणग्रहणच करीत. पण प्रत्यक्ष परस्पर-वर्तनांत मात्र, कोणी कोणालाच, परस्परांचे गुण, प्रेम, यश, कधीं दर्शविलीं नाहींत; परस्परांना कधीं उत्तेजितहि केलं नाहीं; अगदीं अप्रत्यक्ष सुद्धां !—

असल्या वर्षानुवर्षांच्या वागणुकींत, दोघांपैकीं कोणीच कधीं हार गेला नाहीं. त्यामुळें, झालं मात्र एकच; दोघांमध्यें अजस्र तटबंद्याच जणुं उभ्या होत गेल्या. अंतरंगांत परस्परप्रेम, आस्था असूनहि, परस्परांमधला वरवरचा कडवटपणा, असमाधान, वैषम्यभाव, कधींच ओसरला नाहीं. जें जें दोघांच्याहि आयुष्यांत, परस्पर सुखाचं, सहजासहजीं, नैसर्गिकपणें होऊं शकलं असतं, तेंच मुळीं त्या दोघांना, इच्छा असूनहि, आयुष्यभर लाभूं शकलं नाहीं !

आतां, पित्याच्या पश्चात् मात्र, त्याच्या वैयक्तिक थोरवीबद्दलचा नितांत आदर, एकट्या मागें उरलेल्या त्या मुलाच्या मनांत तुडुंब भरला आहे, असं आम्हांला दिसतं ! नि त्या परिस्थितींत, एक चमत्कारिक शल्य, ( त्याच्याच काय, पण दोघांनाहि जाणणाऱ्या आमच्यासारख्या तिऱ्हाइतांच्या मनालाहि ) सतत सलत राहातं, कुरतडत राहतं !

म्हणून, मानवी जीवनांतील असल्या ठुसठुसणाऱ्या शल्यांवर रामबाण तोडगा, मला तरी वाटतं, एकच आहे ! पश्चात् उपाय योजनेऐवजीं, आगाऊ ' योग्य वेळीं योग्य शब्द ' ! याच असामान्य ' अमृत–नियमा ' चाच अखंड अवलंब करण्याचा !

म्हणूनच, आपण सर्वांनींच त्याचा चौफेर प्रचार केला पाहिजे; स्वतः हरघडी तसा आस्थेवाईक आचार केला पाहिजे !

कारण असं—' योग्य वेळीं योग्य शब्द ' या साध्या नियमानें त्रिविध फायदा होण्यासारखा आहे. इतरांच्या गुण शोधण्याच्या सदैव सहेतुक सत्प्रवृत्तीमुळें, प्रत्येकांत नैसर्गिक असलेली रसिकता वाढेल; लहान मोठ्या गुणांचं योग्य वेळीं वाजवी चीज झाल्याचं समाधान प्रत्येकाला सदैव लाभेल; त्या उत्तेजनामुळें, प्रत्येकाचे ते ते जन्मजात गुण वाढीस लागतील; आणि

अर्थातच, पर्यायानें, समाजांतील रसज्ञता, सहिष्णुता, परस्परादरवृत्ति, सारंसारं, गणितश्रेढीनें वाढत जाईल. तेव्हां मग, असला समाज, असलं राष्ट्र, उत्तरोत्तर अधिकाधिक प्रगतिपथावरून चाललं नाहीं, तरच आश्चर्य !

झोंपलेल्याच्या कानीं, सुप्तावस्थेंत बोलून, त्याच्यामध्यें बदल घडवण्याचा, ' स्वयंसूचने 'चा ( ऑटोसजेशनचा ) एक मानसशास्त्रीय यशस्वी यशस्वी प्रयोग करतात, म्हणतात. मात्र मुख्य म्हणजे, कांहीं 'नकारात्मक' बोलण्याची मनाई असते. तर मग,–हाच संकेत जागृतावस्थेंतहि सर्वांनीं सर्वांबाबत पाळून, एकमेकांना गुणदर्शनाच्याच परस्परसूचना करण्याचं ठरवलं, तर काय बहार उडेल ?

खरंच, प्रत्यक्षाप्रत्यक्ष उत्तेजनासारखं मोठ्यांत मोठं ' पेनिसिलिन '...या जगांत दुसरं कोणतंच नसेल !

मला वाटतं–शब्दानें शब्द वाढतो, घर्षणांतून स्फुल्लिंग निर्माण होतात, प्रकरण विकोपाला जाऊन विध्वंस होतो,...तो फक्त दोष–दर्शनावेळींच !...पण शब्दानें शब्द द्विगुणित करण्यांत, यशाला अधिक यशस्वी करण्यांत नि क्रियेला अधिक क्रियाशील, कर्तव्यतत्पर करण्यामध्येंच, खरीखुरी मानवी विधायकता आहे. व्यक्तिगत दोषांचं खरंखुरं नि अप्रत्यक्ष निर्मूलन झालं, तर तें फक्त या उपायानेंच होईल. योग्य नि मोजक्या शब्दांत, योग्य नि अनुकूल वेळीं, तें तसं होत गेलं, तरच—ती विधायकता अधिकांत अधिक प्रभावी होईल–!

विचारानें हें सारं पटूनहि आपल्याला तें सारं आचारांत आणणं मात्र जमत नाहीं. याचं कारण एकच आहे, मला वाटतं;—आपल्या समाजाला या बाबतींत लाभलेलं एक न्यारं बाळकडू !— एखाद्या सुंदर देखाव्याकडे पाहतां पाहतां देखील, मिथ्या जगांतील मायाबाजाराचं विश्वरूपदर्शन घेत राहण्याची एक शिकवणूक आपल्याला मिळालेली असते. तिचाच एक जाड राप आपल्या मनावर नि आपल्या बघायच्या चष्म्यावर बसलेला असतो. म्हणूनच, आपल्या भोंवतालच्या सर्व उजळ गोष्टी, आपल्याला आपोआप धुरकट दिसूं लागतात !



—आणि मग,–ओघानेंच आपल्या मनाच्या व चष्म्याच्या तसल्या धुरकट दुध्या काचांवर, काळोखाच्या लांब लांब सावल्या तेवढ्याच सुलभतेनें पडत राहिल्या, तेवढ्याच आपल्याला उठून दिसल्या, तर त्यांत आश्चर्य तरी कसलं ? अर्थात्, ' भोंवतीं सारा काळोख पसरला आहे, ' अशीच, जनीं-मनीं, स्थानीं-अस्थानीं, हाकाटी करीत, आपण आपलं सारं आयुष्यच घालवतो !—

कोणत्याहि मनोहर वस्तूला सावली ही चिकटलेली असायचीच !—सावलीचा रंगहि सदा काळा हा असायचाच !—पण प्रकाशाचा उपयोग सावली पाहण्यासाठीं करायचा नसतो; कीं, काळ्या सावलीवरूनच प्रत्यक्ष वस्तूचं मनोहारी स्वरूप अजमावयाचं नसतं !—असल्या गाजरपारखी दृष्टीनें, जगाची खरी किंमत कशी ठरणार ? कशी समजणार ?

पण, ही खरी दृष्टि अशी हुकली, जाणीव दुर्लक्षिली गेली, कीं, सारंच हुकतं !—मग, बहुरंगी मानवी जीवन जगतांना व बघतांना, आपण त्यांतील विविध रंग, रस, आसुसलेल्या रसिक मनानें निवडूनच घेऊं शकत नाहीं; त्याऐवजीं, त्या त्या वेळीं, बहुतेक त्याची काळी छायाच आपण आपल्या चेहऱ्यावर पाडतो; नि तिच्याच पडछाया आपल्या भोंवतालच्या साऱ्यांच्या चेहऱ्यावर पाडण्याची, पडण्याची व पाहण्याची, कळत नकळत, आपल्या हातून, पराकाष्ठा होते !—

मला तर एकेकदां वाटतं, अश्लील वाङ्मयाचे ठराव नि दारुबंदीचे कायदे, हे याच मनोवृत्तीच्या गोंधळांतून बाहेर पडतात. समाजाला ते एका दृष्टीनें हितकारक असतील; पण, त्यापेक्षां, अनेक दृष्टीनें ते उपद्रवकारकच जास्त होतात ! तर मग, त्याऐवजी श्लील वाङ्मयाची अधिक जागरूक जोपासना झाली, त्यालाच जास्त उत्तेजन मिळालं, तर ? दारूनें न ग्रासलेले शेंकडा ऐंशी संसार आहेत. तेच अधिक सुखी करण्याचे प्रयत्न झाले तर ?—अपेक्षिलेले अंतिम सामाजिक यश, यांतूनच, कंकणभर तरी अधिक नि क्षणभर तरी अधिक लवकर हस्तगत होईल ! नाहीं का ?

याच व्यापक जाणीवेमुळें, नेहमी एक गोष्ट सर्वांनीच न चुकतां करावी, असं मला वाटतं. ती तशी आहे साधीच ! तरी पण—मला मात्र, ती अजूनहि सातत्यानें जमलेलीहि नाहीं.

म्हणजे मला असं वाटतं, कीं, जिथं, कोणाचंहि कोणत्याहि बाबतींतलं डोळ्यांत भरणारं यश आपल्याला दिसेल, लहान मोठा गुण आढळेल, तिथं तिथं, मग ती व्यक्ति ओळखीची असो वा अनोळखी असो–क्षणाचाहि विलंब न करतां, आपण एक त्याबाबतचं तीन पैशांचं पोस्टकार्ड पाठवून द्यावं ! आपला आनंद, आपल्या मनाचं कौतुक, तत्काळ, त्या व्यक्तीला, सरळ सरळ कळवून टाकावं ! दोन पैसे टाकून पानपट्टी तोंडांत टाकण्यापेक्षां, दोन–तीन पैसे टाकून असं हें कार्ड वेळींच पोस्टांत टाकण्याचं व्यसनच...प्रत्येकानें स्वतःला लावून घ्यावं !–

आवडते का ही माझी कल्पना तुम्हांला ?—

आधीं तो योग्यवेळीं योग्य उत्तेजनाचा शब्द ! तो पुन्हां अनपेक्षित ठिकाणाहून नि अनपेक्षितपणेंच आलेला;–म्हणजे, जणूं देवदूत होऊन, आपल्या मनाच्या दारीं एकदमच तो अवतीर्ण झालेला ! तेव्हां, त्याचा प्रभाव खासच शतगुणित होईल; त्यामुळें, आपण सारेच्या सारे, तसे वारंवार खरेखुरे सुखी होत जाऊं !

आणखीहि थोडा मूर्खपणा पदरीं पाडून घ्यायची, इथं मला इच्छा होत आहे. आमच्या साऱ्या नेत्यांना, जगांतल्या मुत्सद्यांनाहि–मला इथं एक संदेश द्यावासा वाटतो आहे. या राष्ट्रा–राष्ट्रांच्या मुत्सद्यांनीं देखील, एक गोष्ट न चुकतां करावी; त्यांनीं एकमेकांना, कधींहि, परस्परांच्या यशाबद्दल, गुणांबद्दलच तेवढे खलिते पाठवावेत. तशी आजच्या आज, आपल्या मनच्या ईश्वराला साक्ष ठेवून, शपथच घेऊन टाकावी !...

काय बहार होईल तसं झालं तर ?...

अर्थात्च, मग शब्दानें शब्द, गैरसमजानं गैरसमज, ‘ पोलादी ’ पडद्यांतून ‘ बांबूचे ’ पडदे, ॲटमनें हायड्रोजन, विकोपानें प्रकोप, नि दुसऱ्या महायुद्धांतून तिसरं प्रलययुद्ध–असले मानवी जीवनाचे, समाजाचे, एका लांबलचक अगतिक चांकोरींतले धिंडवडे तरी निघणार नाहींत ! चौफेर झकारण राख पसरण्याऐवजीं, मग, एकमेकांच्या बागांमधील सुगंधी फुलं, मोठ्या हक्कानें—



आपुलकीनेंच एकमेक तोडतील, आस्वादतील ! आपण केवळ ‘ मऊ मेंढरं ’ उरणार नाहीं !—प्रत्येक जण समाजाचा नेताच होईल—

आणि तेवढ्याचसाठीं, आपण सामान्यांनीं तरी, आतां आधीं चंग बांधला पाहिजे ! आपल्या रोजच्या व्यवहारांत, जीवनांत, ‘ योग्य वेळीं योग्य शब्द उच्चारण्याची’ साधी नैसर्गिक अशी रसिकता–माणुसकी अवतीर्ण झाली पाहिजे. आपण ती निश्चयानें व सातत्यानें आतां टिकवलीच पाहिजे ! मग, साऱ्या राष्ट्रांचे सारे नेते,..झकत नाक मुठींत धरून, आपल्या म्हणजे सामान्य जनतेच्या समोर येतील !

अर्थात्—तें तसलं असामान्य, नवं इहलोकचं अमृत आपल्या सर्वांच्या हातीं एकदां आलं, कीं, मग ?...

...मानव प्राणी मग अमर झाल्यावांचून राहील तरी कसा ?

●●●

# पैसे खाणाऱ्या प्राण्यांपासून सावध!

वास्तविक पैसा खाणं हा माणसाच्या जीवनांतला एक मोठा चमत्कार आहे. कांच खाणं, खिळे खाणं, साप खाणं, यांना आपण जादूचे नि अद्‌भुत प्रयोग म्हणतों ना ? मग पैसा खाणं हाहि एक चमत्कारच नाहीं का ठरत ? तेंहि वरल्या यादींत नाहीं का जमा होत ?

कारण, खाण्याच्या चिज़ा हस्तगत करण्याकरितां, पैशाची पदोपदीं आपल्याला जरूर पडत असली, तरी माणसानें (किंबहुना, कोणत्याहि जिवंत प्राण्यानें) खाण्यासारख्या ज्या चिजा आहेत, त्यांच्या यादींत पैसा कांहीं पडूं शकत नाहीं. इतकं असूनहि, चालू जमान्यांत, तसला एक अद्‌भुत चमत्कार, अनेक मानव भोंवतालच्या समाजांत सहजासहजीं करून दाखवूं शकतात. याचे पुरावे पदोपदीं कानीं पडतात; वृत्तपत्रांतून दृष्टोत्पत्तीस येतात; आपल्याला कित्येकदां ते अनुभवानें भासतात व भाजतात !

कोणी म्हणतात, 'पैसा खातां येतो; पण तो माणसाला अखेर पचत नाहीं!' लहान मुलं खेळतां खेळतां पैसा खायला लागलीं, तर आपल्याला भीतीच वाटते. त्या चिमुरड्याला तसा तो खाऊं नये, हें समजत नाहीं; हें जाणूनच आपण पटकन् त्याचा हात धरतों. पण एखादा मोठा, जाणता, सुशिक्षित, प्रतिष्ठित मनुष्य (सारं ठाऊक असूनहि) पैसा खात असतांना दिसला, तर मात्र



आपला कांहीं इलाजच नसतो. त्याचा हात धरण्याचं धाडस करण्याऐवजीं, हतबलपणें, आपणच आपले हात त्याच्यापुढें टेकतों !

पैसा खाल्ला तर तो पचत नाहीं, असं म्हणणारे म्हणोत बापडे. पण, पैसा खाऊन कोणी माणूस मेल्याचं अजून तरी माझ्या ऐकिवांत आलेलं नाहीं. पैसा खाऊन अपचन झाल्याची ओरड करणाराहि कोणी महाभाग अजून मला आढळलेला नाहीं.

शरीरानें अन्न खाल्लं नि तें आत्मसात् केलं नाहीं, कीं तें नबळं होतं. अपचन झालं नाहीं, तरी चरबी तरी खास वाढते. पैसा खाणाऱ्यांना अपचन होत नाहीं; पण पैसा खाऊन चरबी वाढल्याचीं अनेक उदाहरणं मात्र पाहायला मिळतात ! हीं चरबी वाढलेलीं माणसं आंतून कितीहि पोखरलेलीं असलीं, तरी ती चारचौघांत नि चारचौघांच्या डोळ्यांत निश्चित पटकन् भरतात. तेव्हां, सवंग प्रतिष्ठेच्याच मागें लागलेल्यांनीं पैसा वारंवार खावा; 'तो न पचण्यासारखा असतो,' असं लोक म्हणत असले, तरी तो अधाशीपणें खाण्याचा प्रयत्न करावा; यांत मला तरी कसलंच आश्चर्य वाटत नाहीं !

स्वतः माझं काय सांगावं ? स्वतःच्या नि घरच्या कच्च्या-बच्च्यांनीं खाण्यापिण्याच्या चिजा हस्तगत करण्यासाठीं लागणारा किमान पैसाच जिथं माझ्या हस्तगत होत नाहीं, तिथं तोच खाण्याचा कसला प्रश्नच कुठला उद्भवायला ? त्यामुळें, पैसाच काय, पण समोर असेल नसेल तें सारंच खाऊं कीं गिळूं, असं मला अहोरात्र होतं ! म्हणूनच, पैसा खाणं मला आजवर तरी शक्यच झालेलं नाहीं. दस गेले पांच उरले, म्हटल्यावर, आतां यापुढेंहि तें शक्य होईलसं वाटत नाहीं. त्यामुळें आज माझ्यांत व प्रतिष्ठेंत योजनेंच्या योजनं अंतर उरलं आहे. नि आतां तें तसंच यावच्चन्द्रदिवाकरौ राहणार, अशी माझी तरी बालंबाल खात्री झाली आहे.

खाण्याचा हा एक विशिष्ट प्रकार सोडला, तर मात्र, मला अनेक इतर गोष्टी खाव्याशा वाटतात, खातां येतात. त्यामुळेंच, क्वचित् शेंगदाणे, कधीं चणे, महिन्याच्या सुरवातीला बदाम बी, मनुका, पिस्ते, कुठें एक्स्ट्रॉ स्ट्रॉंगचं चिमुकल्या वड्यांचं पाकीट अशा (पैशा-दोन पैशांत, फारच तर आण्या-दोन

आण्यांत एकाच वेळीं घेतां येण्यासारख्या ) वस्तू मात्र माझ्या अंगरख्याच्या निरनिराळ्या खिशांत, इतर वस्तूबरोबरच पडलेल्या असतात. इतर कामांच्या वस्तूंसाठीं खिसे चांचपतांना, यांतलीच एखादी वस्तु माझ्या हाताला लागली, तर ती मी पटकन् तोंडांत टाकतों नि आपलं हातांतलं कामहि पुढें चालू करतों. किंवा... समोर एखादा चिमुकला रसिक दिसला, तर त्याच्या इवल्याशा हातांत ती ' जंमत ' कोंबून त्याची मूठ बंद करतों.

अशा दोन्ही वेळीं मला ब्रह्मानंद-सुखच लाभतं !

तेव्हां, अगदीं कांटेखोर शिस्तीचे, कठोर, सुतकी शिलेदार तुम्ही नसाल, तर माझं असलं ' खाणं ' तुमच्याहि विचाराच्या आटोक्यांतलंच असणार; हें ऐकून तुमच्याहि चेहऱ्यावर स्मिताची रेषाच झळकणार; किंबहुना, कधीं मला भेटलांत, तर ' काढा खिशांतली एक बदाम बी ' असंहि एका आसुसलेल्या मनानें, मिश्कीलपणें तुम्ही माझ्याकडे पुकारणार; निदान, माझ्या खिशांतल्या असल्या चिजा तरी तुम्हांला खासच निरुपद्रवी, अहिंसक, व्यक्तिगत वाटल्यावांचून राहणार नाहींत !

आजवर माझंहि अगदीं तेंच मत ठरलं असतं; तेंच होतं. पण आतां मात्र अगदीं याच क्षणीं तें साफ बदललं आहे ! कारण, कुठं तो हायड्रोजन बॉम्ब फुटण्याचा प्रयोग व्हावा नि कुठं जपानी मच्छीमार आपापल्याच मचव्यामधें मृत्यूच्या जबड्यांत पटापट पडावेत, तशीच या क्षणीं माझ्या इवल्याशा दुबळ्या जिवाची स्थिति झाली आहे.

तसं नसतं, तर बिनपैशांत मिळणारी सुखाची निद्रा टाकून, भररात्रीच्या ऐन दोन वाजतां, मी हें असलं ' अर्थ '-हीन कांहीं तरी लिहीत बसलों नसतों. भणभणणाऱ्या डोक्याला हें असलं 'अमृतांजन' चोळीत बसलों नसतों. मीं तर ठरवलंय्, आतां भांडवलशाहीवृत्तीचा संग्रह-परिग्रह टाकायचा; टाळायचा; खिशांत वस्तु सांठवण्याच्या वाटेलाहि जायचं नाहीं; त्याबाबत कानाला पक्का खडा लावायचा; किंबहुना, माझ्या पश्चात्तप्त मनाला याक्षणीं अगदीं आंतूनच वाटातंय्, कीं, शेंगदाणे, बदाम, पेपरमिंट इत्यादींपैकीं कांहींच खायचं नाहीं, अशी आमरण भीष्मप्रतिज्ञाच करून टाकायची.



आतां या माझ्या लिहिण्याचा तुम्हांला राग यायला लागला असेल. " हा ' पैसा खाण्या ' पासून सुरुवात काय करतो नि अखेर, चणेफुटाणे नि शेंगदाणे-पेपरमिंट खाण्या-न खाण्याचंच कसलं नसतं अवडंबर करीत बसालाय् हा ? " असं म्हणत, माझी तुम्ही ( ठाण्याचा असूनहि ) ठाण्यालाच रवानगी कराल. पण राव, जरा सबूर ! जावं त्याच्या वंशा, तेव्हां कळे ! तुम्हांला तो व्रण नाहीं, म्हणून माझ्या या भगभगणाऱ्या जखमेला हंसतांहां !

उंदरांची वाढ झपाट्यानें होते. कुठल्याहि, (विशेषतः मराठी) लेखकांच्या पुस्तकांचा स्टॉकसुद्धां झपाट्यानें वाढतो. त्या दोहोंचा येणारा संबंधहि फार निकटचा असतो. मुंबईतल्या अगदीं नव्या सिमेंटच्या इमारतींमध्येंहि या आमच्या गांवमामांचं सुखेनैव वास्तव्य होत असतं. या तीन गोष्टींचं तुम्हांला ज्ञान आहे का ? नसेलहि कदाचित्.

या ज्ञानाशीं माझा मात्र फार घनिष्ठ संबंध आहे.

' कॉमनसेन्स ' म्हणून ' रॅट् गॉन ' करून पाहिला. चाप-सांपळ्यांच्या पळवाटा घरांत आणून झाल्या. वर्षानुवर्षे जाहिराती नि प्रत्यक्ष अनुभव यांचं समव्यस्त त्रैराशिक मांडून पाहिलं. बायकोचा पाय काळोखांत दात्यांच्या चापांत सांपडून ती ओरडली, तेव्हां ती ' विजयाबद्दलची घोषणाच ' असा गैरसमज करून घेतला मीं ! बँडेज बांधलेल्या पायानें मोठ्या चिकाटीनें नि सहिष्णुतेनें तिनें मुंग्या-झुरळांवर गॅलनावारी डी. डी. टी. चे फवारेहि उडवले त्यानंतर.

आतां मात्र मला समर्थांचा दासबोध पचूं लागला आहे—' उंदीर म्हणतो माझें घर—माणूस म्हणतो माझें घर ! ' त्या समर्पक वृत्तीच्या प्रेरणेनेंच, अलीकडे जेव्हां जेव्हां मला हा प्रश्न पडला, तेव्हां मीं मनाला समजावीत आणलंय्, " हा प्रश्न कशाला ? घर आपलं सर्वांचंच ! "

मला ही नवी दृष्टि प्राप्त व्हायला, तशीं कारणं बरींच झालीं आहेत. कायदा गाढव असेल; पण तो शहाण्या माणसाला वेडा करून टाकतो. नवंजुनं कोणत्याहि स्वरूपाचं स्वतःच्या मालकीचं घर असो, आंतल्या जागेवरील आपला ताबा त्या घराच्या मालकीवर मुळींच अवलंबून नसतो. तेव्हां, हल्लीं

तरी, मिळेल तें भाड्याचं-पागडीचं घर आपलंच असतं. असेल तेवढीच जागा आपली असते. जिवंत माणसांनाच जिथं ऐसपैस जागेची टंचाई, तिथं निर्जीव पुस्तकांना कुठली जागा मिळायला ? आणि रसिकांच्या घरोघरीं नव-प्रकाशित पुस्तकांना वेळींच जागा मिळालेली नसली—तशी ती बहुधा मिळालेली नसतेच —तर त्या साऱ्यांना आपल्या जनकाच्या डोक्यावर बसण्याचा ' जन्मसिद्ध ' हक्क प्राप्त असतोच ना ? तेव्हां सजीव-निर्जीव यांना गुण्यागोविंदानें एकत्र दाटीवाटीनें राहणं भागच होतं, या मुंबईंत !

मुंबईंतला सुतार हा प्राणी म्हणजे त्या मूळ विश्वामित्राचाच एक आधुनिक अवतार असतो. आपल्या घडीच्या फूटपट्टीच्या आडव्या-उभ्या मोजणी-मापणींत तो केवळ एका खोलींत चार खोल्या नि ' शून्य बायू शून्यां ' त शंभर स्क्वेअर फूट,...अशी न्यारी प्रतिसृष्टि उभी करून देऊं शकतो ! त्याच्या त्या गुरुकिल्लीनें एकदां तें नवं विश्व तसं खुलं झालं, कीं माणसाच्या राहायच्या जागेंत, पुस्तकांना नि त्या अनुषंगानें मुंग्या, झुरळं, उंदीर, पाली, चिमण्या, कबुतरं, इत्यादि सर्वांनाच ( पागडी-भाड्याशिवाय ) ऐसपैस जागा मिळायला तो कितीसा उशीर ?

त्यांतून उद्भूत होणाऱ्या अतिक्रमणांमधून सशस्त्र व रासायनिक युद्धाला तोंड फुटतं खरं; पण अखेर, मानवच त्यांत हार जातो; अगदीं गलितगात्र, निपचित पडतो. साऱ्या धूर-फवारे-पावडरींनीं, त्यांच्याऐवजीं हाच अधिक गुदमरतो; याचाच जीव कासावीस, अर्धमेला होतो ! नि मग, अर्थात् त्याच्या निश्चेष्ट अंगावरून, तीं सारीं मात्र सुखासमाधानानें नि राजरोसच फिरूं लागतात !

तथापि, परिस्थितीशीं एकरूप कसं व्हायचं, तिच्यांत स्वतःला शक्य तों सामावून कसं घ्यायचं, ही विद्या, हें सामर्थ्य, मानवालाच जगांत जास्तींत जास्त अवगत आहे, असा माझ्या अनुभवावरून मला तरी पुरा विश्वास वाटतो. मी तसं प्रत्यक्ष कृतींत आणणारा, त्या महान् तत्त्वाचा उपासकच आहे.

एखादी पाल भिंतीवर वळवळतांना कधीं दिसली तर माझ्या बायकोला अगदीं किळस वाटते. तिला मारण्याची किंवा मारूं देण्याची मात्र पूर्वपरंपरेनु-



सार बाईंना छाती होत नाहीं. पण, अशा वेळीं मी निर्णय देतों.—" मुंबईंत शेजाऱ्यापाजाऱ्यांवर असतं का आपलं कसलं नियंत्रण ? तिथं म्हणतां येतं का, हे हवेत, ते नकोत ? मग हिचं, या पालीचं काय एवढं ? तिलाहि हक्क आहे स्वैरसंचाराचा ! हवं तर तुझी झाकपाक नीट कर. नि जुनाट शकुन-अपशकुन दे सोडून आतां...बस्स झालं ! "

झुरळांना माझ्या मुली घाबरतात. त्यांनाहि मी म्हणतों, " कुठं रे जाणार तीं बापडीं ? घाबरायचं काय त्यांत ? सगळ्यांनाच जगायचा हक्क आहे ! "

असा प्रत्येकाबद्दलचा माझा एक व्यापक दृष्टिकोन होत चालल्यायू. कबुतरं माझ्या गॅलरींत घुमतात; चिमण्या सांदीफटींत घरटीं बांधतात. उंदरांना तर मीं ठिकठिकाणीं पुस्तकांचीं सुटीं उघडीं बंडलं खायला विखरून ठेवलीं आहेत. मी म्हणतों, ' खाऊन खाऊन दहा पुस्तकं खातील बापडे ! उरलेलीं नव्वद तर सुरक्षित राहतील ! '

पण इतकं असूनहि आजचा तो प्रसंग मजवर ओढवलाच ! मला जगांत अशक्य वाटत होतं तेंच घडलंयू !

त्याचं असं झालं—

पुस्तकं माझीं असलीं तरी तीं मला खातां येत नाहींत. तीं विकून त्यांचा मला पैसा करावा लागतोच. तसा तो पैसाहि खातां येत नाहीं. त्याच्या वस्तु' कराव्या लागतात. ' पुस्तकांचा पैसा करणं ' ही गोष्ट ' पैशांचीं पुस्तकं करणं' या गोष्टीइतकी खासच सोपी नसते. हजार खेटे, हजार तडजोडी, हजार वायदे, यांची परंपरा लागते; तेव्हां कुठं एखादा शेंकडा हातीं पडायचा.

असेच दोन शेंकडे मीं गोळा करून, त्यांच्या दोन बंद्या नोटा करून माझ्या खिशांत ठेवल्या होत्या. हेतु हा, कीं, फुगीर खिसा कापण्याचा कोणाला मोह होऊं नये. आपल्या किंवा बायकोच्या हातूनहि ( जुडगा दिसतो म्हणून ) गावगा खर्च होऊं नये.

नेहमींप्रमाणें, अगदीं सुरक्षित म्हणून, झब्ब्याच्या आंतल्या खिशांत त्या मीं ठेवल्या होत्या. वरच्या खिशांत इतर अनेक वस्तु होत्या. चोरालाच काय,

माझी मीच मुद्दाम आठवण, केल्याशिवाय मलाहि त्यांचा पत्ता लागला नसता.

तसा वणवणून, जरा उशिरांच, अकराला मी घरीं परतलों होतों. चार घांस जेवलों होतों नि झब्बा हँगरवर लटकवून उशाशीं लावला होता. दुसऱ्या मजल्यावरील, आंतून कुलूप केलेली माझी जागा ! माझ्यापुरती तरी मला ती पूर्ण सुरक्षित होती. मी निश्चिंत मनानें वाचत कॉटवर पडलों होतों नि पडल्या पडल्याच, दिवा विझवून झोपीं गेलों होतों. श्रमानंतरच्या प्राप्तीच्या समाधानाचं विरल आच्छादन झोपेपूर्वी माझ्या मनावर पडलं होतं !

पण थोड्याच वेळानें, प्रथम चूंचूं ऐकूं आलं; सळसळ कानीं पडली; अर्धवट जागेपणीं माझे कान टवकारले गेले; पडल्या पडल्याच, काळोखांतच डोळे फिरूं लागले....

माझा झब्बा हलत होता; जोरांत चिवचिवाट चालूच होता; खसखस-खुसखुस स्पष्ट ऐकूं येत होती; कातर चालल्यासारखी 'करकर' हि कानीं पडत होती.

अर्ध्या जागेपणीं अनुभवीत असलेला तो मिनिट-दीड मिनिटांचाच सारा भेसूर खेळ होता. शेवटीं, दचकूनच मी पुरा भानावर आलों. वस्तुस्थितीची जाणीव होऊन, मीं ताडकन् कॉटवरून उडी मारली. प्रथम दिव्याचं बटन दाबलं नि चक्क पडलेल्या प्रकाशांत उशाजवळच्या माझ्या झब्ब्याकडे धाव ठोकली.

त्याच क्षणीं, आंतल्या बाजूनें त्या अंगरख्याच्या झोळांतून, सर्रर करीत, खालीं उतरून 'मामां' नीं माझ्या डोळ्यांदेखत जमिनीवर 'धव्व्'कन् उडी ठोकली नि शेपटी उंचावत तुरतुरून, माझ्या डोक्यावरला माळा गांठला.

चमकूनच माझं लक्ष फिरून झब्ब्याकडे गेलं. त्या 'गुल्' झालेल्या मूषकराजांच्या धक्क्यानें अजूनहि हँगरवर तो डुलत होता. बाहेरून तसा त्याच्यांत कसलाहि फरक दिसत नव्हता. पण तरीहि मला एक संशय आला; दोन पावलांतच मी पुढं झालों; हात उंचावून मीं तो खालीं काढला;



लावलेलीं बटनं घाईघाईनें काज्यांमधून झटकन् सोडवलीं; नि तो वरखालीं करून पाहिला !

क्षणार्धांत, माझ्या डोळ्यांपुढें अक्षरशः काजवे चमकले !

वरच्या पेनच्या खिशाखालच्या आंतल्या खिशांतच मीं त्या नोटा ठेवल्या होत्या. वरला खिसा जशाचा तसा; त्यांतल्या घाईत टाकलेल्या पेपरमिंटच्या दोन छोट्यावड्या देखील जशाच्या तशा ! पण त्यांच्या वासावरच त्या प्राण्यानें आपल्या तीक्ष्ण दातांनीं भरपूर मोठी कलाकुसर केली होती ! नि त्यांतूनच हिरव्या रंगाचा कागद मला दिसूं लागला होता !

अत्यंत दुःखद मनानें मीं त्या घड्या बाहेर काढल्या...त्या उलगडल्या. त्यांना सहस्र भोकं पडलीं होतीं. त्यांची चाळण–अक्षरशः चाळण–झाली होती. कांहीं हिरवा भुगा खालीं फरशीवरहि पडला होता.

मी मटकन् खालींच बसलों. काय बोलावं, काय करावं, तेंच समजत नव्हतं.

त्यांनाहि माझीं पुस्तकं नको होतीं. पुस्तकांचे मीं प्रयास-धडपडींनीं केलेले पैसे मात्र खायला हवे होते !

त्या साऱ्या गडबडीनें सौ. जागी झाली होती. तिनें उठून विचारलं, "कोण हो ? काय हो झालं ? गडबड कसली ?"

मीं दीर्घ निःश्वास टाकून, शक्य तितक्या खेळकरपणें झाल्या प्रसंगाकडे पाहण्याचा प्रयत्न केला; नि म्हणालों, "होणार ग काय ? दैवदुर्विलास ! दुसरं काय ? त्यांनाहिं पुस्तकं नकोत ! पेपरमिंट नको ! पैसे खायला हवे होते ! गडबड हीच, पैसे खायची !"

"कोणाला म्हणतांयू ? ते कोण ?" तिनें गोंधळून विचारलं, "कोणीं खाल्ले पैसे ? कधीं ?"

"हे प्राणी !" मी खिन्न हंसत म्हणालों, "सारेच प्राणी ! त्यांनींच खाल्ले माझे पैसे ! हे आत्तांच खाल्ले ! ही माणसाची दाट संगत, बरं ! आतां हा जमानाच बदलत चालला ! साफ बदलला ! माणसंच नव्हेत, हे उंदरां-

सारखे प्राणी देखील, खाण्यासारखं इतर सारं सोडून, पैसेच खायला लागले आहेत ! अगदीं उघड उघड, डोळ्यादेखतच पैसे खायला लागले आहेत ! ”

दोनशें रुपयांचा तो प्रत्यक्ष दुःखद अनुभव घेतल्यावर, मला असं कां वाटणार नाहीं ? मला हें सारं सारं असंच कां सुचणार नाहीं ?

पण त्यानंतरचं एक आणखी सांगायचं अजून उरलंय्—

दरम्यान, हें सारं सांगायला घेण्यापूर्वी, इतक्या दिवसांचं ‘ जगा नि जागूं द्या ’ हें माझं प्यारं तत्त्व विरून गेलंय्. ‘ स्वतः जगायचं असलं तर असल्या पैसे खाणाऱ्या प्राण्यांना तरी जगूं देण्यांत मुळींच अर्थ नाहीं ’ असं आम्हां दोघांनाहि आतां पुरं पटलंय्. आमच्यांतली अहिंसा–सहिष्णुता पार ओसरली आहे. आमच्या कर्तृत्वाला आतां एक नवा वाव मिळाला आहे. साऱ्या शक्ति एकवटून आम्हीं आतां एक नवी मोहीम काढली आहे नि हिरीरीनें ती राबवायला ‘ शुभस्य शीघ्रम् ’ प्रारंभहि केला आहे.

थोड्याच वेळापूर्वीं अगदीं राजरोसपणें माझे पैसे खाणारा तो प्राणी ! आतां आमच्यासमोर तो कायमचा लंबे होऊन पडला आहे. त्याला तरी त्याचं तें पैसे खाणं पचलेलं नाहीं. आम्हीं त्याचा पुरा पिच्छा पुरवला !

बाहेरील अफाट मानवी जगांत काय परिस्थिति असेल ती असो, आमच्या राज्यांतल्या या नव्या जमान्यांत तरी, असला पैसे खाणारा कोणी प्राणी आतां टिकणार नाहीं, टिकूं नये, असा आम्हीं अगदीं ‘ पण ’ केला आहे–विडाच उचलला आहे ! कायद्यावर नि सरकारवर आम्ही आतां मुळींच विसंबून नाहीं.

तेव्हां, आम्ही जिवंत आहों तोंवर, आमच्या राज्यांत तरी ‘ पैसे खाणारा ’ कोणी प्राणी निश्चित टिकणार नाहीं, अशी आमच्या वतीनें तरी आम्ही सर्वांना ही जाहीर हमी देत आहों !



नि तुम्हीहि, आपापल्या छोट्या छोट्या राज्यांत, चिमुकल्या जगांत, ‘ पैसे खाणारा प्राणी ’ एकहि कोणी उरणार नाहीं, अशी परिस्थिति निर्माण करण्याचा स्वतःच ‘पण’ करा ! तसा चंगच बांधा ! मग तो केवढ्या का उंचीवर बसलेला असेना ! कोणाच्या का गादीवर मिरवत असेना !

मग याउप्पर, इतर जगाला काय करायचं असेल, त्याचं काय व्हायचं असेल, तें होईना का बापडं !

तुम्हांला आम्हांला ना खेद ना खंत !

• • •

# एक न्यारी सुपारी !—

जरा कडवट पण एक न्यारी सुपारीच खायला देणार आहे मी आज तुम्हांला !–पण तत्पूर्वी जरा माझ्या घराकडे वळायला हवंय् तुम्ही—

कधीं माझ्या ब्लॉकसमोर कोण उभा राहिला तर त्याला दारापाशीं कुठं विजेरी घंटेचं बटन दिसणार नाहीं. बधिरपणाचं व्यंग असलेलीं किंवा अगदीं वृद्ध पिढींतलीं कोणीं माणसं माझ्या घरांत नाहींत. शिवाय आमच्या स्वयंपाक-खोलीचा चुलीज़वळचा कोपरा काय, कीं न्हाणीघर काय, सरळ रेषेंत मोजलं तर पुढल्या दारापासून फारच तर अठरावीस फुटांवर असेल, जेमतेम !

तेव्हां, विजेरी घंटानादाची आधीं ती तसली शान नको; तें यांत्रिक ‘ कंत्राट ’ वारंवार दुरुस्त करणाऱ्याची उगीच त्यापुढली ती धन नको; नि शेजारपाजारच्या पोरांकरवीं, वेळींअवेळीं होणाऱ्या उपद्रवाची डोकेंदुखी निर्माण करणारी घरांत नसती घणघणहि नको; अशा एकूण दूरदृष्टीनेंच, तसलं विकतचं श्राद्ध मुळांत दारांतून आंत मी घेतलेलंच नाहीं. त्यामुळें, अर्थात्, कोणा परकी येणाऱ्या-जाणाऱ्याच्या आगमनाचा पुकार करण्याचा सारा भरिभार, माझ्या पुढल्या दाराच्या बाहेरच्या पितळी कडीवरच आपोआप जाऊन पडलेला आहे ! त्याला माझा इलाज नाहीं; कारण, तें सकारण आहे.



( चालू जमान्याला धरून, आपल्या पोटांत पुष्टाच वागवीत असलं, तरी...माझ्या मात्र प्रत्यक्ष खर्चीं पडलेल्या नगद पैशाच्या व विश्वासाच्या जोरावरच, माझ्या घरामध्यें पदार्पण केलेलं,...) माझं एक कोरंकरकरीत पादत्राण, मागें एकदां हातोहात लंबे झालं आहे ! त्याच सुमारास, ( गळकेपणा अजून राजरोस तरी सिद्ध न झालेलं, पाण्याचा वाससुद्धां न लागलेलं, आपल्या आठीच्या आठी बरगड्या ठिकाणावर संभाळून असलेलं, फीत-गोंडा दिमाखानें मिरवीत असलेलं, ) माझं एक नवंकोरं छत्रहि, कोणा तरी अज्ञात महाभागानें बेमालुमपणें आत्मसात् करून टाकलं आहे.

या दोन्ही घटना, माझ्यामतें, आमच्या पुढल्या दाराशेजारच्या ऐसपैस पॅसेजच्या मध्यस्तीनेंच सुरळीत पार पडल्या होत्या; नि म्हणूनच, त्या वस्तू कोणाच्या तरी ‘ हातीं-पायीं ’ पडून, राजरोसच माझ्या घराबाहेर पडल्या !

युद्धाप्रमाणेंच, कोणत्याहि गोष्टीला एक तात्कालिक कारण लागतंच ना ? तेव्हां म्हणूनच, या घटनांच्या तसल्या आपादमस्तक अनुभवानंतर, माझ्या पुढल्या दाराला मी अहोरात्र आंतून कडी घालण्याचं फर्मान काढलं. अर्थात्, घरांतल्या सर्वांनाच तें व्रत मी घ्यायला लावलं ! मात्र, तेव्हांपासून, स्वतः घरीं असतांना, बहुधा, मलाच जागरूकपणें उठून ती कडी लावावी–उघडावी लागते. ( स्वतः मेल्याशिवाय कधीं कोणाला समाधानाचा स्वर्ग दिसतो थोडाच ? )

( पण मग, मुंबईतल्या मुंबईत, तेवढाच आपला आपल्याला हमखास नियमित व्यायाम तरी घडतो; त्यानें प्रकृतिहि बरी राहायला बरं पडतं; हा त्यांतून मला होणारा आनुषंगिक फायदा माझ्या दृष्टिआड करणं मात्र, मला योग्य वाटत नाहीं. )

तथापि, नाही तरी, उघड्या किंवा बंद दारांतून, ( जातीनें किंवा हातानें ) शिरून, असली कुशल कारवाई करणारीं ती चलाख मंडळी सोडली, तर माझ्या दारांत मुद्दाम उपस्थित वा प्रविष्ट होणारीं तशीं माणसं आहेत तरी कोण दुसरीं ?

त्याचं असं आहे, कीं, कुठल्याहि बाबतींत; जगांत नेहमीं देवाण-घेवाण लागते. आपलं जाणं घडतं, त्याप्रमाणांतच इतरांचं आपल्याकडे येणं घडतं.

तुमच्या दंतपक्ति दिसण्यावरच लोकांचं स्मितहास्य बरंचसं अवलंबून असतं. दिसणाऱ्या तुमच्या दंतपंक्ति खऱ्या कीं खोट्या, त्यांच्यामागील सुप्त भाव खरा कीं खोटा, हा तिथला महत्त्वाचा मुद्दाच नसतो. म्हणूनच, वेळच्या वेळीं, (किंबहुना, अवेळींहि,) त्या प्रकट व्हाव्याच लागतात. कारण, तें हुकलं, कीं पुढलं सारंच हुकतं !—

शिवाय, चालू जमाना हा प्रदर्शनोत्सुकांचा, समारंभप्रियांचाच आहे !— औपचारिक भेटी–प्रतिभेटींचा आहे; फुसक्या पारितोषिकांचा (रंगीबेरंगी फलकलेखनाकरवीं) नाक्या–चव्हाट्यावर आरास करण्याचा आहे.

याबाबतींत, राजकारणसमाजकारणाचाच प्रांत कशाला, शाळा-कॉलेजादि सोवळ्या ठरणाऱ्या शिक्षणक्षेत्रांतदेखील तेंच ! (मूळ उच्च तत्त्वांचीं मढीं आंत बसवलेले) लहानमोठे शृंगारलेले ताबूतच मिरवण्याचे नि त्याभोंवतीं पुन्हां उच्च तत्त्वांचा 'हायदोस दुल्ला' करीत नाचण्याचेच हे दिवस आहेत. त्यामुळें, त्यांचंच लोण आतां पुढं खाजगी प्रांतापर्यंतहि येऊन पोहोंचावं, यांत आश्चर्य तें कसलं ? तिथं तर, गोळा होणाऱ्या अहेराच्या लांबलचक व तपशीलवार यादीचा, (मायक्रोफोन-लाऊडस्पीकरांमधून, हॉलभर) तत्काळ विद्युत्-पुकार करण्याचाच हा चालू काळ आहे !

तेव्हां, अशा एखाद्या मंगल समारंभस्थळीं आधीं उपस्थित रहायचं नि मग, ऐन वेळीं, 'त्या' यादींत आपल्या नांवाचा समावेश नसायचा, म्हणजे हात दाखवून केलेलं एक अवलक्षणच !—तसलं वर्तन, म्हणजे आपला तो अक्षम्य गुन्हाच ठरायचा !—एवढ्यासाठींच, आपल्या मनोमन अदृश्य स्नेहप्रेमाचा दृश्य पुरावा, आधींपासूनच आपल्या खिशांतहि 'राखीव' असावा लागतो. त्यासाठीं सरकारी सवंग टांकसाळीचाच आसरा घेण्यावांचून आपल्याला गत्यंतर नसतं. पण, (रुपयाखालच्या किंमतीची छपाई तिथं अजून होत नसल्यामुळें व चलनी 'न–पैसे'हि अली अलीकडे, बघतां बघतां एकदम अदृश्य होणारे झालेले असल्यामुळें,) या सुहृद्भावाचा आपल्या खिशांतला दृश्य पुरावा, चालू घडीला तरी, किमान एका 'तांबड्या नोटी'वरच आतां स्थिर झालेला आहे !...तिच्यावर पांढऱ्या पाकिटाचं एकदां आवरण–वेष्टन चढलं, कीं, तीच झांकली नोट सव्वा लाखाची होत असते !



तें तेवढं आपल्यापाशीं सिद्ध असलं, कीं मग मात्र, चार चौघांत आपल्याला कधीं खालीं पाहावं लागत नाहीं. त्या जोरावर, अगदीं हक्कानेंच, (पांच आण्याचं गोल्ड स्पॉट–गवती नळींतून चाखत चाखत, घोटा-घोटानें घशाखालीं उतरवून) आपल्या मुलाबाळांसकट, आपला आत्मा आपल्याला थंडगार करतां येतो. शिवाय, (सहकुटुंब होणाऱ्या आपल्याच बस-प्रवास खर्चानें) पुढल्या दोन चार दिवसांतील गृहसंसारराज्यांतील आपली 'नारळी गरज' परस्पर भागण्याचाहि त्यांत मोका साधला जाण्याची शक्यता असते !–उपस्थितांची भाऊगर्दी व गोंधळ यांनींच संतुष्ट झालेल्या आपल्या तिथल्या अहंगंडी यजमानांनाहि, ती तसली देवाण-घेवाण एकूण फारशी महागांत पडत नसते. ठायीं ठायीं, ज्याचा-त्याचा स्वतःचा हिशेब हा असायचाच !—

पण मग, जग ही एक भली मोठी व्यापारपेठच आहे !...तिथं असा स्नेहप्रेमाचाहि सौदा व्हावा व व्हावाच लागतो; यांत आश्चर्य तें कसलं ? आपल्यालाहि त्यांत (गुण्यागोविंदानें, किमान प्रतिष्ठेनें) राहावयाचं असेल, तर सारे व्यवहार, साऱ्या नव्या-जुन्या परंपरा, चारचौवे संभाळतात ते सारे उपचार, सारं सारं, आपल्यालाहि संभाळावं हें लागतंच !

तिथं माझ्यासारखी वेडी अळंटळं काय कामाची ? जळांत राहून माशाशीं वैर ?

माझ्या कसल्या कामासाठीं, आपल्याच तंद्रीमध्यें, त्या दिवशीं सकाळीं मी रस्त्यानें जात असतांना, माझे एक फार जुने परिचित गृहस्थ माझ्यासमोर अकस्मात् दत्त म्हणून उभे राहिले. तेव्हां, किंचित् दचकूनच नि मला नकळतच, मी माझ्या खोट्या दंतपंक्ति त्यांना दाखवल्या.

माझ्या माहितीप्रमाणें, त्यांचा पोषाख नेहमींच अपटुडेट असायचा. पण आज तर त्यांत विशेषच 'झॅक्' होती. त्यावरून व त्यांपूर्वीच उडत उडत माझ्या कानांवर आलेल्या बातमीवरून, मी तत्काळ ताडलं, कीं, आपल्या मुलाच्या लग्नाच्याच आमंत्रणासाठीं, (कुठूनं तरी, कुठं तरी) ते निघाले असावेत.

तेंवढ्यांत, अगदीं समोरासमोरच आमचा अभावित सामना झाल्यामुळें, हसून, माझा हात दाबून, ते मला म्हणाले—"दुपारीं आमंत्रणाला तुमच्या-कडे यायचं ठरलंच होतं आमचं! असाल ना घरीं? परवांच्या गुरुवारीं, लग्न आहे आमच्या मनोहरचं, लक्ष्मीबागेंत, गोरज मुहूर्तावर..."

त्यांचा मनोहर बारा वर्षांचा असतांना मी त्याला पाहिला होता. नि या राजश्रींचीहि गेल्या बारा वर्षांमधें, अशीच कधींमधीं अचानक, जातां येतां, रस्त्यांतच तीनचारदां गांठभेट झाली होती. भेटल्यानंतरहि औपचारिक चार दोन प्रश्नोत्तरांहून अधिक कांहींच घडलं नव्हतं. आमचे दोघांचे दोन जीवन-प्रवाह, दुरून दुरून, निरनिराळे व स्वतंत्रपणें, समांतर वहात गेले होते, एवढंच. माझीं दुःखं, त्यांचीं सुखं, ज्याचीं त्यानें, स्वतंत्रपणें भोगलीं-उपभोगलीं होतीं.

तेव्हां, वास्तविक, आजच्या त्यांच्या आमंत्रणाच्या यादींत माझं नांव असण्याचं तसं कांहींच कारण नव्हतं; हें समजुतदारपणें जाणण्याइतकी किमान बुरणुस-बुद्धि तरी मला होती. नि ते बोलत होते त्यांतहि औपचारिकपणाचा अंशच अधिक होता, हेंहि, निदान मी तरी पूर्ण जाणत होतों. (हें सर्व कदाचित्, तेहि जाणत असावेत.)

तरी देखील, त्याच संसर्गानें, मीहि तोंडभर स्मित करून म्हणालों—"वाः वाः! छान हं...आलंच पाहिजे लग्नाला! पोंचलं बरं तुमचं आमंत्रण..."

"वाः! म्हणजे?...तें कसं चालेल? चार साडेचारला येतोंच कीं, दुपारीं, घरीं! तिथंच, पूर्वीच्याच ठिकाणीं, ना?—सारं कसं साग्रसंगीत झालं पाहिजे! नाहीं तर, तुम्ही आपले म्हणायचेत्...आपलं ऽ हें ऽ!—हं...वहिनी असतील ना घरीं?" पुढें जायला वळत ते म्हणाले.

"नाहीं! ती तर गेलीय्...पोरांना घेऊन, माझ्या बहिणीकडे;... तुमच्या घाईगडबडींत मुद्दाम हो कशाला तुम्हांला नसती तसदी ही?" तोंडांतल्या तोंडांतच म्हणालों होतों मी!—

"अहंऽ! तें नाहीं हं मुळींच जमायचं; घरपोंच पद्धतशीर आमंत्रणच



दिलं पाहिजे तुम्हांला! बरं ऽ... एकटाच येतों तर मग...पांचाच्या बेतानें! अं? अच्छाऽ..." हसून चालू लागत ते म्हणाले.

"या ऽ या ऽ जरूर! मी असणारच घरीं." मीहि हें एकदम म्हणालों खरं; पण त्यांत खरा जीव नव्हता.

तथापि, आतां ठरल्याप्रमाणें सर्व घडायला, मला माझा दरम्यानचा पुढला सारा ठरला कार्यक्रम बदलणं भागच होतं. घरांत आपण एकटेच असतांना, घरीं परतण्याच्या बाबतींत आपोआपच अंगीं येतो त्या एकलकोंड्या ऐसपैसपणाला, ओघानेंच मला आळा घालणं आतां प्राप्तच होतं. दरम्यानचीं मी आगाऊ ठरवलेलीं चार महत्त्वाचीं कामं घाईघाईनें संपवून, वेळेवर घरीं असण्याचं मुद्दाम जमवणं, हेंहि माझं आतां प्राप्त कर्तव्यच ठरत होतं!—

कसंबसं, चाडेचारला का होईना, दादर गाठल्यावर मात्र, आमंत्रणाला माझ्या घरीं येणाऱ्या त्या पाहुण्यांच्या आदरातिथ्याच्या मानसिक तयारीची मनोमन धावाधाव, माझ्या मनानें सुरू केली.

लहानपणापासून रुळलेल्या माझ्या सनातनी दुबळ्या मनांत आलं—"कित्येक वर्षांनी, शुभकार्याच्या हेतूनें, हे गृहस्थ आपल्या घरीं आमंत्रणाला येणार! योगायोगानें, आज आपल्या घराला घरपणाहि नाहीं. तरी पण,—स्वतः आपणच धडपड करून, रीतीरूढीप्रमाणें, त्यांच्या शुभभावना जोंबाळल्या पाहिजेत. पुरुषाची नि गृहिणीची अशा दोन्ही भूमिका, आपल्या आपणच आतां वठवल्या पाहिजेत."

सद्गृहस्थ सपत्नीक येणार नव्हते व आमच्याहि सौ. घरीं नव्हत्या; तेव्हां खणा-नारळाच्या ओटीचा तो प्रश्नच उरत नव्हता. शुभफळ नारळ त्यांच्या हातीं देणं आवश्यक होतं, हें खरं;...पण हल्लीं बहुतेक जण दिलेला नारळ ठेवूनच जातात, याचा प्रत्यक्षाप्रत्यक्ष पूर्वानुभव असल्यामुळें व तसा या गुरूंनीहि तो ठेवला, तर (सध्यां चूल चालू नसलेल्या माझ्या घरांतील जमान्यामधें) तो नाहकच पडून-नासून जायचा, हें माझ्या लक्षांत आलं. अर्थात्, सर्व सोयी जमेस धरून, पांच आण्याच्या ऐवजीं एकदीड आण्याच्या दुसऱ्या एका शुभफळावर—सुपारीवरच—माझी दृष्टि मी केन्द्रित केली.

आपल्या अळवाच्या खाजीप्रमाणें, मिनिटामिनिटाला भडका उडवणाऱ्या आपल्या ' सायलेन्सर स्टोव्ह'ची, नित्य परिचयानें पुरी जानपछान असल्यामुळें, पाहुण्यांच्या चहाच्या सोयीची मनांत डोकावणारी उडाणटप्पू कल्पनाहि, मी तिथं मुळींच रुजूं दिली नाहीं. नाहीं म्हणायला, ठेवणीच्या कपड्यांच्या ट्रंकेतून ( आपली सांपडली नाहीं, तर निदान आपल्या शाळकरी मुलाची तरी इस्त्रीची असो कीं चुरगळलेली असो ) टोपी शोधून काढायची एक खूणगांठ तेवढी मी मनाशीं बांधली; व क्षणापूर्वींच ठरवल्याप्रमाणें, एका पानाच्या गादीकडे मी सुपारी घ्यायला थबकलों.

" एक...एक आण्याची,...म्हणजे...दीड आण्याची सुद्धां चालेल... छानशी...मोठीशी...आख्खी सुपारी द्या हो ऽ जरा ! आख्खी ऽ हं ऽऽ !!" तिथल्या पानतंबाखूच्या भाऊगर्दींत शिरून, ती माझ्या मनच्या शुभेच्छेची सुपारी मी पुढें सरकवली नि पंधरा नये पैसेहि त्याच्या पुढें टाकले.

एक क्षणभरच, तिथल्या तख्ताधीशानें माझ्याकडे टवकारल्या दृष्टीनें पाहिलं व रांगेनें मांडलेल्या तिथल्या काचेरी चपट्या डबड्यांचीं झाकणं उघडायला आपला हात पुढें सरसावला.

जवळ जवळ एकदीड मिनिटभर तरी, त्यानें आपल्या दोन्ही बाजूंच्या साऱ्या काचेरी डबड्यांचीं झाकणं उघडून, साऱ्या आख्ख्या सुपाऱ्यांची वरखालीं गल्लत–चाळवाचाळव केली; अखेर, एक मोठी सुपारी काढली नि ती माझ्या हातीं ठेवली.

तिचा तो आकार पाहून बेहद्द खूष होत, उगीच आणखी वेळ होऊं नये म्हणून, मी घाईघाईनें माझ्या घराकडे वळलों. सुपारी खिशांत टाकून, चालतां चालतां, किल्ल्यांचा घोस बाहेर काढून, मी खुळखुळवला; तेव्हां, एका न्याऱ्या समाधानी मनःस्थितींतच होतों मी !

पुढें, साडेपांच, सहा, साडेसहा झाले होते. माझ्या मधल्या मुलाची चुरगाळलेली पांढरी टोपी शोधून, ती डोक्यावर चढवून, मी आरामखुर्चीवरच त्या पाहुण्यांची वाट पाहात बसलों होतों. जेव्हां जेव्हां बाहेरची कडी वाजे, तेव्हां तेव्हां,...' आले वाटतं ' या कल्पनेनें, मी उत्सुकपणें दार उघडायला



उठून जात होतों. पण आमच्या बाहेरगांवीं गेलेल्या चिल्ल्यापिल्ल्यांची चौकशी करायला आलेलीं तीं शेजारपाजारचीं मुलंच ठरत होतीं. नि मग, तोंडदेखलं हसून, त्यांना कांहीतरी उत्तरं देत, तीं गेल्यावर, रागारागानें दार पुन्हां लावून आंत येऊन बसत होतों.

माझ्या डोक्यांतली ती भय्यासारखी ( वरच्यावरच बसलेली, सुरकुतलेली ) टोपी पाहून मात्र, पोरं हसत हसत निघून जात होतीं. तरी, तेवढ्यापुरतं लाजून, मी ती काढत होतों व पुन्हां आंत येऊन डोक्यावर चढवत होतों.

अखेर, ' हे गृहस्थ आतां नक्कीच येत नाहींत ', अशी माझी तरी मनांत खात्रीच झाली. पण मग, तरी मला वाटलं,––" त्यांनी तरी मुद्दाम कशाला यावं ? नि आपण तरी तसलं कांहीं गृहीत धरण्याचा हा नसता मूर्खपणाचा उपद्व्याप तरी कां करावा ? तें तसं कांहीं गृहीत धरण्याचा जादा शहाणपणा आपल्यालाच हवा होता कशाला ? ते सकाळीं रस्त्यामध्यें बोलले, तें तेवढ्या पुरतंच;...केवळ रीतीला, उपचारांना धरून—एवढंच !—"

अशा एकूण विचारांत असतांनाच, मी आगाऊ कमाल मर्यादा ठरवलेले साताचे ठोके पडले नि त्या पाठोपाठच माझ्या दाराची कडी वाजली.

" अरे ऽ बाबांनो ऽ ! सगळीं बाळगोपाळमंडळी बाहेरगांवीं गेलीं आहेत, म्हणून सांगितलं ना तुम्हांला मी मघाच ? " असं जरा त्रासिकपणेंच म्हणत, मी रागांतच तरातरा दाराशीं पोंचलों.

तोंच, माझ्या कानावर हसरे शब्द पडले... " पण तुम्ही तरी आहां न घरांत ? हंः,...जरा माफ करा, हं ऽ ! मधलीं दहापंधरा घरं उरकतांना उशीरच झाला मला !...खालीं गाडी उभीच आहे—आमच्या यादींतले आणखी तेराचौदा उरकायचे आहेत, बघा ! मंडळींना खालींच थांबवलंयू... अहो ऽ, काल सकाळपासून बघा,...आम्ही जवळजवळ चाकांवरच बसलों आहों... हँ हँ हँ...अस्सं ऽ असतं.. नको जीव होतो..."

एकदम भयंकर दचकून, डोक्याची टोपी सावरून, तोंडदेखलं हसून, यांचं तें सकाळचंच आमंत्रण आतां फक्त आणखी अक्षतांसह, मी दारांतल्या

दारांतच ऐकलं. ‘ हं हं ’ केलं. ‘ जरा आंत या...बसा ’ म्हणालों. आठवणीनें आणलेली ती सुपारी ‘ हें शुभफळ ’ असं म्हणत त्यांच्या हातीं ठेवली. आपल्याच रंगांत ते अनेक अडचणींची चर्पटपंजरिका मला घाईघाईनें सुनवीत होते; तें सारं, मान हलवीत ‘ हं हं ’ म्हणत, मी ऐकलं.

अखेर, जितक्या घाईनें ते आले होते, तितक्याच गडबडीगडबडीनें ‘ यायचं बरं का ! जरूर...’ असं म्हणत जिना उतरून, ते अदृश्यहि झाले.

आपण आपल्या आरामखुर्चीवर हुश्श करीत ऐसपैस पसरलों आहों; कधीं नव्हे तें आपलं दार आज सताड उघडं आहे; येणारे ते येऊनहि गेले आहेत, याची मला बऱ्याच वेळानें एकदम जाणीव झाली ! माझ्या मनांतली दुपारभरची ती सारी धडपडहि, बसल्या बसल्या, त्या पाठोपाठ मला आठवली.

तेवढ्यांत, अजूनहि इतकावेळ मी डोक्यांतच चढवून ठेवलेल्या टोपीची, मला एकदम जाणीव झाली; तसा, हसत हसत उठलों; ट्रंकेंत ती टाकून, झांकणहि बंद केलं.

पण त्यावेळींच, मला आणखीहि एक एकदम आठवलं—“ निमंत्रणाला आलेली ती स्वारी अपटुडेट पोषाखांत होती खरी; पण तिच्या डोक्यावर मात्र टोपी नव्हती ! ” तरी सुद्धां–‘ त्याचं तें काय मोठंसं !–आजचा हा जमानाच आहे ! नसेल त्यांना वाटलं तिचं, तेवढं ! आपण तर घातली होती ? आपण तरी दिली ना शुभेच्छेची सुपारी,...नारळ नाहीं तरी ? ’ असा एक एकांगी आत्मसमाधानाचा विचारहि मनांत चमकून गेला.

पण, पुढलं दार लावून, पुन्हां आरामखुर्चीवर आराम करीत, त्याच विचारी मनस्थितींत मी येऊन बसलों असतां, माझं लक्ष एकदम पॅसेजच्या दाराजवळच असलेल्या माझ्या टेबलाकडे वळलं नि केवढ्यानें दचकलों मी ?

त्यांच्या हातीं कांहीं क्षणापूर्वींच मी दिलेली ती सुपारी, तिथंच शांतपणें विश्रांति घेत पहुडली होती !...

कां कोण जाणें, खूप खूप हळहळलों चुटपुटलों मी !



क्षणभरच त्या दृश्यानें माझी तिडीख एकदम मस्तकाला गेली. त्या सुपारी-मधेंच माझ्या मनांतला शुभ सुहृद्-भाव मघां अधिष्ठित झाला होता. नि तीच, अजूनहि, माझ्याच टेबलावर, उपेक्षितपणें पडलेली मला दिसत होती ! म्हणजे, तिचंच त्या स्वारीला तसल्या आपल्या गडबडींत मोठं ओझं झालं होतं !—दरम्यानच्या माझ्या मनाच्या साऱ्या साऱ्या विविध हालचाली, भाव-भावना, विचार,...त्या गृहस्थाच्या दृष्टीनें तरी आतां हवेंतच विरून गेले होते.

तसा फारसा हळव्या मनाचा मी नसलों, तरी मला त्यावेळीं आंतल्या आंत अगदीं कालवल्यासारखं झालं ! तरी देखील, माझ्या मनावर ताबा मिळवून, मी एक खिन्न सुस्कारा सोडला नि स्वतःशींच एक कडवट स्मित करून,... जागचा उठलों....

मग, ( परिस्थितींतलं हिणकस नेहमीं सहजतः पिऊन टाकण्याची संवय असलेल्या ) माझ्या मनांतला व्यवहारीपणाच त्याक्षणीं एकदम जागृत होऊन, मी पुढं वांकलों...

ती टेबलावरची सुपारी मी हातीं घेतली नि तिलाच उद्देशून सस्मित पुढं म्हणालों—“ एकानें तुला शेंपन्नासांतून निवडून दिली; दुसऱ्यानें तुझ्यावर आपल्या हळुवार सद्भावनांचं वलय चढवलं; पण तिसऱ्यानें, आपल्याच गडबडींत, तुला केवळ सुपारी म्हणूनहि उचलून घेण्याचं साधं रसिकपण दाखवलं नाहीं ! अरेरे...हा तुझा अपमान मला तरी सहन होत नाहीं. माझ्या त्या हळुवार भावना तशाच हवेंत विरल्या असल्या, तर विरूं दे ! पण, आतां एक छानदार सुपारी म्हणून तरी तुझ्या जन्माचं चीज मला करूं दे !...खंत वाटूं देऊं नकोस !...”

गृहिणीहीन स्वयंपाकखोलींतल्या गोंधळ–अडगळींतून, थोड्या प्रयासानेंच, आमचा गंजलेला अजाणी आडकित्ता मी शोधून काढला...ब्लॅकमध्रले सगळे दिवे पेटवले व ती सुपारी घेऊन पुन्हां आरामखुर्चीवर येऊन बसलों.

आणि मग, त्या भावभरित सुपारीकडे एकदां डोळे भरून पाहून, मी माझ्या हातांतल्या आडकित्त्यानें तिचे कटकन् दोन तुकडे केले—

ते तसे केले मात्र—माझ्यावर फिरून एकदां भयंकर दचकण्याचा प्रसंग येऊन कोसळला होता !

कारण, वरून चांगली दिसणारी ती भली मोठी सुपारी, आंतून पार काळी, किडकी होती ! !

मी क्षणभरच मनस्वी बेचैन झालों...हळहळलों !

पण मग, माझ्या मनांत पुन्हां एक धगधगती आगहि उफाळून उठली—"त्या 'गादी'वाल्याला आण्याऐवजीं दीडआणा देऊनच ना आपण ही घेतली ? त्यानेंहि साऱ्या कांचेरी डबड्यांनं आमूलाग्र संशोधन केलं;... हिच्या साऱ्या साऱ्या बहिणी–मैत्रिणींना, अगदीं वरखालीं ढवळून, हिलाच अखेर त्यानें खास निवडून माझ्या हातीं दिली ! तर मग, ..त्या वेळीं मिनिटभर त्यानें जें संशोधन केलं तें कसलं ?...सर्वोत्कृष्टाचं कीं सर्वांत निकृष्टाचं ?"

"...पण असं कां ?...असं कां ?"...माझ्या बेचैन जिवाला कांहीं केल्या उलगडा व समाधानच मिळेना !...

त्याक्षणीं मी केवळ माझ्याच बाजूनें पहात होतों !...

अखेर, मला त्या गादीवाल्याची त्याक्षणींची ती चमकली दृष्टि आठवली व मग वाटलं .."'धोरणी बेटा ! ' ही याची खाण्यासाठींची मागणी नाही...हा केवळ कसला तरी प्रसंग साजरा करण्याचाच प्रश्न दिसतोय् ? हिची उचलबांगडी दूरदूर कुठें तरी...अज्ञातहातीं...अज्ञातस्थळींच होणार आहे !...या जवळपासच्या गिऱ्हाइकाला हिचं झाकलं अंतरंग समजण्याचा सुतराम् संभव नसल्यामुळें, आपली व्यवहाराची झाकली मूठहि तशीच झांकली राहील !'—असाच एक क्षणार्धात् विचार करून, त्यानें तें आपलं संशोधन पुरं केलं होतं नि मला त्यानें मुद्दाम हीच निवडून दिली होती !"

पण, कोणाला काय वाटलं नि कसं वाटलं, हें कोडं अधिक सोडवण्याच्या भरीला मी कांहीं पडलों नाहीं.

मात्र, माझ्या साऱ्या हळुवार भावना फिरून उचंबळून आल्या.



जगांतील भावशून्य मानवी व्यवहाराला बळी पडलेल्या त्या सुपारीबद्दलच मला आतां अगदीं नितांत आपुलकी वाटूं लागली.

मी आडकित्त्यानें ती तशीच बारीक कातरून, कांहीं तोंडांत टाकली व चघळू लागलों. वाटलं, 'त्या झिडकारल्या सुपारीचं जीवन सार्थकीं लागावं ! आपल्या हळुवार भावना आपण तरी संथपणें मनसोक्त चघळाव्या !'

आजपर्यंत मी अनेक सुपाऱ्या चघळल्या असतील,...पण ती एक सुपारी मात्र मला अजूनहि हजारदां आठवते !

अनेक अर्थांनी ती होतीच तशी !—

—एक न्यारी सुपारी !...

० ० ०

# व्यापार व व्यापारी !

मला एकेकदां वाटतं–कीं, भलीबुरी हालचाल म्हणजेच व्यापार म्हणायचं, तर मनुष्यप्राणी हा जन्मतःच व्यापारी असतो. कारण, तो एकदां जन्मला कीं मरेपर्यंतच त्याचा कसला न कसला ‘ व्यापार ’ हा चाललेलाच असतो. जिवंत माणूस मुख्यतः व्यापारीच असतो !

‘ कँह्यँ ऽ ’ करून त्यानें जगांत पहिली आरोळी ठोकली रे, ठोकली, कीं, तिथूनच त्याचा अव्याहत व्यापार सुरू होतो. नि अखेरची घरघर हाच त्याचा अखेरचा व्यापार असतो. ती थांबली कीं, त्या कंपनीचा स्वतःचा व्यापार एकदम थांबतो; पण मग, तत्काळ, त्या बाबतींतला, त्या अनुषंगाचा, इतरांचा व्यापार सुरू होतोच !—जगाचा व्यापार कधींच थांबत नाहीं.

पण तत्पूर्वी ?—ज्याचा त्याचा तरी, विविध व्यापारांचा केवढा प्रचंड आटापीटा चाललेला असतो ? त्याचा प्रत्येक अवयव नि अवयव त्यांत सहभागी होत राहिलेला असतो.

या दृष्टीनें (आधीं दुसऱ्या किय्येकांचं व अखेर आपलं स्वतःचं) ‘हार्टफेल’ होईपर्यंत कसं ना कसं धडधडत-धडपडत असणं, हा ‘ हृदयाचा व्यापार ’ ! ( पैशासकट ) जें जें मिळेल तें, ( पोट बिघडेपर्यंत ) खात राहणं किंवा ( जबडा फाटेपर्यंत ) बोलत राहणं, व्याख्यानं देणं, संदेश देणं, उपदेश



करणं, हा ( बाळासाहेब खेर-प्रणीत ) ‘ तोंडाचा व्यापार ’ ! आपल्या फायद्याच्या ( नि तें शक्य नसल्यास इतरांच्या तोट्याच्या तरी ) कसल्या ना कसल्या वासावर असणं, हा ‘ नाकाचा व्यापार ’ ! प्रत्यक्ष दिसत असेल तें तें न पाहणं, दिसत नसेल तें तें स्वतः नेहमीं पाहत असणं व दुसऱ्यांना तें आपल्या दृष्टीनें दाखवीत असणं, हा झाला ‘ डोळ्यांचा व्यापार ’ ! थोरांपासून पोरांपर्यंत साऱ्यांचंच हें असं चालतं. त्यालाच म्हणतात व्यापारी धोरण !

आपले दुसरेहि अवयव कांहीं स्वस्थ बसत नसतात; नि त्यांच्या हालचालींतून ज्याच्या कुवतीनुसार, आणखी दुसरेहि कांहीं मानवी व्यापार उभे राहतात; चालत असतात...

उदा०—जरूर तिथं नि नसेल तिथंहि उसनं अवसान आणून, दुसऱ्याच्या छाताडावर सहजासहजीं आपला पाय ठेवणं किंवा अवश्य तेव्हां समयज्ञपणें, आपले ते पाय आपल्याच ढुंगणाला लावून (आपल्या संकटापूर्वी, दुसऱ्यालाच एखाद्या संकटांत लोटून ) धूम ठोकणं, हा म्हणायचा ‘ पायांचा व्यापार ’ ! स्वतःच्या डोक्यांतील टोप्या वारंवार धूर्तपणें फिरवणं, बदलणं, दुसऱ्याच्या डोक्यावरील टोप्या सहज लीलेनें उडवणं, किंवा त्यांना बघतां बघतां, नकळत टोप्या घालणं, हा झाला ‘ डोक्याचा व्यापार ’ ! कोणाला तरी आपल्या हाताशीं धरणं, त्याच्या साह्यानें कोणाच्या तरी हात धुवून पाठीशीं लागणं नि अखेर, त्या साह्यकर्त्यालाहि हात दाखवून, पुन्हां नक्राश्रु ढाळीत आपल्याच नशिबाला हात लावणं, हा सारा अर्थात्‌च ‘ हातांचा व्यापार ’ ! अंगावर शेकतंय्, जिवावर बेततंय्, असा रागरंग दिसतांच, इतरांचं कांहींहि होवो, आपण आपलं तडकाफडकीं ‘ अबाउट टर्न ’ करून प्रसंगाला पाठ दाखवणं, हा ‘ पाठीचा व्यापार ’ !

याच धर्तीचा आणखी एक सांगण्यासारखा महत्त्वाचा व्यापार उरलाय् !–

दुसऱ्यांच्या नवनवीन कल्पना ( दुसऱ्यांच्या, तिसऱ्यांच्या किंवा इतरांच्या खर्चानें व जमा केलेला आपला सांवळागोंधळ त्यांत भरपूर भरीला घालून ) मूर्त स्वरूपांत आणण्यासाठीं म्हणून, त्या अफाट पसाऱ्याला आपल्या दमदार खांद्याचा आधार देणं; अखेर, तो दुसऱ्याचा पैसा व त्या दुसऱ्याच्या कल्पनेमागलं नावीन्य-स्वारस्य ओसरत आहेसं दिसतांच किंवा ती खटपट

एकंदरींतच अयशस्वी होऊन, आपल्याहि तुटपुंज्या कुवतीच्या, तोकड्या बुद्धीच्या आटोक्याबाहेर जात आहेसं अनुभवास येतांच, किंबहुना, तसल्या अपयशाचा थोडासा आगाऊ वासहि लागतांच, धूर्त धोरणीपणानें त्यांतून झटक्यांत बाजूस होणं; किंवा त्या एकूण कल्पनेला तितक्याच अहंमन्यतेनें, (ती मरतां मरतां व मेल्यावर) आपला अखेरचा दमदार खांदा देणं; (अर्थात्च, आपण अशाप्रकारें विविध पद्धतींनीं आपला दमदार सरावलेला खांदा हरघडीं इतरांना देण्याइतके, या मर्त्य जगांतले एकमेव जिवंत व दमदार जीव आहोंत, असंच अभिनिवेशानें म्हणत राहणं) हा सारा म्हणायचा 'खांद्याचा व्यापार'!!

तेव्हां, मनुष्य म्हटला कीं, तो मरेपर्यंत 'व्यापारी' हा असायचाच! नि कल्पक मानवी व्यापारी म्हटला, कीं, तो हे व असले इतर अनेक 'व्यापार' मरेपर्यंत करीत हा असायचाच!—

कारण, व्यापार नाहीं तर जग नाहीं, माणूस नाहीं, हालचाल नाहीं!— अव्याहत हालचाल म्हणजेच जग!!

• • •


## रघुवीर सामंत वाङ्मय

**हृदय**–[अव्वल मराठी शब्दचित्रें द्वि. आ. १९५०, पृ. १८०; मूल्य–रु. ३–७५] (विद्यार्थी प्रतीभाव-जीवन रु. १–२०; शहरचे भाई रु. १–२०; मायेची किमया रु. १–२०)

**उपकारी माणसें**–['प्रवासांतील सोबती', 'अभ्रपटल', 'आकाशगंगा' या तीन खंडांत विस्तारलेली मराठीतील अभिनव स्वतंत्र, सामाजिक, प्रदीर्घ कादंबरी] खंड प्रकाशन—१९३८; एकत्र प्रत-ऑगस्ट १९५०; पृष्ठें डे.–७८० मूल्य रु. १३–७५].

**जीवन गंगा**–[सुशिक्षित जोडप्याच्या जीवनावरील मनोविश्लेषक कादंबरी; आ. १९४७; पृष्ठें २२०; मूल्य रु. ४–५०].

**आम्हीं खेडवळ माणसं**—[ग्रामीण जीवनावरील हृद्य कादंबरी; आ. १९४७; पृष्ठें १४४; मूल्य रु. २–७५]

**आम्हांला जगायचंय्**—[आजच्या भारताचा दृक्-शब्द-चित्रपट; सामाजिक कादंबरी; आ. १९५७ पृष्ठें २२०; मूल्य रु. ४–००].

**एम्. व्हिटॅमिन**–[शिक्षकाच्या जीवनावरील एक नाटुकलें; आवृत्ति १९५७; पृष्ठें ६४; मूल्य रु. १–५०].

**मासलेवाईक प्राणी**—[कांहीं जिवंत स्वभाव-चित्रें; द्वि. आ. १९५०; पृष्ठें १२८; मूल्य रु. २–७५] (विद्यार्थी प्रती—१ ले सात, रु. १–२०; २ रे सात, रु. १–२०)

**मृगजळांतलीं वादळं**–(सोज्वळ कथा, शब्दचित्रें; आ. १९५७; पृष्ठें १२८; मूल्य रु. २–७५)

**गीत-ज्योति**–[किशोर–किशोरींसाठीं गेय नाट्य-गीतें; सप्तरंगी पृष्ठें ३२; आ. १९४४; मूल्य रु. ०–८७)

**माणसाचें शेंपूट**–(कुमारांसाठीं मनोरंजक शास्त्रीय चर्चा; द्वि. आ. १९५०, पृष्ठें ५६, मूल्य रु. ०–८७)

**आजचीं गाणीं**–(सांघिक व गेय गीतें; आ. १९३९, पृष्ठें ½ डे. १२४, मूल्य रु. १–५०).

**रक्त नि शाई**–(आजच्या जमान्याचीं गेय व सांघिक गीतें; आ. १९४७; पृ. ½डे. १२४; मू. रु. १-५०)

**आदर्श कृषीवल**–(एक आदर्श कृषीवल-चरित्र व प्रयोग; आ. १९४५; पृष्ठें २००; मू. रु. ३–५०);

**आपलें व्यक्तित्व**—(मानवी व्यक्तित्व दर्शन व साधना; आ. १९५९; पृष्ठें १८४, मू. रु. ५–००).

**दिलजमाई**-(नवीन ललित निबंध; आ. १९५९; पृ. १३४; मू. रु. ३-५०)

**जिवंत झरे** — (नवीन लघुकथा; आ. १९५९; पृ. १४४; मू. ३-५०)

**तारांगण** — (लघुनिबंध; आ. १९४०; पृ. १०४; मू. २-००).

**रजःकण** — (कथा-निबंध; आ. १९४१; पृष्ठें १४४; मू. २-७५).

* [ १५ ऑगस्ट १९५९ पासून या उपलब्ध पुस्तकांच्या वरील किंमती निश्चित केलेल्या आहेत. **यापूर्वीच्या किंमती रद्द समजाव्या,** 'पारिजात प्रकाशन'च्या या (१९३३-१९५९) २५-२६ व्या वर्षी ग्राहकांना व विक्रेत्यांना जादा १०% वटाव. मात्र किमान व्यवहाराची अपेक्षा आहे. ]

* [ **वाळूंतील पावलें** (कथा-शब्दचित्रें); **पणत्या** (स्निग्ध लघुनिबंध); '**तांडा**' (कथा-शब्दचित्रें); **घरोघरच्या देवी** (नाट्यात्मक कादंबरी) हीं पुस्तकें आतां अनुपलब्ध आहेत. कदाचित् एखाददुसरी प्रत मिळते. ]

## इतर प्रकाशकांमार्फत प्रसिद्ध पुस्तकें

**सुरंगीची वेणी** — (रशियन कथांचा सुरस अनुवाद आ. १९३५; पृ. १८०; )

**संपूर्ण इसापनीति** — (नव्यानें तयार केलेली संपूर्ण इसापनीति; आ. १९५७; पृष्ठें २७०; मू. ३-००)

**टॉम सॉयरचीं धाडसें** — (मार्क ट्वेनचा सुंदर अनुवाद; आ. १९५७; पृष्ठें २५०; मू. ३-५०)

**व्यवहारचतुर कसें व्हावें?** — (खेळकर अनुभवी गुजगोष्टी; आ. १९५९; पृष्ठें १००; मू. रु. २-००)

## इतर प्रकाशकांमार्फत प्रसिद्धिमार्गावर

**मॉबी डिक्** — (संपूर्ण सुरस भाषांतर).

**शाकुंतल** — (कविकुलगुरुच्या नाटकाचें धावतें रसग्राही कथन)

**स्वप्नवासवदत्त** — (भासाच्या नाटकाचें धावतें रसग्राही कथन)

**वेणीसंहार** — (भट्टनारायणाच्या नाटकाचें धावतें रसग्राही कथन)

रघुवीर सामंत वाङ्मय

## ❀ दिलजमाई ❀

### वानगी

“ श्री. सामंतांनीं ‘ हृदय ’ निर्मिलें— ( डि. १९३२ ) तेव्हांपासून त्यांची सूक्ष्म निरीक्षणाची, स्वभावदर्शनाची, जीवनाच्या रोजच्या अंगावर नवा प्रकाश पाडून वाचकांस नवी दृष्टि देण्याची शक्ति रसिकांस सुपरिचित आहे...‘ हृदया’च्या त्या शिल्पकाराची कला येथें उत्तमप्रकारें दिसून येते.

“...वरवर पाहतां क्षुल्लक वाटणाऱ्या विषयांच्या कौशल्यपूर्ण निवडीला या संग्रहां-तील लघुनिबंधांना चौरस व्यक्तित्वाची जोड मिळाली आहे. त्यांचा जगाकडे, जीवनाकडे, तुमच्या–आमच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन शोधक नि भेदक आहे. त्यांत भल्या-बुऱ्या गोष्टी सामावलेल्या आहेत. त्यांत आंच आहे, कटुता आहे; पण कटुतेचा अर्क नाहीं. त्यांत खूप खेळकरपणा (आणि अभिजात खटयाळ-पणाहि ) आहे. यांतच श्री. सामंतांच्या व्यक्तित्वाचें विविध दर्शन आहे. . कांहीं निबंधांत तर प्रस्तुत निबंधकाराच्या व्यक्ति-त्वाचा विलास शिगेला पोंचलेला आहे.

“ श्री. सामंतांनीं लघुनिबंध लेखनाच्या कलेची किती मनोहर जोपासना केलेली आहे, तें पुस्तक हें समग्र वाचल्यानेंच अधिक कळेल.”

— डॉ. मि. अ. परब